REGISTERED N. No.

सहामाही „ ८
साल अखेर „ „ १ ८
किरकोळ अंकास ..........................८

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत ८० १
दर ओळीस.......... ८१ ८
दुसरे खेपेस .... ......... ८१

Six monthly........ 3 .............. 8 as
Single copy ...............................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY 1 JULY 1901 NO 25

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख १ माहे जुलै सन १९०१ इ० अंक २५

## मोरोपंत

निवडक वेंचे

( २४ व्या अंकावरून पुढें )

बृहद्दशम अ. ८८

वृकासुराची कथा सर्वांस ठाऊक आहेच कीं, त्यानें शिवाची आराधना करून, ज्या ज्या प्राण्याच्या मस्तकावर आपण हात ठेवूं, तो तो प्राणी भस्म होईल, असा वर मिळविला होता. या संबंधाच्या आर्या वाचनीय आहेत. पौराणिक कथांचें संभाव्य किंवा असंभाव्यपणाकडे न पाहतां, त्यांतील तात्पर्यार्थ, व्यवहाराशीं जुळवून पहावा ह्मणजे आपलें कार्य होईल. इतकें सांगणें येथें अवश्य दिसतें.

थोडक्या वेळांत कोण प्रसन्न होतो असें बाणें नारदास पुसलें.

सांगे नारद भगवान्

गिरिश जसा पुससि तूं तसा आहे ॥
भज शीघ्र सिद्धि होईल,
वेतां मागें पुढें न तो पाहे ॥ ४ ॥
स्वल्पेंहि गुणें होतो,
भजकीं भगवंत शंभु तो तुष्ट ॥
स्वल्पें दोषेंहि बहु,
स्मर-हर-हर देव होतसे रुष्ट ॥ ५ ॥
होय प्रसन्न करिती,
स्तुति दशमुख बाण ते जसे बंदी ॥
नंदी हुनि आवडले,
केले प्रभु; ज्यांपि इंद्र ही वंदी ॥ ६ ॥
करुनि प्रसाद आपण,
संकट त्यापासुनि प्रभू पावे ॥
कैलासोत्पाटन,
पुर-रक्षण-इतिहास हे जना ठावे ॥ ७ ॥
ऐसें सांगुनि गेला,
मुनिवर मग दुष्ट तोहि केदारीं ॥
वर घ्यावया बसे खळ,
यवन भिकारी जसा टिके दारीं ॥ ८॥

बानें आपलें अंग छेदून कुंडात टाकिलें आणि शेवटीं स्वशिराचा छेद करण्यास उद्युक्त झाला. तेव्हां प्रकट होऊन शिवानें त्याचें वारण केलें.

वेड्या ! हें काय ! केलें,
सोपें मद्भजन, साधु सहवासें ॥
दासें जळेंचि आह्मा,
जोडावें; होमिलीं वृथा मांसें ॥ १५

१ शिव २ बाणासुर. ३ वर घेऊन, रावणानें कैलास पर्वत हलवून शिवास उपद्रव दिला. आणि बाणासुरानें आपल्या नगराचें रक्षण करण्यास शिवास लाविलें. ४ माझे भजन सोपें, असें साधु सहवासें कळे.

बहु पत्र पुष्प फळ जळ,
केवळ मज जरि सुशील दे वश मी ॥
झालों, होतों, होईन,
हे जाणती साधु भूमिदेव शमी ॥ १६
भक्तास उथळ केवळ,
आहें मी कोटि योजनें खोल ॥
खोल त्वन्मन कोठें,
वर द्यावा कोण तो स्वयें बोल ॥ १७
ऐसा प्रसन्न झाला,
वरदर्षभ भक्त भाग्यभर भोळा ॥
तोळा द्यावा याला,
ब्रह्मांडाहूनि थोर दे गोळा ॥ १८
असुर ह्मणे मी युष्मत्-पद-
पद्म-पराग-पूत हा प्राणी ॥
ज्याच्या ज्याच्या माथां,
ठेविन तो सर्व ही मरो प्राणी ॥ १९
अमृत-प्रद परमेश्वर,
माग ह्मणे त्यासि मागतो गरळ ॥
परळ श्रीमंतातें,
मागे हर्ताविधि सिजे कसा हरळें ॥ १०
कुमति स्वार्थहि न करी,
होय वरद अप्रसन्न तें मागें ॥
लागे त्याहुनि बहु घे,
सुमति; न दाताहि द्यावया भागे ॥ ११

वर प्राप्त झाल्यावर,

वृक करि विचार चित्तीं
श्रम मी होमांत भोगिला मोठा ॥
तोटा मान्य करीना !
पाहों वर हा खराच कीं खोटा ॥ २५
स्ववर परीक्षार्थ कर,
स्थापूं पाहे शिरीं स्वदात्याच्या ॥
बहुधा गौरीचीं ही,
अभिलाष मनांत ये तदा त्याच्या ॥ २६
झाला धर्म ध्वंसुनि,
सिद्ध कुधी जो वधास बापाच्या ॥
मातेचा अभिलाषहि,
कां येना मानसांत पापाच्या ॥ २७
स्वशिरीं कर ठेवाया,
ये तेव्हां वृक वृषभस्वभाव खळ ॥
भव भयहर हर भगवान्
भीमहि भी कीं वरीं तसेंचि बळ ॥ २८
धांवे पिसाळला वृक,
सभय तपस्वी महेश एकाकी ॥

१ शांत चित्त. २ जरी मी इतका खोल तरी भक्तास उथळ. ३ तुमच्या चरण कमलाच्या धुळीनें पवित्र. ४ हात ५ अमृत देणारा. ६ विष. ७ छापर. ८ दुर्दैवी. ९ खडा. १० सुमति ओहे तो, पाहिजे त्याहून अधिक मागतो, व तें देण्यास दाताहि श्रमत नाहीं. ११ पार्वतीचा. १२ दुष्ट स्वभाव. १३ शिव.

हांकीं सोम करी प्रभु,
मागें स्वाभयद पद हळू टाकी ॥ २९
जों जों भय धरि तों तों,
श्री मन्मृत्युंजयासि तो दापी ॥
पापी बहु निर्दय निज-
मांस चरारां स्वयेंचि जो कापी ॥३०॥

या प्रमाणें वृकाच्या भयानें शिव पळत सुटला, शेवटीं स्वसंरक्षणार्थ श्री विष्णूच्या त्यानें आश्रय केला. मोठ्याचें संकट मोठ्यानेंच वारावें. याबद्दल पुढील ४ आर्या ध्यानांत ठेवण्या जोग्या आहेत.

दंतीनेंचि स्वबळें,
काढावा पंक मग्न जो दंती ॥
साधूनेंचि हरावी,
बाधे जे साधुच्या मनी खंती ॥ ४७
संकट पतिव्रतेचें,
पतिव्रतेनेंचि कीं निवारावें ॥
नौकेनें नौकेला,
बुडतां यादोनिधींत तारावें ॥ ४८
रणयज्ञीं भूपाला,
व्हावें अंगें सहाय भूपानें ॥
सागर तृषा हरावी,
कैसी स्वादूदकेंहि कूपानें ॥ ४९
धर्मे दक्षां द्यावी,
वामाहि भुजा तसी उठी दक्षें ॥
पूजावा हरिनें हर,
हरिहि हरें सदवनांक्रियादक्षें ॥ ५०

श्री विष्णूनें बटुरूप धारण करून वृकाचे समीप येऊन इतका आयास करण्याचें प्रयोजन काय आहे असा त्यास मोठ्या विनयानें प्रश्न केला.

कुश पाणि बटु प्रभु कर-
कमळें जोडूनि त्या खळास ह्मणे.
दिति-कुळ-कमळ-द्युमणें,
हे शकुनि-समुद्र-चंद्र वीरमणे ॥ ५५
श्रमलां कीं तामरसी,
माळेयें तसा दिसे मुखीं घाम,
सामर्थ्यें मानाना,
झाला श्रम कोणतें अतें काम ॥ ५६

१ हाक मारी, अरे वृका ! हें असें तूं काय करितोस ! २ सागोपचार करी. ३ भक्ताला अभय देणारा तो भिऊन हळु हळु मागें पाय टाकी. ४ दटावी. ५ हत्ती. ६ संशय. ७ समुद्रांत. ८ डाव्या. ९ उजव्या. १० साधूंच्या रक्षणास दक्ष अशानें. ११ दिति कुळ कमळाच्या सूर्या. १२ शकुनि नामे पिता तोच समुद्र त्यास आनंद देणारा चंद्र. १३ कमळ. १४ हिमकण.

आह्मांस मात्र वाटे,
आह्मां सोडूनि देश बहु दूर ॥
परि तुमचें क्षिति मंदिर,
रत्नाकर अंजिर कीं तुझी शूर । ५७ ।
क्षणभारि बसा असा श्रम,
न महा-प्रभुला तुला विभो साजे ॥
हा कार्य काय कष्टो-चित ?
पूजिति ज्यासि देव नर राजे ॥ ५८ ॥

वृकासुरानें आपलें वृत्त निवेदन केलें.

सांगे निज वृत्त वृक,
प्रभुवर हांसे ह्मणे असें काय ! ॥
नारद वाग्विसश्वासें,
भूपतीचे उपासिले पाय । ६६ ।

महादेवाच्या वरप्रदानांत खरेपणा नाहीं असें सांगून बटु आणखीं ह्मणाला,

वरद जगद्गुरु, वास्तव,
वर सत्य; असा असेल जरि भाव ॥
साव परंतु दिवाळें,
निघतां कोठें खरेपणा ठाव ! ॥ ७० ॥
कैंचा वर वेडा हर,
माथां कर आपुल्या न कां ठेवा ॥
हे वाचा लटकी हा,
प्रत्यय येतां वधा महादेवा ॥ ७१ ॥
आज तुह्मांस ठकविलें,
दुसऱ्यास उद्यां ठकील हें खोटें ॥
साधु प्रतारकाळीं,
जिंका गातील लोक यश मोठें ॥ ७२ ॥
स्वशिरीं कर ठेवुनि हें,
सत्य मृषा प्रत्यया बरें आणा ॥
अजि दानवेंद्र साधो,
वाहेन तुह्मी ह्मणाल तरि आणा । ७३ ।
बोल मधुर बहू अमृतहि,
विरस; मग किती सितों, मधु, क्षुद्रा ॥
लटिकें घटिकेंत गमे,
ठकवी ठक विश्वमोहन क्षुद्रा ॥ ७४ ॥
प्रभुवचन भ्रांत वृक,
स्थापी निज मस्तकावरी हात ॥
पविहत गिरिशिखर तसें,
फुटलें खळ आपला करी घात ॥ ७५ ॥

× × × ×

( पुढें चालेल. )

१ अंगण. २ देह. ३ शिव. ४ साधुला ठकविणारा शिव. ५ साखर. ६ मध. ७ द्राक्षा. ८ तुच्छ वृक्षातें. ९ वज्रानें हत.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध १६ शके १८२३

इंग्रजी साम्राज्याच्या सुखशीतळ छायेखालीं आपण मनमुरादपणें चैनींत आणि ऐषआरामांत मग्न झालों आहों. आपण मागचा पुढचा विचारपोंच मनांत न आणितां आंधळ्या प्रमाणें परकीयांच्या सहवासास लागून आपला धर्म नवा केला, आचार विचार पालटले, व नीति नवी धरली. आपल्या आळसाच्या पायीं नादानपणानें आपलें स्वराज्य व संपदा दुसऱ्याच्या घरांत घालविली. कर्तव्य पराङ्मुखतेचें दुष्ट वारें आपणांस लागलें. परकीय गोष्टींनीं आपणांस भारून दीन करून सोडलें. सर्वस्वी दुसऱ्यांच्या हाता तोंडानें आपण पाणी पिऊं लागलों. आपण आपणांस विसरून गेलों. आपला स्वदेश आपणांस परकी होत चालला. आपला पराक्रम, धैर्य, व हिंमत, हीं नष्ट झालीं. अखेर आपलें हिंदुस्थानचें नांवाजलेलें बलाढ्य राष्ट्र दिवसानुदिवस खालावत जाऊन मृत्युपंथास लागलें आहे तरी सुद्धां आपण खुषालचंदा प्रमाणें स्वस्थ कसे बसतों ! आपणांस आमच्या इंग्रजांनीं घालून दिलेला स्वावलंबनाचा धडा घट्ट केला पाहिजे. आपल्या अंगच्या हिंमतीवर, व मनगटाच्या जोरावर कंबर बांधून उद्योगास लागूं, स्वदेश भक्ति मनांत वागवूं, स्वधर्माचा अभिमान राखूं, स्वातंत्र्यसुखाची लालसा धरूं आणि स्वदेशी वस्तूंचा अभिलाष धरून त्यांवर प्रीति करूं. आपली उन्नती होण्यासाठीं आपण होऊनच हरप्रयत्न केले पाहिजेत. दुसऱ्याची शिकविलेली बुद्धि व बांधून दिलेली शिदोरी किती दिवस पुरणार ! तर आपण आपलें काम आपण होऊन झटून करूं लागलें पाहिजे. आपल्या शिरावरचा सर्व बोजा आपणच वाहून नेला पाहिजे. दुसऱ्याच्या मदतीची अणुरेणु इतकी सुद्धां अपेक्षा करितां कामा नये. सर्व भिस्त व मदार आपल्या स्वतांच्या जिवावर बांधली पाहिजे. दुसऱ्यानें आपणास हातभार लावावा अशी आशाच ठेवूं नका. दुसऱ्यावर आपलें काम विसंबाल तर आपण होऊन आपला गळा व सुरी दुसऱ्याच्या हातांत देत आहों हें खूप समजा. दुसऱ्याची जरूर नाहीं अशा बेपरवाईनें आपला चंग बांधून पुढें सरसावाल तरच आपल्या राष्ट्राच्या कार्यकर्तृत्वास यश मिळणार आहे, एरवीं सर्व वाद वृथा होय. आपण दुसऱ्यावर अवलंबून नाहीं अशी जेव्हां इतरांची खात्री होईल तेव्हां ते आपणांस आपण होऊनच नको तरी मदत करण्यास उभे राहतील.

सद्गुरु वाचोनी सांपडेना सोय । धरावे ते पाय आधीं आधीं ॥

ही सत्कवीची मार्मिक उक्ति फार बोधप्रद होय. गुरु मंत्रा खेरीज तपाच्या साधनाची सिद्धी होत नसते. तर आपल्या धुरंधर राज्यकर्त्यांनीं स्वराज्योत्कर्षाचा जो गुरुमंत्र स्वमुखानें सांगितला आहे. तोच अहर्निश एक सारखा घोंकला पाहिजे. त्यांचाच सन्मार्ग आपण आक्रमिला पाहिजे, त्यांच्या बोधहितवचनांची सुमन माळा आपल्या कंठांत सदैव वागविली पाहिजे, आणि अशा रीतीनें परमेश्वरावर निष्ठा व भरंवसा ठेवून आपल्या इंग्रज गुरूंचे चरण घट्ट धरून त्यांचा आशीर्वाद प्रसाद घेऊन महत्कार्यास हात घातला तर यशश्री हात जोडून उभी राहील यांत शंका नाहीं.

आपण आपल्या बाहुबलसामर्थ्यानें महान् अफाट दर्याहि तरून जाऊं अशी उमेद धरूं. मनानें आपण अमूक एक गोष्ट करूं किंवा बहादरी मिळवूं अशी दृढ गांठ बांधली तर ती गोष्ट आपण खरोखरीच खात्रीनें करून सोडूच सोडूं यांत इतकेंहि अंतर पडणार नाहीं. कांहींहि झालें तरी ज्या प्रिय वस्तूंच्या प्राप्ती साठीं आपण आपला जीव तळमळवितो ती गोष्ट दृष्टी आड कधींही होतां कामा नये. हजारों संकटांनीं घेरलें तरी निराशेनें धैर्य खचूं देऊं नये. इतकी जय्यत आपली तयारी झाल्यावर आपल्या अंगांतील गेलेलें पाणी, जंग चढलेली तरतरी, व नष्टप्राय झालेली महत्वाकांक्षा हीं सणसणून सर्व हाडामांसांत रसरसतील. नवीन यश कमाविण्यापेक्षां गमावलेलें सुयश पुन्हां मिळविणें हेंच काम फार कठीण आहे व हें महत्कृत्य आपण आरंभलेलें पाहून, व तें काम एकनिष्ठपणें शेवटास नेण्याचा आपला दृढनिश्चय पाहून सरकार मोठ्या आनंदानें आपल्या पाठीशीं उभे राहतील व आपण कोणत्याहि पराक्रमी राष्ट्रास भारी आहोत व कधींहि हार जाणार नाहीं असा प्रत्यक्ष अनुभव आल्यावर त्यांस धन्य वाटेल व आपण त्यांच्या सुशिक्षणाचें अमृतफळ त्यांस खावयास घातल्याबद्दल आपला त्यांस फार अभिमान वाटेल. ह्या सर्व भावी आनंदाच्या गोड गोड गोष्टी झाल्या. पण ह्या महा आनंदाच्या पर्वताच्या पायथ्याशींच पोहोंचेपर्यंत अविश्रांत श्रम उपभोगण्यास एका पायावर उभे राहिलें पाहिजे. टाकीचे घाव खाल्ल्या खेरीज देवपण अंगीं येत नसतें ही गोष्ट मनांत धरा. म्हणजे मग आनंदाचा महागड आपल्या हातीं लागल्या सारखाच आहे. व त्याच्या उच्च शिखरावर जाऊन तेथें आपला सततचा फडकता राहणार, विजयशाली बावटा उभारून देऊं आपलें हें उदाहरण पाहून दुसरे महत्वाकांक्षी लोकहि आपलेंच अनुकरण करतील.

## सेशन खटले

(१) कोऱ्हाळे तालुका मलकापूर जिल्हा बुलडाणे येथील बाजारांतून कांहीं बेपारी लोक धामणगांवास जात असतांना खांडव्याचे जंगलांत गेल्या जानेवारी महिन्यांत १६।२० इसमांनीं त्यांवर हल्ला करून त्यांचें सर्वस्व हरण केलें. सदहू गुन्हा ज्या बंजारी लोकांनीं केला त्या पैकीं १० इसम पकडले जाऊन त्यांजवर मोकदमा होऊन ते सेशन कमिट झाले. ते सर्व लोक दोषी ठरून एका आरोपीस १० वर्षे व बाकीच्या आरोपीस सात सात वर्षांच्या काळेपाण्याची सजा झाली.

(२) त्याच प्रमाणें अकोलें तालुक्यांत एक टोळी बोरगांव रस्त्यावर व अकोट रस्त्यावर दरोडे घालीत असे. या टोळी पैकीं एक इसम शेकलाल यास इं० पि० कोडचे ३९५ प्रमाणें सदहू रस्त्यावर तीन गुन्हे दोन रात्रींत ३ व ४ एप्रिल रात्रीं केल्या संबंधानें तिन्ही गुन्हे मिळून सहा वर्षांची सजा झाली.

(३) शेगांव येथील धनगर फैलांत राहणारी मंजुळा नांवाची बाई विधवा असून गरोदर झाली. जातीवाल्यांनीं तिला काढून दिलें निराश्रित फिरत होती. ती एके दिवशीं सकाळीं प्रातर्विधी करितां एका शेतांत गेली. तेथेंच प्रसूत झाली, मुलगी झाली. तिच्यावर सावली करण्या करितां म्हणून जवळच शेतांत पऱ्हाट्या उपटूं लागली. अर्थात लहान मूल झालें त्या जागींच पडूं दिलें. दुसऱ्या कांहीं बाया तिकडे प्रातर्विधी करितां गेल्या त्यांनीं मुलीचें रडणें ऐकून एका पोलीस शिपायास खबर दिली. शिपाई भवानसिंग यांनीं जाऊन तें मूल उचलून आणिलें मग दवाखान्यांत पाठविलें, व पुन्हां मंजुळा इला ही दवाखान्यांत नेलें. ह्या बाईवर मूल माने पर्यंत वरळीच्या मातींत पुरून ठेवून त्याचा खून करण्याचा प्रयत्न केला असा आरोप ठेवून मुकदमा चलावन झाला. तो खामगांव येथील वर्ग १ मा० वि० क्राफर्ड यांनीं सेशन कमिट केला. चौकशी अंतीं मंजुळा निर्दोषी आहे असें ठरलें व तिला सोडून दिलें.

## जठार व महाजनी यांचा किस्सा.

( शाळा खात्यांतील इन्स्पेक्टरांच्या अरेरावीपणा विषयीं एका शिक्षकाचे उद्गार. )

शाळा खात्यांतील इन्स्पेक्टर हे पूर्वी शिक्षक असून नंतर इन्स्पेक्टर झालेले असतात असें बहुधा आढळेल. शिक्षक असतांना जे यांचे विचार असतात व इतर शिक्षकांच्या संबंधानें यांच्या अंगी जी सहानुभूति असते ते विचार व ती सहानुभूति पुढें राहत नाहीं असें अनुभवानें दिसून आलें आहे. कांहीं वर्षां मागें एक गृहस्थ एका इंग्रजी मराठी शाळेचे हेड मास्तर होते. तालुक्यांतील मराठी शाळेचे मास्तर त्यांच्या भेटीस येत तेव्हां ते हेड मास्तर व हे छोटे मास्तर असे मिळून त्या वेळच्या इन्स्पेक्टरांच्या परीक्षावर व वर्तनावर कांहीं गोष्टी संबंधानें टीका करीत. पुढें सदहू हेड मास्तर इन्स्पेक्टर झाले व बहुतेक अंशीं पूर्वीच्या इन्स्पेक्टरा प्रमाणें वागूं लागले. एके प्रसंगीं मराठी शाळांचे मास्तर या नवीन इन्स्पेक्टर साहेबां पुढें जमले असतां पूर्वीची सलगी असल्या कारणानें एका शिक्षकानें त्यांस म्हटलें “ राव साहेब गुदस्तां पर्यंत या गोष्टीं बद्दल आपण व आम्ही विरुद्ध चर्चा करीत होतों व या गैर आहेत असें म्हणत होतों. आणि हल्लीं त्याच गोष्टी आपण स्वतः करित आहां. आम्हाला उमेद होती कीं आपल्या कारकीर्दींत या गोष्टींची सुधारणा होईल. ” यावर इन्स्पेक्टर साहेबांनीं उत्तर दिलें; “ अहो तेव्हां आम्ही मास्तर होतों म्हणून तसें बोलत होतों आतां इन्स्पेक्टर झालों आहों तेव्हां असेंच बोललें पाहिजे ” ही ज्यांची गोष्ट आहे ते इन्स्पेक्टर हल्लीं पेन्शनर आहेत, या इन्स्पेक्टरांनीं आपले विचार बोलून दाखविले इतकेंच काय तें. बाकी जे इतर इन्स्पेक्टर आहेत त्यांचेही विचार असेच आहेत असें त्यांच्या कृतीवरून स्पष्ट दिसतें. शिक्षक असतांना ज्यांना इतरां बद्दल कळकळ वाटेत व त्यांस न्याय इन्साफ मिळावा असें वाटतें तेंच पुढें जुलमी व अन्यायी निपजावे ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे यांत शंका नाहीं.

गेल्या कान्फरन्सच्या वेळीं रा. रा. आण्णा साहेब महाजनी यांनीं शिक्षकांस व इन्स्पेक्टरांस जो बोध केला यांत अरेरावीपणा न करण्यासंबंधानें उभयतांस सूचना केली होती, तिच्या मुळाशीं हे वर निर्दिष्ट केलेले विचार असावेत. अरेरावीपणा हाच शब्द त्यांनीं जोर देऊन बऱ्याच वेळा वापरला होता. जे शिक्षक विद्वान् असून इंग्रजी मराठी शाळांच्या हेडमास्तरांचें पुष्कळ वर्षे काम करून अनुभवलेले असतात व एकंदर सर्व शिक्षकांबद्दल ज्यांच्या ठिकाणीं सहानुभूति उत्पन्न झालेली असते, तेच शिक्षक इन्स्पेक्टर झाल्यावर ज्या अर्थीं अरेरावी निपजतात त्या अर्थीं या इन्स्पेक्टरीच्या पेल्यामध्यें कांहीं तरी मादकपणा आहे व म्हणूनच ती थोडीबहुत अंगांत आल्या वांचून राहात नाहीं असें म्हणावें लागतें.

रा. रा. महाजनी साहेबांनीं कान्फरन्सच्या वेळीं इंग्रजी मराठी शाळेच्या हेड मास्तरांस व इन्स्पेक्टरांस आपल्या हाता खालच्या लोकांस कसें वागवावें याबद्दल जो उपदेश केला तो अत्यंत आवश्य होता डे० इन्स्पेक्टरांस मराठी शाळांचे हेड मास्तरांवर जुलूम करण्याची संवय असल्यामुळें आपल्या बरोबरीच्या इंग्रजी शाळांच्या हेड मास्तरांस ते तसेंच वागवूं पाहतात ही त्यांची मोठी चूक आहे. डे० इन्स्पेक्टर इंग्रजी मराठी शाळांवर अंमल करण्यास योग्य नाहींत. सरकारानें एज्युकेशनल इन्स्पेक्टरची जागा मोडून टाकिल्या मुळें इंग्रजी मराठी शाळा डे० इन्स्पेक्टरांच्या ताब्यांत आल्या आहेत ही मोठी दुःखाची गोष्ट होय. तथापि जर डे० इन्स्पेक्टर उदार मनानें आपलीं कामें करतील तर अशा प्रकारचें दुःख प्रदर्शन करण्याचें कारण पडणार नाहीं. दुसऱ्याला थोरपणानें वागविल्यानें आपला मान कमी होतो असें डे० इन्स्पेक्टरांनीं बिलकूल मनांत समजूं नये. फुसक्या इन्स्पेक्टरी सारख्या पेल्याचा अंमल जर त्यांस जिरवितां आला नाहीं तर याहून अधिक अंमल करणार पेले त्यांस कसे पचवितां येतील. अखेरीस सर्व इन्स्पेक्टरांस एवढेंच सांगणें आहे कीं के० रा० ब० जठार व रा० रा० महाजनी साहेब या सारखे कित्ते डोळ्या पुढें ठेवून त्यांनीं वागावें म्हणजे हाता खालच्या लोकांस ते प्रिय होऊन कामेंही अधिक चांगल्या रीतीनें चालतील.

## गरीब वाघ

गेल्या २३ वे तारखेला सकाळीं ७ वाजतां एक मोठा वाघ पातूर शेखबाबू येथें गांवात शिरून पार्वतीबाई देशमुखीण इच्या घरीं गढीची भींत चढून आंत आला, आणि घरांत ओसरीवर उभा राहिला. जवळच बारा वर्षांचा मुलगा निजलेला होता. वाघाला पाहतांच पार्वतीबाई घाबरली आणि

तिनें आरोळ्या मारल्या. मुलाला तीन चार हातावरून हांक मारून उठविलें आणि मुलगाहि जीव घेऊन पळत बाहेर आला. वाघ सर्व वेळ स्वस्थ उभाच होता. नंतर दरवाजा वाटे बाहेर पडला आणि लालखाच्या घरांत शिरला. लागलींच एका बाईनें तेथील दोन पोरें तंगडी धरून बाहेर काढली आणि लालखा आरोळ्या मारतांच वाघ हळूं हळूं चालूं लागला. लालखा मागोमाग पाठलाग करीत होता इतक्यांत तेथील जहागिरदारांनीं बंदुकीनें त्यांस ठार मारलें. लोकांपाशीं शस्त्रास्त्रें सरकार रहूं देत नाहीं हें ठीक नाहीं. वाघ फारच थोर मनाचा खरा पण त्याच्या पेक्षां वरील दोन्ही बायांची बहादरी मोठी होय।

The Berar Samachar

MONDAY JULY 1 1901

It is a difficult task for a community to adapt itself to the new exigencies in the political and social world. So we have found our task of imitating the English institutions most onerous and responsible. In this race of acquiesing in the new modes of the British system we have seen that our Mahomedan brethren are more conservative and more backward than the Hindu community. The old catholic spirit is still observed in the Mahomedan people. In the matter of the English education they are far behind the Hindus. The present spread of education does not as easily reach the Mahomedans as it does the Hindus. It is a great disadvantage that the two great components of the Indian people fail to keep equal pace with the progress of education. The slow progress of our people acts like a brake to the general upheaval of the Indian nation. All efforts should be directed to bring up our Mahomedan friends to the same level as that of the Hindus. We are therefore more particular when we have to welcome good and substantial efforts in this direction. The question is not dividing one community as against the other. Our aim is to pull them together so that they may co operate in the work of the national prosperity.

There is now a fair proposal to remove the in equalities in the course of the High-school education. It is proposed to request the Government to open a high-school where instruction will be imparted in the Urdu language. In the provincial High—schools the teachers teach in Marathi and hence the Mahomedan students feel it a great difficulty to follow them. It is not so much a Mahomedan or a Hindu school that is the subject—matter of the proposal. The Ellichpore people come forward to move the Government and ask of them some provision to impart higher education in the Urdu language. There is an ample provision for learning in Marathi the High school standards but there is no such provision for students who having learnt the Urdu primers want to study higher standards in their familiar Urdu tongue. We are glad to support the proposal of the Ellichpore people, and hope that the Government will do their best to lend their pecuniary support to such a demand from the backward people. Our opinion runs counter to that of our learned contemporary of Amraoti. There is no likelihood of a split between the two communities but we are hopeful that many Hindu students will begin with the Urdu primers and acquire competency in that language when there will be a High school where all instruction will be imparted in Urdu. The special advantage will be for the Mahomedan students but it will be an inviting suggestion for the Hindu students to master up their studies in Urdu. Our politcal connection with His Highness the Nizam and our necessity to learn Urdu as one of the colloquial languages necessitate the existence of a High school on the lines of the Ellichpore proposal. It is immaterial whether there be a separate High school or a full teachers' staff be granted to one High school to teach Higher standards in Urdu. We are quite prepared to uphold the proposal of the Ellichpore people amongst whom, it should be remembered, there are many respectable Hindus who vote for it with all their heart.

The question of cost is the next ground upon which the proposal is objected to. In the first place the Government have not been spending sufficient money for the educational requirements of the province. The recent policy of retrenchment is something like adding an insult to an injury. Under such circumstances any proposal is welcome that compels the government to spend something and that too for affording educational facilities to the backward classes of the Indian people. We see that there are Urdu primary schools. Their necessity is granted on all hands and we wonder how difficulties gather up in the mind of our Amraoti contemporary when there is a demand for a High school where higher standards will be taught in Urdu as well as they are at present taught in Marathi. The question is very simple. A High school on the new plan will attract a larger number of Hindu and Mahomedan students & there will be no real objection on the ground of paucity in the number of students. Further it should be noted that the feeder schools which send students to the High schools show a great increase in the number of Urdu students and there is a very great demand for adding English standards to the Urdu primary schools. We think that these are good signs for a further progress in the Urdu vernacular and hope that the new proposal will be received with the greatest possible consideration for the welfare of the mahomedan community. There is really no difference of opinion when our contemporary proceeds to argue that teachers in High schools should be required to possess a fair knowledge of Urdu and to pass a special test in it. It is too much to expect of our teachers but this portion of his argument proves the correctness and soundness of the proposal.

## वऱ्हाड

हवामान——पावसानें मोठी बहार करून दिली. पाऊस फार चांगला झाला आणि कपाशीची पेरणी झपाट्यानें चालूं आहे. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे.

मे. रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमिशनर बुढाणा हे रजेच्या अखेरीला परवां आकोल्यास आले असून लवकरच बुलढाण्यास दाखल होतील.

मि० अजिजुद्दीन असि० कमिशनर हे बुलढाण्यास जातांना येथें राजा इंद्रकरण यांच्या बंगल्यावर दोन दिवस उतरले होते आणि शुक्रवारीं येथून बुलढाण्याला रवाना झाले.

क्या० कोलंब्र साहेब मे० रुस्तुमजी साहेबांस बुलढाण्यास चार्ज देऊन नंतर उमरावतीच्या डेपुटी कमिशनरच्या जागीं रुजूं होतील आणि क्या० मारिस तेथेंच असि० कमि० चें काम पाहूं लागतील.

## जाहीरनामा

सी. क्लास २१ पैकीं नंबर ३

१९०१

वि० सी० जडज साहेब बहादूर
जिल्हा बुलडाणें
यांचे कोर्टांत.

| | |
|---|---|
| लक्ष्मी नारायण वल्लद ब्रिजभूकन अ. पा. मातोश्री भागी मर्द ब्रीजभूकन तर्फे मु० हनुमानदीन वल्लद मातादीन राहणार बुलडाणें. | अर्जदार |

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं सदर्हू अर्जदार यानें मयत ब्रीजभूलाल याचे पैसे पोष्ट बँक व फॉरेष्ट ऑफिसर लोकांचा प्राव्हीडन्ट फंड यांत ठेविले आहेत ते खालीं लिहिल्या प्रमाणें.

| | |
|---|---|
| २३७० | पोष्ट ऑफिस सेव्हिंग बँक बुलडाणें. |
| १३१३॥-॥। | फॉरेस्ट ऑफिसर लोकांच्या प्राव्हिडेन्ट फंडांत. |

३६८३॥-॥।

एकून रुपये ३६८३॥-॥। सदर्हू बॅकेंतून व फंडांतून काढण्यां करितां वारसाचें सरटिफिकीट मिळावें ह्मणून ता. २४।६।०१ इ. रोजीं अर्ज दिल्या वरून सदर्हू अर्जाची चौकशीची तारीख १०।८।१९०१ इ. ची नेमिली आहे. तरी सदर्हू संबधांत ज्याची हरकत असेल त्यांनीं सदर्हू सरटिफिकीट अर्जदारास कां देऊं नये याचें कारण दाखविण्या करितां वरील चौकशीचे तारखेस आमचे कोर्टांत सकाळचे १० वाजतां हजर व्हावें. कळावें ता. २९।६।१९०१ इ.

सही
Sk. Ismail
सिव्हिल जडज्य.
बुलडाणा.

## जाहीर नोटीस

रा. विश्वनाथ बल्लाळ दामले, भुसावळ नागपूर रेलवे पोलीस, स्टेशन चांदूर येथील माजी रेलवे इनस्पेक्टर व रा. माधवराव काशीनाथ ऊर्फ आबासाहेब देशपांडे वस्ती कजबे चांदूर या उभयतांस:—

जाहीर नोटीस देणार महंमद अशरफ वल्लद ज्यानमहंमद वस्ती कजबे चांदूर याजकडून देण्यांत येतें कीं कजबे चांदूर येथील शेत सर्वे नंबर १९४ यांतील हिस्सा चार आण्याचा, शेताचा मालक सोनाजी वल्लद जानबी राणे याजपासून आह्मी खरिदी घेतला असून सदर्हू इनस्पेक्टर यांजवळ ताबेगहाण २०० रुपयावर आहे. ते रुपये आह्मी खरिदी घेतल्यापासून देण्यास तयार आहों पण रा० दामले यांचा बरोबर पत्ता नसून यांचे तर्फे सदर्हू देशपांडे यांजजवळ सर्व कागदपत्र असल्याचें कळल्या वरून आह्मी त्याकडे खरीदी घेतल्या पासून २।३ वेळां रुपये घेऊन गेलों असतां हो हो ह्मणून रुपये घेतले नाहींत. सदर्हू रुपये २०० आह्मी रा. संपतराव पर्वतराव देशमुख दुकान मलकापूर यांचे दुकानावर ठेविले आहेत. वाटेल तेव्हां रुपये घेऊन जावे व त्याजला कायदेशीर पावती द्यावी.

सदर्हू शेतास तुमचे तर्फे कोणी इतःपर ताबा घेण्यास हरकत केल्यास दिवाणींत फिर्यादी करून कोर्ट खर्च व पिकाचें व इतर नुकसान असें भरून घ्यावें लागेल. नुकसान हरकत करणारा जवळून भरून घेऊं. कळावें तारीख २८ माहे जून सन १९०१ इसवी.

सहीची निशाणी
महमद अशरफ वल्लद जान महमद मुसलमान रहाणार विश्वा
चांदूर यांचे हातची
कलदार.

## नोटीस

बेशमी बचुलाल गोंदुलाल साहू दुकान अकोला. यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं रिधोरें येथील सर्व्हे नं. ११ चें शेत माझ्या मालकीचें असून त्याची वहिवाट मीच करीत आहे. तुह्मी गैरकायदा शेताचा ताबा काढून घेण्या साठीं येऊन दांडगाई कराल तर त्याची दिवाणी व फौजदारी कडील जबाबदारी तुह्मावर राहील. मी तुह्मास ताबा देणार नाहीं. सर्व शेतांत मी कष्टमशागत करून कपाशी पेरली आहे. कळावें. तारीख ३० जून सन १९०१ इ.

सही
बन्याबाई मर्द माधवराव देशमूख
राहणार रिधोरें निशाणी
बांगडी'

## नोटीस

नोटीस बेशमी महादेव वल्लद रामजी झाडे जात कुणबी रहाणार भांब प्रगणें राळेगांव तालुके केळापूर यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्नास बरेच दिवस झालेत. त्यांत तूं मला कांहीं दिवस नांदविलेस. हल्लीं तीन वर्षे झालीं मला तूं अजीबात नांदविले नाहींस. माझा बाप तुजकडे मला घेऊन आला असतां पंचा समक्ष तूं मला नांदविण्याचें नाकारिलें. तेव्हां पासून मी आपले बापाचे घरींच आहे. दुष्काळ दिवस कठीण गेल्यामुळें आज पावेतों माझे अन्नवस्त्रा बद्दल खर्च एकंदर रुपये १५० दीडशे झाला. तो तूं नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसांचे आंत स्वतः माझे बापास आणून द्यावा व मजला घेऊन जावें; नाहीं तर हीच नोटीस फारकती समजून मी दुसरे ठिकाणीं दुसरा घरठाव करीन. पुढें तुझी तक्रार ऐकिली जाणार नाहीं व मजवर तुझा कोणतेच प्रकारचा हक्क रहाणार नाहीं. कळावें तारीख २७ माहे जून सन १९०१ इसवी.

सही
जनी मर्द महादेव झाडे रहाणार
गुजरी प्रगणें राळेगांव,
हिच्या हातची निशाणी बांगडी

## नोटीस

गुणी ऊर्फ मुक्ती मर्द पिरथन वल्लद जानजी भालतडक राहणार पाटखेड तालुके आकोला ईस:—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझ्या भावाची पाटाची बायको होतीस, माझा भाऊ मरण पावल्यामुळें तूं आपले आईबापाचे घरीं जाऊन राहिली आहेस व तूं दुसरा पाटाचा नवरा करणार असें आमचे ऐकण्यांत आलें आहे. आमचे घरीं तुझे अंतःकाळा पावेतों तुजला अन्नवस्त्र देण्याची आह्मांस ऐपत आहे परंतु तुझा मानस आमचे जवळ राहून आयुष्य काढण्याचें नाहीं असो. आमची ह्या बाबतींत तुजला बिलकूल मनाई नाहीं. तूं तरूण आहेस त्याअर्थी दुसरा घरठाव केल्यास कांहीं अडथण नाहीं परंतु तुजला या नोटीशीनें एवढेंच कळविलें जातें कीं तुझे अंगावर आमचे मालकीचे डागिने चांदिचे वजन तोळे ९१ चे आणि ९० रुपये नगदी व सोन्याचे डागिने तोळा १८२ मासे दोनचे आहे ते आह्मांस देऊन आमची पावती घ्यावी तसें न केल्यास आह्मांस तुझे वर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिशीचे खर्चासमेत व कोर्ट खर्चासमेत दागिने व रुपये तुझे पासून आह्मांस घ्यावे लागतील. तर ही नोटीस दिल्या पासून आठ दिवसाचे आंत आमचे डागिनें आणून द्यावे व आमची पावती घेऊन जावी. ही नोटीस दिली.

कळावें ता० २६।६।१९०१ इ०

(सही)
गणु वल्लद जानजी भालतडक
राहणार मौजे पाटखेड
निशाणी रेघ खुद्द हातची असे.

---

## वर्तमानसार

ट्रान्सव्हाल मधून इंग्लंडनें जर आपलें सैन्य काढून नेलें तर ह्यांच्या पाठोपाठ जर्मन लोक आपले सैन्य पाठवतील. दर महिन्यास पन्नास हजार या प्रमाणें ६ लाख जर्मन सैन्य आफ्रिकेंत सहजावारी येईल. मुत्सद्दी प्रिन्स बिस्मार्कें एकदा असें ह्मणाले होते कीं, इंग्लिश साम्राज्याचा अखेरचा नाश आफ्रिकेमध्येंच होणार. व हें भाविष्य खरें करून दाखविण्याचा जर्मनीचा बेत दिसतो. ट्रान्सवालांतील सोन्याच्या खाणीवर त्यांची डोळ्यांत तेल घालून नजर लागलेली आहे. व लढाईच्या शेवटच्या प्रसंगासाठीं उत्तम क्षारमाराची कडेकोट तयारीहि सुरूं आहे. जर्मनीचा हा कावेबाजपणा इंग्लंडच्या लक्षांत आला नसेल असें नाहीं व त्यांनींहि त्याच्या बरोबर वेळ पडेल तर सामना टोकतां यावा ह्मणून आपला अंतःस्थरीतीनें बंदोबस्त केला असेलच.

हालंद देशांत असा नियम आहे कीं लग्न झाल्यापासून राजाला पांच वर्षांत जर मूल झालें नाहीं तर तो राजविवाह रद्द करावा.

वेस्टन नांवाचे स्टेशन जगांत फार मोठें आहे. या स्टेशनाचा विस्तार ३६ एकर असून त्यांत १ लक्ष मनुष्यें राहतील एवढा मोठा प्लॅटफार्म आहे.

महार कुळकर्णी-वाई तालुक्यांतील मौजे पसरणी गांवीं एका कुळकर्ण्याचें जागीं तेथल्याच एका महाराची नेमणूक झाली आहे हा महार परीक्षा पास झालेला नाहीं किंवा मोठा काम करणाराही नाहीं. कुळकर्णी घराण्याचा हक्क निष्कारण बुडवून व त्यांच्या जागीं झालेल्या एका भाऊबंदाची नेमणूक रद्द करून महाराची नेमणूक करण्यांत तेथल्या आफिसरांनीं काय शहाणपणा केला असेल हें त्यांचें त्यांना माहीत.

विलायतेंतील क्लॅरेंडन प्रेसमध्यें जगांतील सर्व भाषांचे छापण्याचें काम करितात.

उत्तर इजिप्तांत बिलकूलच पाऊस पडत नाहीं ह्मणतात.

एका आठ दिवसांत हिंदुस्थानांत एक लक्ष इंग्रजी बूट खपतात. पहा किती परकीय मालांनीं हा देश गुरफटून टाकला आहे तो !

बागेंतील किडे मारण्यासाठीं फ्रान्समधील माळी लोक बेडूक विकण्याचा धंदा करितात.

हिंदुस्थानांत आपल्या हातून मांजर मेलें तर एक सोन्याचें मांजर करून त्याची पूजा करावी लागते व काशीस जाऊन ह्या पापाचें क्षालन करावें लागतें. तसेंच इजिप्त मध्यें मांजर घरीं मेलें. तर मालकास भिवया काढाव्या लागतात. व कुत्र्याबद्दल क्षौरविधी करावा लागतो.

फ्रांस देशांत मेलेल्या रोग्याच्या इस्टेटीवर त्याच्या वैद्याचा प्रथम हक्क असतो. डाक्टरांची चैनच झाली. रोग्याला जीवन्मुक्त करून पैसा उपटावा.

साखर गोड खरी पण तिच्या सेवनानें कंठ मधूर न होतां उलटा बिघडतो. गाणारांनीं शर्करा वर्ज्य करावी हें बरें.

पोलिसांची जाचणी— डेराइस्मायल जिल्ह्यांत कांहीं आरोपींच्या कडून कबूली जबाब काढण्यासाठीं तेथील अजागळ पोलिसांनीं त्याचे हात बांधून त्यांस लोंबकाळत ठेविलें होतें व त्यांच्याहि पाठीवर बसत असत. शिवाय त्यांच्या तोंडास घाणीचे तोबरेहि देत होते. ह्या दांडगाईच्या वर्तनासाठीं ह्या पोलीसास शिक्षा झाली. पोलिसांनीं कर्तबगारीनें, कुशलतेनें व चतुराईनें काम करण्याची हौस बाळगावी.

चांगली गोष्ट—बाबू परेशनाथ मिश्र कलकत्ता यांनीं शास्त्रीय यंत्रें तयार करण्याचा कारखाना घातला आहे. यांच्या यंत्राची प्रसिद्ध शास्त्रज्ञांनीं स्तुती केली आहे. विजेचा पट्टा, घाट, टेलिफोन वगैरे यंत्राबद्दल त्यांस उत्तम सरटिफिकीटें मिळाली आहेत. हेंच उदाहरण दुसऱ्यांनीं घ्यावें. आपली उद्योगवृद्धि अशानेंच होणार आहे.

एका रूळा वरून चालणारी गाडी:— मांचेस्टर व लिव्हिरपूल या मध्यें सुरूं होणार आहे. दर तासास ११० मैल ही गाडी चालेल.

चीनच्या बादशहास एका वर्षांतून दोन महिने कडकडीत उपोषणें करावीं लागतात.

लंडन शहरांतील व्यापारी लोक दर आठवड्यास नुसत्या जाहिरातीच्या पायीं तीन कोट रुपये नासतात. बघ्याचें सर्वच बडें !

जर्मन बादशहास आपल्या राणीला लहानलहान गोष्टी वाचवून दाखविण्याची फार हौस आहे. वाचनाची हौस वाईट नाहीं.

इटालीच्या राणीची बायसेकल सर्व सोन्याची आहे ह्मणतात.

आफगाणिस्थानच्या अमिरानें इराणच्या शहास एक हातानें लिहिलेलें कुराण नजर केलें, त्याची बांधणी सोन्याची असून तीवर रत्नें व मोत्यें बसविली आहेत त्याची किंमत साडेचार लाख रुपये आहे.

मुंबई येथें एक दारू पिऊन झिंगलेला मनुष्य, रेकल्यांत बसून रात्रीचा माहीम रस्त्यावरून चालला असतां निजेंत त्याच्या पागोट्याचा पदर गाडीच्या चाकांत अडकला. आणि पागोट्याचा त्याच्या गळ्यास फास बसून तो प्राणास मुकला. सु०

मोरोक्को देशांत चहाडी अगर निंदा करणाऱ्यास शिक्षा लावण्यासाठीं त्याच्या लांब व लबाड जिव्हेस काळ्या मिरीची भुकटी जोरानें चोळतात ह्मणजे मग जन्माची आठवण त्यांस रहाते. जीभेला कह्यांत ठेवण्यासाठीं हें एक डाग देणेंच होय.

मोरोक्कोच्या बादशहाच्या राजवाड्यांतील एका खोलींतून दुसऱ्या खोलींत जाण्याकरितां लहानशी आगगाडी आहे. भोक्ता व चैनी राजबिंडा खरा.

सुमारे १२ लाख रुपयांच्या आगकाड्यांच्या पेट्या हिंदुस्थानास लागतात. व ह्या सर्व स्वीडन, जपान, बेलजम वगैरे परदेशाहून येतात. स्वदेशी आगकाड्या होणें फार जरूर आहे.

एक लक्ष घोडेस्वारांचे सैन्यदल आपलें झालें ह्मणजे बोअर लोकांत त्राहित्राहि करून सोडूं अशी लार्ड किचनेर साहेबांची फार उमेद आहे. एकदां असें होऊन जाऊं द्या ह्मणजे कर्मकटकट तरी चुकेल. डीवेट व डेलारी हे सरदार समरांगणांवर पुन्हां ताजतवाने होऊन दंड ठोकून उभे राहिले आहेत. इंग्रज शिपायांचा खाण्यापिण्याचा व कपड्यालत्याचा डामडौल व खर्च फार. पण अंगांत पाणी तरी तसें पाहिजे होतें. ट्रान्सवाल मधला एकून एक बोअर जीव नाहींसा केल्यासेरीज इंग्रजी राज्यास स्वस्थता वाटणें दुरापास्त होय. ज्याप्रमाणें एका मारुतीच्या शेपटानें सर्व लंका नगरीचे जाळून भस्म केलें त्या प्रमाणें एखादा कानाकोपऱ्यांत राहिलेला बोअर वीर सर्व इंग्रजी सैन्यास केव्हां अनिवार होऊन जाईल याचा नेमच नाहीं. इंग्रजा सारखें त्यांचें बाहुबल, व श्रीबल असतें तर ह्यांनीं परशुरामाप्रमाणें किती वेळांतरी अखंड पृथ्वी निर्वीर करून सोडली असती ! ह्या लढाईचा चांगला शेवट लावून देईल असा कोणी वीर किंवा मुत्सद्दी पुरुष सर्व ह्या इंग्रजी अफाट साम्राज्यांत मिळूं नये काय ?

वर्तमानपत्राचे धाडसी बातमीदार— लढाईच्या ऐन दंग्याची तावडतोब बातमी मिळवून ती सर्वांच्या आधीं लोकांच्या हातांत ताजी पडावी व त्यांच्या मनाची उत्कंठा तृप्त व्हावी ह्मणून ते बातमीदार शत्रूच्या तुरुंगांत पडून व येतील त्या अपेष्टा सोसूनहि बातमी धाडतात शाबास ! हातचे काम करावयाचें मग कांहीं हि विघ्नें येवोत असाच निर्धार सर्वांनीं ठेवावा.

पूर्वसंकेता प्रमाणें द्वारकेस श्रीमत् माधवतीर्थ यांनी आषाढ शुद्ध २ येस शारदा पीठाच्या गादीवर संस्थापना झाली. सर्व नगरी अनंदोत्सवांत दंग झाली होती. श्रीजगद्गुरु हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करतील अशी फार आशा आहे.

उत्तर आफ्रिके मधील अलजेरिया ह्या प्रांतांत फ्रेंचाची सत्ता आहे. पण तेथील इंग्रजी मिशनरी लोक तेथील मुसलमान लोकांस फ्रेंचा विरुद्ध उठण्यास चिथवीत आहेत व त्यांस फुकट हत्यारें पुरवीत आहेत. ह्मणून त्यांस अलजेरीयांतून काढून द्यावें अशी सूचना फ्रेंच लोकांनीं आणिली होती ती नापसंत झाली. मिशनरीच्या छंदानें चीनाची राखरांगोळी झाली. व आणखी अलजिरिप्रांतहि हा युद्धकुंड पेटवून देण्याची दुष्टबुद्धि ख्रिस्त न देवो ह्मणजे झालें.

### अद्भुत गाडी

अंतरीक्षांत भ्रमण करण्यासाठीं तऱ्हतऱ्हेच्या विमानांच्या युक्त्या अद्याप सुसफल झाल्या नाहींत. पण आकाशांत हवे मधून अंतराळी चालणारी गाडी चांगली तयार होत आहे ही गोष्ट ऐकून तो विश्वकर्ता ह्या भूतलावर अवतरला आहे असा खरोखरी भास होऊं लागल्यास काय आश्चर्य आहे! जें स्वर्गीचें सुख पुण्य कीर्तिमान् महात्म्यानींच सदैव अनुभवीत रहावें त्या सुखाचा एक थेंब का होईना, ह्या मर्त्य लोकांना क्षणभर तरी मिळावा अशी अनुपेमय उदार बुद्धीनें त्यांनीं आपणा साठीं खालीं धाडिला आहे हें आपलें केवढें भाग्य होय. पण ह्या क्षणीक आनंद सागरांत बुडून न जातां ज्या परमेश्वर कृपेनें हा पूर्व पुण्यभाग फळास आणिला त्याचा कधींहि विसर पडूं देऊं नका आणि त्यास आपल्या प्रेमभक्तिभावानें त्याचे गुणसंकीर्तन करून आपलासा करून घेण्याचा यथामती प्रयत्न करण्यास लागा ह्मणजे ॥ हेंचि जन्मा आलीयाचें फळ, कीं विठ्ठल करावा जवळ ॥

वरील अद्भुत गाडी अमेरिकेंतील अचाट कल्पक व बुद्धीमान् इंजिनिअर लोकांनीं काढली आहे. कालिफोर्निया मधील सीरा पर्वताच्या चारी कडील चार शिखरावर मोठमोठे जंगी स्तंभ उभारून खूप खोल पर्यंत जमिनींत पुरावयाचे व एका शिखरावरून दुसऱ्या शिखरा पर्यंत चांगल्या मजबूत गाड्या लोंबकळत ठेवावयाच्या. ह्या गाड्या विजेनें चालतील. सुमारें २०-२२ लोक बसण्याची सोय होईल. एका पर्वतशिखरा वरून ती गाडी सुटून कीं खूप खोल गेली कीं लगेंच वीज सुरूं करावयाची. ह्मणजे त्या

(पुरवणी पहा)

REGSTERED N. No. 4

सहामाही „ २ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ८६
दुसरे खेपेस .... .......८१

Annual in arrears ...
Six monthly........ 3 .............. 8 as
Single copy ........................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY 8 JULY 1901 NO 26

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख ८ माहे जुलै सन १९०१ इ० अंक २६

## मोरोपंत

निवडक वेंचे

( २५ व्या अंकावरून पुढें )

विराट पर्वांतील पुढील आर्या पहा.

अ. १

सैरंध्रीविषयीं सुदेष्णेचें अनुमोदन मिळवून,

लब्ध तदनुमोदन तो,
जंबुक सिंहीस; कीं, सकाम उसा ॥
व्याघ्रीस; सतीस बळें,
शांतीस वराश्रयासि तामसा ॥ ४६
रावणसा बहु विनवी,
प्रेम प्रत्यक्षरींहि नव दावी ॥
कीचक नीच कलुषनिधि,
त्याची आयंत गोष्ट न वदावी ॥ ४७

मद्य आणण्या करितां सैरंध्री कीचकाचे घरीं गेली असतां,

कीचक विलोकुनि ह्मणे,
त्रिजगद्गुरुविष्णुप्याहि आलीस ॥
रंभाचि सुदति ! तूं या,
नलकूबर मंदिरासि आलीस ॥ ६१
सर्वस्व अर्पितों तुज,
देवि ! करीं पूर्ण काम हो दारा ॥
विकत मिळता स्मित सुधा--
लेशें घेशी न कां मदोदारा ॥ ७२
इत्यादि नीच कीचक,
दुष्कर्मीची धरुनि आस वदे ॥
कृष्णा वदे सुदेष्णें,
करितां पात्रीं भरुनि आसवें दे ॥ ७३

सैरंध्रीचा अपमान कीचकानें केला ह्मणून राजपत्नी तिचें समाधान करिते.

कळतां ह्मणे सुदेष्णा
' नाहींच विचार कीचकीं अधर्मीं ॥
सखि उगि ! जरि ह्मणशिल तरि,
करिन तव सुखार्थ बंधुचा वध मी ' ॥८०
( सैरंध्री भीमसेनाकडे गेली. )
जाय निशीथीं साध्वी,
दावी तिस तत्प्रभाचि वाट तमीं ॥
चित्तांत ह्मणे भीमा !
दयिता! दयिता नसेन वाटत मीं ॥८३

१ सुदेष्णेचें अनुमोदन. २ कीचक. ३ कामातुर ४ तमोगुण संपन्न मनुष्य ५ पातक समुद्र ६ तीन लोकांचा गुरु विष्णु ( कृष्ण ) त्याच्या. ७ सखीस. ८ कुबेरपुत्र ९ मंद हास्यरूपी अमृताचा अल्पांश १० महा उदार -कीचक- महा उदार अशा या कीचक महाराजांस स्मित सुधालेश देऊन विकत मिळत असतांही कां न घेशी? ११ मद्य १२ अर्धरात्रीं. १३ द्रौपदी १४ अंधकारांत १५ प्रियकरा भीमा! १६ मी प्रियनाथा अशी वाटत नसन ?

भीमसेन पुसतो —
दयिते कां आलीस ? प्रमदे !
हा आंद्रे कां पदर जाये ? ॥
भ्यालीस भीरु ! भय कां,
भटें खालाचि कांव दरें ज्या ये ॥ ८९
तूं काय ? भर भामिनि !
उतरसि मांडीवरूनि कां बस ये ॥
झालें काय ? वद सुदति ! सुमुखि !
सति ! रडूं नकोचि थांब सये ! ॥ ९०

वर दिलेल्या, आणि खालीं देत आहों या आर्यांची योग्यता केवढी आहे याचा विचार रसिक वाचक करोत, अशी विनंति करण्यास्तव, कथांचा कडे अलक्ष करून येथें क्षणभर थांबल्या शिवाय राहवत नाहीं. बहुत विद्वानांचें असें मत आहे कीं, उद्दिष्ट विषयाशीं कवीच्या हृदयस्थ भावनांचें येथें ऐक्य झालें असून मृदूवर्ण योजना अथवा यथार्थ शब्द योजना करण्याचें अनुपम चातुर्य हीं येथें प्रकट झालें आहे. असें नसतें तर या भागास इतके माधुर्य न येतें.

काव्याचे अशा प्रकारचे भाग कपाटांत पडून राहण्यास योग्य नाहींत असकृत प्रकाशांत येणें हाच त्यांच्या अस्तित्वाचा सुपरिणाम होय.

कोणाहि व्यक्ती विषयीं अथवा वस्तू विषयीं व्यर्थ अभिमान कोणी बाळगूं नये. खोटी स्तुति अथवा खोटी निंदा हीं दोन्ही त्याज्य होत. पण रत्न पेटींत बंद करून ठेविलें आणि त्याच्या योग्यतेची तारीफ केली तर ती खरी कीं खोटी हें समजावें कसें ? परीक्षकांच्या अग्रभागीं तें वारंवार मांडून ठेवणें हाच त्याची खरी योग्यता कळण्याचा मार्ग होय. अशा रत्नाची परीक्षा करण्याची चांगली साधनें साम्प्रत उपलब्ध असून सारासार विचाराची जागृति व प्रसृति लोकांत अधिक होत आहे. दुरभिमान व मत्सर यांच्या योगें साधूंची व कवींची प्राचीन काळीं छळना कशी झाली तेंहि आह्मांस पूर्ण अवगत आहे ह्मणून तसा अन्याय होण्याची प्रस्तुत भीति धरावयास नको.

प्रस्तुत कवि, हा जर आमच्या भाषेंतील खराच थोर कवि आहे, तर त्याची थोर योग्यता जाणणें, हें आमचें बुद्धिवैभव, सुशिक्षण, विद्याव्यासंग व गुणग्राहकत्व, यांचें आद्य व पवित्र कर्तव्य आहे.

या कवी विषयींचे शोध करून मि० पांगारकर आपले लेख प्रसिद्ध करीत आहेत हा त्यांचा प्रशंसनीय उद्योग पाहून फार आनंद वाटतो.

१ आवडती स्त्री. २ जिला प्रमद (हर्ष) असतो ती. उत्तम स्त्री ३ भिजलेला ४ भय शीला ५ अल्प. ६ भामिनी कोपना स्त्री भाम् ( क्रोधे ) या धातू पासून भामिनी शब्द उत्पन्न झाला.

चालू वेंचांतील कथा भागाचें संबंधानें एका विद्वान् व मार्मिक गृहस्थानें दिलेला अभिप्राय येथें सादर करितो:-

" या गीतींत ( ८९ ) मोरोपंतांनीं वर्णन मोठ्या बहारीनें केलें आहे. याच्या पुढच्या दोन गीतीहि मोठ्या सुंदर आहेत. प्रत्येक विशेषण-- दयिता, प्रमदा, भीरु इ० मोठ्या खुबीनें योजिलें आहे........ रंग भूमीवर हा देखावा व त्या वेळची भीमाची व द्रौपदीची स्थिति, व त्यांचे अनुरूप अभिनय हें पाहून मनाला जितका आनंद व्हावयाचा, तितका आनंद कवीनें त्या देखाव्याचें शब्द चित्र काढून वाचकांना दिला आहे..................

काव्य संग्रह.

असो. हे वेंचे कांहींसे विस्तृत दिले असतां, जागा अडविली ह्मणून वाचकांची क्षमा मागण्याचें कारण पडणार नाहीं अशी समजूत आहे.

द्रौपदी आपल्या खेदाचें कारण सांगते.

कृष्णसखी द्रुपदसुता,
धर्मस्त्री सून पांडुराजाची ॥
कविगण गणपति गाती,
कीर्ति सुधासिंधु पांडुरा ज्याची ९३
कवि जीसें राजसूया-
माजि व्यापुनि महि नभीं गाती ॥
झाली विराट सदनीं,
सैरंध्री परमहीन भागा ती ९४
जी कुरु सभेंत नेली,
द्यूतजिता किंकरी ह्मणुनि अरिनीं ॥
बहु बावरीच केली,
जसि देऊनि हाक हांसेंनी हरिनी ९५
कीचक नीच कर तिचा,
धरि परि हरिची सखी न अनुसरली ॥
कर आसुडितां पडतां,
खल; तेथूनि दूर ती सुतनुं सरली ९६
हे* स्त्री नव्हे प्रतिष्ठी,
तुमची; जरी ईस सोडितां पाणी ॥

१ अमृताच्या समुद्रा सारखी धवल. २ द्रौपदीस ३ राजसूय यज्ञांत. ४ आकाश ५ अंतःपुर परिचारिका. ६ द्यूतांत जिंकलेली ७ दासी. ८ हत्तीण. ९ सिंहांनीं. १० सुगात्री ११ यश कीर्ति. १२ पाणी सोडणें-त्याग करणें.

* हा अपन्हुति नामक अलंकार होय. या गीती बद्दल असा उद्गार आढळतो:— ही अपन्हुति अगदीं संस्कृत कवित्वाच्या तोडीची असून किती तरी समयानुरूप आणि सुंदर आहे. हींत उत्प्रेक्षेची छटा मारीत असल्यामुळे तर ही फारच सुरेख झाली आहे,

धर्में चोथें च असें,
वदलां कां प्रथम जोडितां पाणी १०३
दावी रडोनि झाले,
जे गंध उगाळितां स्वहात किणी ॥
भीम ह्मणे ' विधि लेखनि!
लेखनि नच वैवकिलीस धाताकिणी १०६

वि. आ. का.

( पुढें चालूं )

१३ मिळवितां, संपादन करिते वेळीं, पाणी हात--पाणी ग्रहण करिते समयीं. १४ घट्टे पडलेले. १५ ब्रह्म देवाची लेखणी. १६ लिहितांना १७ भ्यालीस.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य ७ शके १८२३

एकटी शारीरिक शक्ती नैतिक शक्तीच्या पाठबळाखेरीज अगदीं दुबळी व निशक्त असते. नुसतें शारीरिक बल कमजोर व निर्बल असल्या कारणानें त्यास नैतिक बळाचा चांगलाच दुजोरा मिळाला पाहिजे. आणि अशा जोडगोळीनें जे नेम मारले जातात ते आपला कार्यभाग बिनचूक करून सोडतात. सदाचार, नीति, धर्म व न्याय या चतुष्टय तत्वांना धरून जो कार्यारंभ करावा त्यांत यशसंपदा प्राप्त व्हावयाचीच हा अनादि कालाचा सिद्धांत होय. सरशेवटीं सत्याचाच विजय होईल हें खास. एकट्या अंगांतल्या शारीरिक शक्तीच्या व पराक्रमाच्या जोरावर मी अमुक एक गोष्ट खात्रीनें करीनच करीन असा अभिमान लटका व वृथा ठरतो. सदाचारादि चतुरस्रसंपन्नता चांगली परिपूर्ण असल्यावर दिग्विजयार्थ जो अश्व सोडावा त्यास धरून ठेवून अडवें येण्याचें कोणाचें अंगीं सामर्थ्य आहे? जें राष्ट्र न्याय व नीति यांच्या भक्कम पायावर उभारलें गेलें आहे. त्या राष्ट्राची विजयशाली निशाणें व पताका नभोमंडळासहि भेदून पार निघून जातील व त्याची दिगंत कीर्ति अखंड दुमदुमत राहील. नाहींतर जें राष्ट्र दुराचारी, जुलमी, अन्यायी व अधर्मी राहील त्या राष्ट्राच्या भरभराटीचा व वैभवाचा दिवसानुदिवस ऱ्हास होत

जाईल व अखेर जर तें राष्ट्र सन्मार्गाकडे वळणार नाहीं तर रसतळास जाऊन मातीस मिळेल. असल्या अनीतीनें गांजलेल्या, अर्धमेलें पोळलेल्या व न्यायानें सोडलेल्या राष्ट्रांच्या कपाळीं दास्यत्व व पारतंत्र्यच लिहिलेलें असतें. सदाचरणसंपन्न राष्ट्रें आपल्या पुण्याईच्या व एकीच्या जोरावर दुसऱ्या बलाढ्य पण अशा दुर्वर्तनी राष्ट्रांस पादाक्रांत करून अंकित करून सोडतात. नैतिक व शारीरिक बलाबलाचा सामना माजला ह्मणजे जों पर्यंत नीतिरुपी अमृतवल्ली जोम धरून शारीरिक बळास सहाय्य कर्त्री असते तों पर्यंत तें आजिंक्य असतें पण पापादि वासनांचे बारीक बारीक हजारों किडे नीतीच्या अमृतवल्लीस जेव्हां झोंबतात व अशेष अमृत पान करून आपणच अमर व पुष्ट होऊं लागतात तेव्हां पूर्व पुण्याई संपून जाते व मग मात्र शारीरिक शक्ति उघडी पडून तिचा पाडाव हातोहात होतो. कारण जीवनशक्ति पुरवणारे जे अमृताचे झरे तेच कोरडे पडतात मग निस्त्राण होऊन प्राण जाईल यांत नवल तें काय? सत्पथं आक्रमणाऱ्या व अन्यायी व अनिष्ट पथसंचारणाऱ्या राष्ट्राची हुबेहूब चित्रें इतिहास रंगभूमीवर ठळक रीतीनें मोठमोठ्या कर्तृत्ववान् पुरुषांनीं चित्रित केलेलीं आहेत. रामरावणादिका पासून राज्याच्या उन्नतीची व अवनतीची राज्यक्रान्ती डोळ्यापुढें मांडून मुत्सद्दीगणांनीं आपल्या राज्यनौकेचें सुकाणू मोठ्या चातुर्यानें व अक्कलहुषारीनें वळविलें पाहिजे. जें राष्ट्र न्यायनीती बाजूस सारून सत्याचें उलंघन करील तें दुर्दशा व पीडा याच्या अकाबाईच्या भोंग्यांत सांपडेल तर प्रत्येक राष्ट्रानें आपली राजनीति कदापि न सोडतां सतत वाढविली पाहिजे. अन्यायी व दुष्ट लोकांस चांगली शिक्षा लाविली पाहिजे. सर्व राष्ट्र सदाचारी होईल असें राजशिक्षण सर्वांस दिलें पाहिजे. आणि स्वकीय व परधर्मी लोकांचा तिरस्कार, छळ किंवा विटंबना न करितां त्यांच्या धर्माचा योग्य रीतीनें प्रतिपाळ केला पाहिजे. आपल्या सतेज तरवारीच्या धारेवर किंवा लाल संतप्त झालेल्या तोफेच्या अग्निज्वाळावर उभे करून सर्व पृथ्वीतलास भयभीत करण्याचे व सार्वभौमत्व संस्थापनेचे सर्व प्रयत्न निष्फळ होत. मनगटाच्या अनिवार जोराची समशेर विचाराच्या व मनापासून केलेल्या सत्कर्माच्या म्यानांत फिरली पाहिजे. सुकृतीचें वशीकरणअस्त्र सर्वांवर सोडून त्यांस प्रेमपाशानें बांधून घातलें पाहिजे. आपल्या उदार बुद्धीनें व दयाळु अंतःकरणानें महान् महान् आजिंक्य रथी महारथी सुद्धां चीत करून आपल्या आज्ञांकित करून ठेविले पाहिजेत. अशा तयारीनें चोहोंकडे मोर्चे फिरविले कीं आपलें सार्वभौमत्व कोणास नकोसें होईल? अशा तऱ्हेच्या रामराज्याची स्थापना करण्याची लालसा व महत्वाकांक्षा धरून आपल्या अफाट सार्वभौमत्वाचा पाया एक एक सत्कृतीचे भले भक्कम चिऱ्यावर चिरे देऊन रचूं लागलें पाहिजे. ह्मणजे आपला गौरव व बहुमान करण्यासाठीं अंतरीक्षांत देवगंधर्वहि सुमनपुष्पें घेऊन उभे राहतील. आणि हाच मार्ग सर्व चराचर प्राणीमात्रास मनापासून आवडतो. अशी सत्कर्माची भराभर भर पडूं लागली ह्मणजे पापाची पिच्छेहाट होऊन पुण्यप्रतापी साम्राज्य मंदिराचा सोन्याचा कळस चमकूं लागेल. व ह्या सुखशीतल मंदिराच्या गाभाऱ्यांत सर्व जग आनंदानें वास करील. नाहीं तर आपसांत वैर व दुही माजून सर्वत्रांचाच नाश होईल.

## यः क्रियावान् स पण्डितः

अलिकडे आपल्या देशांत जिकडे तिकडे सुधारणेचा डंका वाजत आहे. कोणी राजकीय सुधारणा करित आहेत, कोणी सामाजिक सुधारणा करित आहेत, कोणी वाङ्मयरूप सुधारणा करित आहेत. कोणी विद्यावृद्धि करीत आहेत. कोणी, औद्योगिक सुधारणा करीत आहेत. अशा प्रकारें अनेक दिशांनीं सुधारणा चालल्या आहेत. परंतु राष्ट्राची उन्नति होण्याला मुख्य जी नैतिक सुधारणा पाहिजे तिचें पाऊल या सर्व सुधारणा बरोबर किती पुढें पडत आहे? राष्ट्राची उन्नति होण्यास वर ज्या अनेक सुधारणा सांगितल्या त्या प्रमुखत्वें करून कारणीभूत आहेत किंवा गौणत्वें करून कारणीभूत आहेत याचा विचार कोणी केला आहे काय? तसेंच या सुधारणांच्या पायाशीं कोणती सुधारणा असते याचाही कोणी विचार केला आहे काय? पाया मजबूत असल्या शिवाय वरची कोणती इमारत फार दिवस टिकणार आहे? सूक्ष्म विचार केला असतां लक्षांत येईल कीं सर्व सुधारणांच्या पायाशीं नीतीची सुधारणा असली पाहिजे. तिच्या वांचून तुह्मी कोणतीही सुधारणा करा ती मजबूत होणार नाहीं व फार दिवस टिकणार नाहीं.

नीति हा शब्द मोठा व्यापक आहे. तथापि त्याची व्याप्ति समजणें साधारण मनुष्यास देखील फारसें कठीण नाहीं. स्थूल मानानें ज्या ज्या गोष्टींस आपण चांगल्या असें समजतों त्या त्या गोष्टींचा अंतर्भाव नीति या शब्दांत होईल. तर अशा ज्या नीतीमध्यें येणाऱ्या अनेक गोष्टी आहेत, त्या आपल्या लोकांच्या अंगीं कितपत येत चालल्या आहेत याचा विचार केला पाहिजे, जें राष्ट्र स्वतंत्र असतें तें बरेंच नीतीमान असतें; परंतु पराजित राष्ट्र स्वतंत्र राष्ट्राहून पुष्कळ नीति-भ्रष्ट असतें. असेंच तेव्हां कोणतेंही राष्ट्र पराजित होतें तेव्हां त्यांत अनीतीनें बराच प्रवेश केलेला असतो. हे जे सिद्धांत सांगितले ते देशतः किंवा कालतः नेहमीं खरें असतात असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

आतां आपल्या देशाविषयीं विचार केला असतां असें दिसून येतें कीं आज सुमारें दोन अडीच हजार वर्षांपासून आपण परतंत्र झालों आहों, किंवा आमची नीतिमत्ता आह्मांला सोडून गेल्यास इतकीं वर्षें झालीं इतक्या काळांत आमचें पारतंत्र्य एकाच अवस्थेंत राहिलें आहे असें नाहीं. कधीं कमी व कधीं जास्त अशा प्रमाणांत तें राहिलें आहे. ज्या काळांत आह्मी स्वतंत्र होतों त्या काळांत आमची नीतिमत्ता फार श्रेष्ठ असली पाहिजे. हें वरील नियमावरून सिद्ध होतेंच आहे, परंतु यांस एक प्रमाण ही सांपडलें आहे. डा० हंटर साहेबांनीं आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत इसवी सना पूर्वी तीनशें वर्षांच्या वेळची या देशाची जी सामाजिक स्थिति वर्णिली आहे ती येणें प्रमाणें:—

"हिंदुस्थानामध्यें दास्याचा अभाव, स्त्रियांचें पातिव्रत्य, व पुरुषांचें धारिष्ट हीं पाहून मेगस्थनीस यास मोठें नवल वाटलें. तो असें ह्मणतो कीं शौर्याच्या संबंधानें ह्यांची बरोबरी करणारे सर्व आशिया खंडांत दुसरे कोणतेही लोक नव्हते. ह्यांना आपल्या दारांना कुलपें घालण्याची जरूर नसे, व सर्वांत विशेष गोष्ट ही कीं हिंदुस्थानांत खोटें बोलणारा एकही मनुष्य नव्हता." या उताऱ्यांत आमचे किती सद्गुण आले आहेत बरें! बाकीचे सद्गुण तूर्त एकीकडे ठेवून ह्यांतल्या एका विषयींच आज विचार करूं. तो सद्गुण खरें बोलणें हा होय. आमचें शौर्य व धारिष्ट गेलें आहे तें विचारें जाओ, पण सर्वांत सोपा व भोळा जो खरें बोलण्याचा सद्गुण तो तरी आमच्या अंगीं राहिला आहे काय? कोणी ह्मणेल हा गुण सोपा व भोळा नव्हे हो! हा सर्व सद्गुणांची मात्रा आहे, हें कबूल आहे, परंतु हा पुष्कळ, अंशीं आपल्या स्वाधीनचा असल्यामुळें व साधारणपणें विचार केल्या बरोबर याचा कांहीं बाऊ वाटत नसल्यामुळें यांस सोपा व भोळा असें ह्मटलें आहे. वास्तविकपणें पाहतां शौर्य आणि धारिष्ट हीं याचीं पिलें आहेत.

या देशांत इंग्रजी राज्य झाल्या पासून विद्यावृद्धि पुष्कळ झाली आहे. विश्वविद्यालयांतून बी. ए. एम. ए, परीक्षा दिलेले विद्वान् जिकडे तिकडे पुष्कळ पसरले आहेत पुष्कळ ग्रंथकार निपजले आहेत, व सभांतून वाक्पांडित्य करणारांची संख्या बरीच झाली आहे. गांवोगांव लयब्र्या माजल्या आहेत, व ग्रंथ संग्रहालयेंहीं बरीच पिसाळलीं आहेत. इतकी धामधूम झाली आहे पण इतक्या मध्यें खरें बोलण्याचा गुण ज्यांनीं संपादन केला आहे अशांची संख्या किती वाढली आहे, याचा कधीं कोणीं हिशेब लाविला आहे काय? या ठिकाणीं आह्मांला एका गोष्टीचें स्मरण होत आहे. कांहीं वर्षां मागें डाक्टर ह्यूम् या नांवाचे एक गृहस्थ या प्रांतांत सिव्हिल सर्जनच्या हुद्यावर होते. एके प्रसंगीं त्यांचें आमचें सलगीचें भाषण चाललें असतां ओघांत त्यांस आह्मीं विचारलें कीं, "आपणां इंग्रजांत स्त्रियांच्या पातिव्रत्याची मोठी प्रतिष्ठा मानिली जाते काय? असा प्रश्न करून आह्मीं अधिक असें ह्मटलें कीं, आमच्यांत तर ती फारच आहे व अहल्या, द्रौपदी, सीता इत्यादि हा श्लोक आह्मीं त्यांस ह्मणून दाखविला." साहेबांनीं उत्तर केलें कीं "ज्या स्त्रिया कोर्टांत व्यभिचारिणी अशा ठरल्या नाहींत त्या सर्व पतिव्रता असें आह्मी समजतों." वर जो आह्मी खरें बोलण्यासंबंधानें प्रश्न विचारिला आहे त्या प्रश्नाचें उत्तर साहेबांच्या या उत्तरा प्रमाणेंच द्यावें लागेल असें वाटतें पण त्या उत्तरांत कांहीं अर्थ आहे काय? कारण जे बाणीदार सत्यभाषणी असतात त्यांचा समाजांत त्यासंबंधानें लौकिक असतोच. असा लौकिक ज्यांचा आहे असे चार दोन देखील गृहस्थ हिंदुस्थानच्या या भागांत आपणास माहीत नाहींत. अमुक गृहस्थ मोठे वक्ते आहेत, अमुक मोठे लेखक आहेत, अमुक मोठे पैसेवाले आहेत, अमुक सुधारक आहेत, अमुक पुराणप्रिय आहेत, अमुक संतापी आहेत, अमुक दारूबाज आहेत, अमक्यानें पुनर्विवाह केला आहे, या प्रमाणें अनेक लोकांचे लौकिक जसे गाजत आहेत त्या प्रमाणें अमुक मनुष्य बाणीदार सत्यभाषणी आहे असा कोणाचा लौकिक गाजत असल्याचें ऐकूं येत नाहीं. यावर कोणी उत्तर देईल कीं, जी ह्मणून मोठीं माणसें आहेत तीं सर्व सत्य भाषणी आहेत हें वेगळें सांगावयाला नको. हें उत्तर वरील ह्यूम साहेबांच्याच उत्तराचें मावंड होईल. जर कोणी मोठा मनुष्य बाणेदार सत्यभाषणी असेल तर तो कधीं लपून राहणार नाहीं. त्याच्या इतर गुणांपेक्षां तो याच गुणानें विशेष प्रसिद्धीस येईल. खरें बोलण्याचा गुण इतर गुणांनीं आच्छादित करावा असा तो निस्तेज नाहीं. इतर गुण याच्या योगानें शोभावे इतका तो तेजस्वी आहे.

हल्लीं सत्य बोलण्याची जागा "पोलिटिकल्" या गुणानें घेतली आहे. बोलण्याच्या संबंधानें कोणाची तारीफ करावयाची असतां 'अहो तो मोठा पोलिटिकल आहे' किंवा तो केवढा पोलिटिकल्! तो काय त्याच्या बापाला दाद देतो' अशा सारखीं वाक्यें वापरण्यांत येतात. यामुळें जो तो पोलिटिकल् होण्याला इच्छितो आहे. खरें बोलणारा तो मूर्ख, व पोलिटिकल् तो शहाणा अशी समजूत तरुण मनुष्यांची होत चालली आहे. व कालांतरानें पोलिटिकल माणसांनी आपल्या देशांत रेलचेल होणार आहे. कोणाला आपण कांहीं प्रश्न विचारिला ह्मणजे तो आपणास त्याचें सरळ आणि खरें उत्तर देत नाहीं, उडवा उडवी करितो किंवा भलतेंच कांहीं सांगतो. अशा उत्तराला लोक पोलिटिकल ह्मणतात. व उत्तर देणारा ही समजतो कीं मला पोलिटिकल ह्मणतात. तेणें करून तो आपणांस हुषार मानितो, व आपण शहाण्यांत मोडूं लागलों असें समजतो, ज्याला या विधानाची सत्यता पाहावयाची ओढ त्यानें आपल्या व्यवहारांत थोडें लक्ष पुरवावें ह्मणजे असे पोलिटिकल माणसें त्यास फार आढळतील. पांच पन्नासांत एखादा मूर्ख सांपडला तर मोठें भाग्य. पोलिटिकल वर्तनाची प्रतिष्ठा होत चालल्या मुळें खरें बोलणें बिचारें मागें पडत चाललें आहे, धर्मांत तर "सत्यं वद" ही पहिली आज्ञा आहे. तो "नानृतात् पातकं परम्" असें दुसरें वचन आहे. हा ज्यांनीं धर्म सांगितला ते काय मूर्ख किंवा भ्याड होते? ते काय पोलिटिकल कधीं होते? हल्लींचा जो पोलिटिकलपणा आहे याच्या योगानें फार वर्षांच्या दास्यामुळें अगोदरच नीतिभ्रष्ट झालेलें राष्ट्र दिवसानुदिवस नीच होत जाईल हें पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे. पोलिटिकल शब्दाचा सामान्यतः जो अर्थ घेतला जातो तो लटपट लबाडी किंवा खोटेपणा हा होय. याच्या योगानें मनुष्य भ्याड होईल. व अशा रीतीनें

जे वागतात ते भ्याड असतात, असें यांनीं पक्कें समजावें. खरेपणानें वागणारास पदोपदीं अडचणी फार येतील असें कोणास वाटेल परंतु त्या जितक्या येतील असें वाटतें तितक्या वस्तुतः त्या येणार नाहींत. या विषयीं विचार करूं.

प्रथमतः खरें बोलण्याचा जो निश्चय करील, त्याला खऱ्या रीतीनें वागावें लागेल हा तर मोठाच फायदा झाला. पण समजा खरें बोलण्याचा निश्चय केलेला मनुष्य गैरशिस्त रीतीनें वागतो; किंवा असा तो वागतो ह्मणून त्याला पदोपदीं खोटें बोलावें लागेल असें कोणास वाटेल. समजा तो मनुष्य दारू पितो, रांडेकडे जातो, पैसा खातो, वर्तमानपत्रांत लेख लिहितो, निंदा करितो व अशा दुसऱ्या अनेक गोष्टी करितो. इतक्या गोष्टी करूनही त्याला खोटें बोलणें टाळतां येणार नाहीं काय? समजा कीं वरील कोणत्याही गोष्टी संबंधानें या गृहस्थास कोणी प्रश्न विचारिला. बहुशः अशा बाबतींत कोणी कोणास प्रश्न विचारीत नाहींत. पण विचारला असें घटकाभर घेऊं. या गृहस्थाच्या मनांत खरें तर सांगावयाचें नाहीं. व खोटें तर बोलावयाचें नाहीं असें आहे. या करितां यानें पुढील उत्तरा सारखें एखादें उत्तर दिलें पाहिजे हें स्पष्ट आहे. मी या प्रश्नाचें उत्तर सांगत नाहीं, तुह्मीं हा प्रश्न विचारणें हा उद्धटपणा आहे. मला वाईट वाटतें कीं मी या प्रश्नाचें उत्तर देण्यास इच्छित नाहीं वगैरे." आतां अशी कल्पना करूं कीं यांतला एखादा प्रश्न पोलिसानें विचारिला. अशा प्रसंगीं एक तर खरें सांगावें किंवा खरें सांगण्याची जरूर नाहीं असें वाटलें तर वर प्रमाणें उत्तर द्यावें. आपले कोणी वरिष्ठ किंवा मोठे सरकारी अधिकारी प्रश्न विचारणारे असले तर यांनाही उत्तर वर प्रमाणेंच द्यावें. मात्र नम्रतेनें द्यावें, तसें उत्तर दिलें असतां ते आपली मान कापतील अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. त्यांची इतराजी झाल्या सारखें वाटेल, तरी पण त्यांच्या हातून आपलें मोठें नुकसान होईल असें नाहीं. कदाचित् आपलें धैर्य पाहून आपण त्यांस अधिक आवडूं असेंही होईल. दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवावयाची अशी कीं खोटें सांगितल्यानें आपण त्यांस विशेष आवडूं असें नाहीं. कारण खोटें, खरें आपल्या बोलण्यावरूनच त्यांस कळतें, व कळण्याचे इतर मार्गही असतात. आतां न्याय कोर्टापुढें साक्षीदार या नात्यानें शपथ घेऊन बोलण्याचा जेव्हां प्रसंग येतो तेव्हां कसें करावें हा विचार आला. या प्रसंगीं तर खरेंच बोलावें, मग आपल्या बोलण्या पासूनच आपल्या आप्तस्वकीयांचा किंवा मित्रांचा तोटा होत असला तरी चिंता नाहीं. कारण खरें बोलण्या पासून जनतेचा एकंदर फायदाच असतो आतां अशा प्रसंगीं वकील लोक वात्रटपणानें कधीं कधीं आपल्या स्वतःच्या संबंधानें कुत्सितपणाचे प्रश्न करित असतात. या प्रसंगीं आपली हिंमत पुरली तर खरेंच बोलावें. नाहीं पेक्षा खोटें बोलावें. या प्रसंगीं, खरेंच बोला असें सांगणेंही बरोबर नाहीं व 'बोला' ह्मटलें तर साधारणतः कोणी ऐकणारही नाहीं. कारण ज्याचें वागणें खोटें आहे त्याला आपल्या तोंडानें कितीएक विधान करून लोकांत आपणांस उपहासास पात्र करून घ्यावें लागतें. असो. असे प्रसंग विरळा. खोटें बोलावयाचें नाहीं असा नियम केल्या बरोबर मनुष्याच्या वर्तनांत फरक पडूं लागेल, व तो उत्तरोत्तर सद्वर्तनी होईल. आणि असा फायदा न झाला तरी या नियमाच्या योगानें त्यास दिवसानुदिवस धैर्य तरी जास्त येऊं लागेल हें खास लोकांत धारिष्ट जर जास्त यावयाला पाहिजे आहे तर या नियमाची फार आवश्यकता आहे. हल्लीं मनुष्यास धैर्य ह्मणून मुळींच अंगीं आणवेनासें झालें नाहीं. कारण पोलिटिकलणा तो ज्यास समजतो त्याचें हत्यार त्याच्या बगलेंत असतें. मग कसा जरी प्रसंग आला तरी या हत्याराचे दोन हात करून तो वेळ कशीबशी मारून नेतो.

---

मे. रुस्तुमजी फर्दुनजी बुलडाण्याचे डिपुटी कमिशनर हे अकोल्याहून गेल्या शुक्रवारीं बुलडाण्याकडे रवाना झाले. हे मोठे अधिकारी असून आपल्या अधिकाराचा दरारा मोठा नामी राखतात. यांच्या इतका कार्यदक्ष, अंगमेहनती व चतुरस्र जिल्ह्याचा अधिकारी क्वचित्च आढळेल. गेल्या दुष्काळांत त्यांनीं जिवापाड श्रम केले आणि आपल्या उत्कृष्ट कारभारा बद्दल लोकांचे आशीर्वाद संपादले व सरकारांतून मोठ्या मान्यतेचा चांदहि यांस देण्यांत आला. अधिकार चालवितांना प्रेम व क्षमा हीं यांच्या पोटांत असतातच पण हे दोन गुण विशेष बाहेर दाखवितील आणि थोडासा संशयी असलेला स्वभाव टाकतील तर यांच्या कर्तृत्वाला नांव ठेवण्याला देखील जागा राहणार नाहीं. यांचा कडक अंमल व पुनः पुन्हांची पाहणी हीं गेल्या दुष्काळांत मोठी उपयोगी पडलीं यामुळें कोणाला गैरमार्गांत जातां आलें नाहीं व कोणावर फौजदारी खटलेहि करण्यांत आले नाहींत ही चिरस्मरणीय गोष्ट होय.

मि. रुस्तुमजी साहेब स्वभावानें गोड व वर्तनानें शुद्ध आहेत. नेटिवांच्या मर्जी पेक्षां साहेबांचीच मर्जी राखण्याची हातोटी यांस चांगली साधली आहे सर्व लोक यांस फार भितात. अधिकाराच्या खुर्चीवर असतांना हे जास्त दयाळूपणानें, व खऱ्या मनोभावानें लोकांस आपलेसें करितील तर यांच्या अधिकाराला या दयेमुळें मोठी शोभा येईल आणि ते लोकांस फारच फार आवडतील. पानसुपारीचा सन्मान यांस गेल्या गुरुवारीं येथील नेटिव क्लबाकडून देण्यांत आला आणि यांनीं तो मोठ्या आग्रहास्तव स्वीकारला.

---

The Berar Samachar

MONDAY JULY 8 1901

India is called the diadem of the British empire. All the material prosperity which has given the English nation the first place amongst the nations of the world is but the golden result of the most expansive commerce in India. India is in fact the spring of life to which the British empire owes its grandeur in wealth and material greatness. The crucial test lies in the fact that the close of the Indian markets for the British articles will be a death—blow to the exchequer of the paramount nation. The British empire is nothing whatever if we take out of consideration the immense drain of wealth that enriches the coffers of the English nation. It is, therefore, incumbent on our rulers to give their best thoughts to any Indian problem that concerns the growth or the decline of the Indian prosperity. We have reached a critical stage in the economic situation of India. If the downward progess of events still continues in regard to the frightful amount of poverty of the Indian people, we can hardly think to have a leap in the future of India. The economic situation of India should really be hopeful and recuperative. But the Government of India do not discharge their duty to make it really so. The duty lies in awakening India to the real magnitude of the gradual loss of the staying power of the people. The recognition of this fact is the first preliminary step of the actual work of amelioration. To better the people is to improve their financial resources and to enable them to earn a competent and substantial living. This is in fact our final object in view. Before we arrive at it we shall have to re-adjust our anamolous position in regard to the relations between the rulers and the ruled. We have to avert crisis which will otherwise threaten to develop itself and to disturb the peaceful calm and political serenity of the whole nation. The question is how to secure to India the blessings of the British rule without the heavy cost that impoverishes the Indian Empire. The cost of the British rule is enormous and enhances the miseries due to famines that recur more frequently than the people could afford to cope with them. the recent famines have further proved that the evils of a draught and scarcity are further multiplied by the famine of wages which is the curse of the people. We wish that our rulers will educate us in a new manner altogether. To remove the famine of wages is to wide open various new industries that are easily accessible in India. A new impetus is required to direct our energies and activities in a new channel of commerce and industry. Our political relations always subject us to the whim of the English commercial community and make us simple helpless objects to watch the imperial greatness and glory of the British people, which is for one reason or another concurrent with the downfal of our people. We do not, therefore, expect any substantial help from our rulers in this matter. Though it is to the real good and welfare of the two component parts of the vast British empire that both the British and Indian interests should thrive together. The actual current of events proves that the Indian interest is treated as antagonistic to that of the British. Our idea is that in case of a conflict the giant nation should take care of the dwarf and should not trample it under its feet. The preservation and continuance of the dwarf makes the giant a real giant. The benevolent mission which Providence has enjoined upon British rulers is to rule India for India's sake. If that be the righteous task we humbly submit that this duty is more honoured in its breach. We are thus in a deplorable condition. we are unable to help ourselves. It is hopeless to expect any real assistance from the Government. We are in fact in a dilemma. The puzzle is very great. Blessed will be the day when we shall find a way out of it! The little beginning to succeed in it is to cultivate a manly independent character in our people. Our asceticism and contentment is proverbial. We wish that a healthy ambition will inspire us to move on and to appreciate moral Independence to its full extent. Our talk of technical education and so many different subjects does not solve our difficulty. Let positive action drive away the philosophy of inaction and idleness and we hope to succeed in industrial and commercial life so as to raise India to the level of other prosperous and living nations.

—:0:—

The question of India's welfare is at heart of every Native and Sir Bhownagari M. P. has bit at its right solution in the following eloquent terms:—

"Sir Raymond West had very forcibly brought out the proposition which he (the speaker) had over and over again asserted, *vis*, that there was no reason why the people of India should suffer from famines in this present age of communication by railway and water. As grain could be now easily procured from long distances, the whole question resolved itself into the buying capacity of the people. If we had—and we should have—control over the condition of the people and over their buying power, he maintained that although there might be famines, draughts and dearth of crops and so forth, still the time was passed when a single individual or a community should suffer from want of food, to any very serious extent. The question of the buying power of a community raised a great many other questions. It raised the consideration of great administrative and economic reforms. He did not deny the urgency of these reforms for one moment, but he had held very strongly the opinion that India had deplorably failed from various causes to develop its industrial energies, and thereby to combat the hardships of famine. One of the chief functions of this Union would be, he took it, to direct the attention, both of the Government and the people themselves, to the means of developing the industrial, technical, and scientific capacity of the nation, that the buying power might be increased."

---

## वऱ्हाड

हवामान— पाऊस चांगला झाला. कपाशीच्या पेरण्या संपून जवारीचे पेरे चालूं आहेत. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे.

मि० सैफुद्दीनखान लालखान तहशिलदार, आकोला हे तीन महिन्यांच्या रजेवर गेल्या सोमवारीं गेले.

त्यांच्या रजेंत मि० फरुक हुसेन नायब तहशिलदार, बाळापूर हे येथील तहशिलदारीचें काम पहातील.

**अपघात**—अहमदनगरास एका दोन मजली घराची भिंत शेजारच्या धाब्यावर पावसामुळें पडून तें धाबें एकदम खालीं बसून त्या घरांतील तीन माणसें दगावलीं ! मोडकळीस आलेल्या घरासंबंधानें त्या घराचे मालकानें फार खबरदारी बाळगली पाहिजे.

**डोकीस खोबरेल घालण्याचा उपदेश**—उन्हाळा न बाधण्यास डोकीस खोबरेल तेल घासणें हा राजमान्य उपचार आहे, डोकीस साबण फांसण्यांत कांहीं, अर्थ नाहीं अशीं शिफारस बराकपूरचे डाक्टर मूर एम्. डी. यांनीं स्वानुभवानें युरोपियन लोकांस केली आहे. नेटिव लोक डोकीस तेल घांसतात ह्मणून हांसणाऱ्या मंडळीला कांहींएक कळत नाहीं, असें सुद्धां ह्या डाक्टरांनीं ह्मटलें आहे. आमचे लोकांनीं डोळे उघडावेत.

पेनेल साहेबांची नौकरी सुटल्यास ते हिंदुस्थानांत परत येऊन दिल्लीच्या 'मार्निंग पोस्ट' नांवाच्या वर्तमानपत्राचे एडिटर होणार आहेत ह्मणतात.

**पक्षिगणांची एकी व प्रीति**—पंचा नांवाच्या पक्षांचें एक जोडपें आपल्या पिलांसह एका वृक्षावर घरटें करून रहात होतें. एका प्रचंड सर्पास याचा सुगावा लागून त्याच्या भक्षार्थ तो झाडावर जाऊं लागला. हें पाहून त्या पक्षांनीं आपल्या दुसऱ्या पुष्कळ जातवाल्यांनां आणून त्या सापास आपल्या चोंची मारून ठार केलें. इसापनीतींतील या अशा तोंडीच्या गोष्टी खऱ्या आहेत. मनुष्यांनीं यापासून खरोखरींच शहाणपण। व नीति शिकावी.

**औषधीचें उपजत ज्ञान**—जनावरांना व विशेषें करून कुत्र्या मांजरांना पोटदुःखी बद्दल गवताचे कोंळे शेंडे खाऊन ओकाऱ्यांचा उपाय कोणी न शिकवितां उपजतच ठाऊक असतो. ईश्वराची योजना ती ! हेंच दुर्वांकुरांचें औषध मनुष्यास देऊन फायदा होईल कां नाहीं याचा सहज अनुभव वैद्यांनीं घेऊन सर्वत्रांस कळविल्यास फार उत्तम गोष्ट होय. तरी पण आपण होऊन हा सुलभ उपाय करून पहावा. हटकून उत्तम गूण येईलसें वाटतें. व ह्या वनस्पतींत आणखी काय धर्म आहेत याचा शोध लावावा.

**चमत्कार**—बिकानेर कडील मोना गांवीं गेल्या सूर्य ग्रहणाचे दिवशीं एका विहिरीचें पाणी तापून वाफा वर येऊं लागल्या व विहिरींत एक कोनाडा होता त्यांतून पाण्या सारखा कांहीं पदार्थ बाहेर येत होता. कांहीं तरी गमतीची गप्पच असावी !

**पद्यवर्तमानपत्र**—आथेन्स येथें फार विलक्षण वर्तमानपत्र प्रसिद्ध होत असते. त्यांतील सर्व लेख कविताबद्ध असतात इतकेंच नव्हे तर जाहिरातीहि अशाच कवितेंत देतात. हें कवित्वास उत्तेजनच होय.

**ही स्त्री कोणाची?**—उत्तर हिंदुस्थानांत एका ब्राह्मणाच्या मुलीच्या बापानें तिचे लग्नाचा सर्व निश्चय केला व तो पर गांवास गेला. इकडे तिच्या आईनें दुसऱ्याच एकाशीं तिचें लग्न लावून सोडलें. बाप परत आल्यावर त्यानेंहि पूर्वी ठरवलेल्या वराशीं आणखी तिचें लग्न लाविलें. आतां ह्या दोन्ही नवरदेवांनीं आपली बायको आपल्या ताब्यांत मिळावी ह्मणून फिर्याद केली आहे. आतां ही स्त्री कोणाची, दोघांची, कां एकाची, कां तिसऱ्याचीच ! अशा कल्पित गोष्टी खऱ्या होऊं लागल्या आहेत.

**बालविधवा**—रत्नागिरीकडे एका देवरुखा ब्राह्मणानें साऱ्या १५० रुपयांच्या आशेच्या गळीं पडून आपल्या दोन वर्षांच्या लहान कन्येचें एका आठ वर्षांच्या मुलाशीं लग्न लाविलें पुढें लवकरच तो मुलगा देवी येऊन मरण पावला. ती लहान मुलगी आतां चिरकालची वैधव्य दुःखांत होरपळेल: इतक्या अज्ञान अर्भकांचा विवाह कायदा शास्त्रसंमत नसेल तर चांगलें होईल. असल्या तऱ्हेचे विवाह लहान मुलांच्या घटकाभरच्या खेळातले होत.

**क्रिकेटमुळें मृत्यु**—सातार कडील एक विद्यार्थी क्रिकेट खेळत असतां त्याच्या कपाळांत चेंडू बसला. त्यामुळें रक्तस्राव होऊन तो मरण पावला. क्रिकेट, फूटबाल वगैरे खेळ जरासे भीतिदायकच आहेत. जरा जपून खेळावे ह्मणजे झालें.

**कळीचें यंत्र**—स्वित्सरलँडकडे स्टेशनावर टिकीट मास्तर नसून त्या ऐवजी एक यंत्र असतें, त्यांत जितके पैसे टाकावेत तितक्या पुरतेंच टिकीट मिळतें. खोटें नाणें टाकिलें तर टिकीट मुळींच मिळत नाहीं. आपल्याकडे हें गमतीचें यंत्र कोणी आणतील काय?

**लोखंडी महाल**— जपानांत ९० लाख रुपये खर्चून एक सुरेख लोखंडाचा महाल होणार आहे. व भूकंपापासून त्यास मुळीच भीती राहणार नाहीं,

**अनिष्ट ज्योतिष**- एका ज्योतिषानें दोन गोष्टी वर्तवल्या आहेत. [१] आपले राजे साहेबास पुढच्या जून महिन्यांत गळवे होतील. ( २ ) १९०२ च्या आगष्टांत सर्वत्र धरणी कंप होईल. असली वाईट साईट भविष्यें करण्या पेक्षां आनंद सुखाच्या व ऐश्वर्य संपतीच्या गोष्टींचें भविष्य करावें.

**नदीचा तलाव झाला**— गेल्या मे महिन्यांत सरहद्दीकडील नदींत एकाएकी एक कडा कोसळला. व त्यामुळें एक अर्ध मैल लांबीचा तलाव आपोआप झाला. नैसर्गिक रीतीनें क्षणार्धांत चमत्कारच चमत्कार होतात.

**चांगलें उदाहरण**— मुंबईस कांहीं नेटिव मंडळींनीं एक आगबोट विकत आणून त्यातून जवळचे उतारू नेण्या आणण्याचा उद्योग सुरूं केला आहे. उद्योगवृद्धी आपण होऊन करण्यास असेंच सर्वांनीं झटावें.

**अतीदुर्दशा**— हिंदुस्थानच्या लोकांचें सालीना १७ पासून २० रुपये उत्पन्न आहे व इतक्यांत कशीतरी पोटाची खळ भरावी लागते. पण प्रत्येक कैद्यामागें ३८ रुपये खर्च येतो, मग स्वातंत्र्य बरें का बंदिवास बरा? ही स्थिती घातुक होय.

**मुलाबद्दल सावधगिरी**— परवां मुंबईस एका ९ वर्षांच्या मुलीच्या घशांत लसूण अडकून तिचा प्राण गेला. लहान मुलें जें सांपडेल ते तोंडांत कोंमतात. हा त्यांचा उपजत धर्म आहे ह्मणून वडिलधाऱ्या माणसांनीं भलत्याच लहानसान जिनसा मुलाच्या हातीं न पडतील अशी खबरदारी घेतली पाहिजे.

**उपाय**-- अंग सुटून बोजड झालेल्या मनुष्यांनीं दररोज ४--५ वेळा फलाहार करीत जावें ह्मणजे त्याचा स्थूल वाढलेला देह चपळ होईल असें एका डाक्टराचें मत आहे. अनुभव घेणें श्रीमंत माणसाच्या हौसेचेंच आहे. मिष्ट मिष्ट फलाहार कोणाला नको आहे. मात्र ह्या सुखाच्या लाग्यानें अंग जास्तच अवजड होणार नाहीं ना. !

इंग्रजांस हार जाऊन त्यांची सात्विक प्रजा होण्यापेक्षां प्रत्येकानें रणांगणीं आपल्या प्राणाची आहूति देणें बरें असें त्यास वाटतें. आपल्या जीवाचें व वित्ताचें संरक्षण इंग्रजप्रभूंनीं करून आपण आपसांत भांडत बसावें अशा मार्गे यास इष्ट वाटत नाहीं. आपली काळजी दुसऱ्यानें घेत असावी या सात्विकवृत्तीची गोडी या आडदांडास अद्यापि लागली नाहीं. परिणामीं बोअरलोक नामशेष होणार असें वाटतें. तथापि आपली स्वातंत्र्यप्रियता सर्व जगास धडा होऊन बसणार याच काल्पनिक सुखाच्या आशेनें बोअर लोक अद्यापि हार घेत नाहींत. मे.

कांहीं टोळांस मारून त्यांची लस दुसऱ्या टोळांस धरून त्यांच्या आंगास फासावी व त्यांस इतर टोळांत सोडून द्यावें ते त्या टोळींत गेले ह्मणजे दुसरे टोळ त्यांस स्पर्श करून मरतात असें एक शास्त्र निघालें आहे.

राकेल तेलांत बुडविलेल्या गवतावर त्यांस हाकलून द्यावयाचें व नंतर त्यास आग लावून जाळून टाकावयाचे. हा दुसरा उपाय.

१. दिवसानुदिवस जमिनीचा पृष्टभाग कमी कमी होत आहे; तर शेवटीं मनुष्याची जात पाण्यांत बुडून मरेल.

२. बर्फ हळू हळू उत्तर ध्रुवाजवळ जमत आहे. असें होतां होतां एके दिवशीं पृथ्वीचा समतोलपणा नाहींसा होईल, व चल वस्तु त्वेषानें पुढें धांवत येतील व मनुष्यांचा बींमोड होऊन जाईल.

३ पृथ्वी सूर्याकडे जात आहे; तेव्हां असें होतां होतां शेवटचा मनुष्य शेवटीं जिवंत भाजला जाईल.

४ पाणी क्रमाक्रमानें दुर्मिळ होत आहे, पुढील युगांत झाडून सर्व प्राणी मग ते मनुष्य असोत कीं पशु असोत, तहान अनावर होऊन मरण पावतील.

५ तीन हजाराच्या वर्षांच्या सुमारास मनुष्यें ऱ्हास पावूं लागतील, असें होतां होतां शेवटीं ते किड्यापेक्षां मोठे राहणार नाहींत.

६ सूर्य जळत आहे, पुढें तो ह्मातारा ह्मातारा सूर्य थंड होत जाईल. तो जसजसा थंड होत जाईल तसतसे पृथ्वीवरील हिमाचे कठिबंध ह्मणजे बर्फाच्या मैदानाचे पट्टे वाढत जातील व मनुष्याची सर्व जात त्या बर्फांत थिजून मरेल.

## मनुष्यहानि

ता० १८ मे रोजीं चिनांतील सिंगऊन जिल्ह्यांत, लंगकेंग नामक ठिकाणीं भर दिवस असतां एका ठिकाणीं निबिड अंधःकार पडला, आणि त्यापुढें विजेच्या मोठ्या कडाडण्या प्रमाणें कांहीं वेळ कड कड आवाज झाला. भूकंपानें तें झालें असावें असें ह्मणतात. हा कडकडाट झाल्यावर त्या पर्वतांतून जो पाण्याचा लोंढा निघाला त्याच्या योगानें सुमारें १०० रा पेंक्षां जास्त घरांचा नाश होऊन सुमारें २०० माणसें मेलीं.

**झाडांत खाणावळ**—कॉलिफोर्नियांत एका खाणावळवाल्यानें २२ यार्ड ज्याचा परीघ आहे अशा झाडाचा भाग पोकळ झाला होता त्याची खोली बनविली व त्यानें तो बसावयाचा दिवाणखाना ठरविला. झाडावर दाट छाया असल्यामुळें त्याचें छप्पर अनायासें झालें व त्या भोंवतीं त्यानें बगीचा तयार केला व छपराखालीं भोजन व धूम्रपान यांच्या स्थलाची त्यानें व्यवस्था केली. दुसऱ्या झाडांच्या लहान लहान पोकळ्यांचा उपयोग त्यानें निजावयाच्या खोल्यासाठीं केला आहे.

**लांब जिभा**— जिराफ व मुंगीखार या दोन प्राण्यांची जीभ सगळ्यांत अधिक लांब असते. दोन फूट लांबीच्या जिभा या दोन प्राण्यास असतात.

**गोहत्येबद्दल दंड**- पूर्णगड येथें एका मुसलमानाचे कंपौंडांत शेजाऱ्याची गाय आली ह्मणून त्यानें तिच्या कुशींत भेख ठोकलीं; त्याबरोबर ती तडफडून मेली ! सदरहू मुसलमानावर खटला होऊन त्यास ४० रुपये दंडाची शिक्षा झाली.

**नाटक कंपन्यांचें कान्फरन्स**— आमच्या दक्षिणी नाटक कंपन्या जेवढ्या आहेत त्या सर्वांच्या म्यानेजरांचें एक कान्फरन्स भरून सर्व कंपन्यांत आपसांतील व्यवस्थेस मदतकर अशा कांहीं तजाविजींचा विचार ठरणार आहे. या कान्फरन्स मध्यें सर्व कंपन्यांच्या सपाइक हिताहितांची योग्य चर्चा होऊन धंद्यास तेजी व विशेष लोकोपयुक्तता येण्यास साह्य होणार आहे.

**भयंकर गोष्ट**- पारीसमधील पोलीस अधिकाऱ्यांना एक निनावी पत्र आलें व त्यावरून एका भयंकर कृत्याचा स्फोट झाला. एका थोर व श्रीमान घराण्यातील एक बाई व तिचा एक मुलगा व एक मुलगी इतकी माणसें होती. पैकीं आईनें व लेकानें मिळून त्या मुलीस आज २५ वर्षें गुप्त तऱ्हेनें आपल्या वाड्याच्या एकीकडच्या घाणेरड्या जागेंत बंदीवासांत ठेविलें होतें. पोलीसानीं तिला मोठ्या हिकमतीनें तपास काढून तिचा उजेड व स्वातंत्र दिलें. त्या स्त्रीचे एका अगदी गरीब मनुष्यावर प्रेम जडलें होतें. ही गोष्ट त्या आईच्या व भावाच्या मनास आली नाहीं. ह्मणून त्यांनीं तिची अशी दुर्दशा केली ! हल्लीं ती इस्पितळांत आहे. तिचें वय आतां ५० शी जवळ जवळ आहे. विचारी या जन्मभर कारागृह वासापेक्षां मेली असती तर किती छान झालें असतें. ही गोष्ट कादंबरींत ल्या गोष्टी प्रमाणें अगदी खोटी वाटण्या सारखी आहे.

**आतां कसें?**— श्रीक्षेत्र काशी येथें शास्त्रपारंगत विद्वज्जनांची सभा भरून त्यांत श्रावणमास अधिक नसून आषाढ मासच अधिक आहे असें ठरलें आहे. पचांगांत तर श्रावणच अधिक महिना धरला आहे. लोक तर पंचांगा प्रमाणेंच वागणार हें खरें. पण खरी गोष्ट पंचांगा विरुद्ध असल्यास मग कसें ?

[ पुरवणी पहा. ]

REGISTERED N. No. 4

वर्षाची आगाऊ

सहामाही „ „ ८

साल अखेर „ ७ „ १ ८

किरकोळ अंकास ........................४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस.........१ ६

दुसरे खेपेस ...............१

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Six monthly......... 3 ............... 8 as

Single copy ..............................4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...3 as

VOLXXXV AKOLA MONDAY 15 JULY 1901 NO 27

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख १५ माहे जुलै सन १९०१ इ० अंक २७

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वराल रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई दुकदम ।।।- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ०१२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणार, वी. ट. ह. सह ०१४ ची मानिआडर पोंचतांच त्याचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या बरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेविलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता:— एम. जी. तुप. पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

---

नोटीस

बेशमी बनशी वल्लद सोनक्या महार राहणार हातरुण ता. बाळापूर यांस:-

मी खालीं सही करणार या नोटिशीनें असें कळवितो कीं तुह्मी तारीख २५ माहे जून १९०१ रोजीं वऱ्हाड समाचारातून जी नोटीस दिली ती अगदी खोटी आहे. तुमचे शेत मजजवळ तारें गहाण आहे व गहाणखतांत लिहिलेल्या मुदतींत आमचे पैसे फेडले नाहींत तर लहान गहाणाचीहि शर्त त्यांत आहे आपली मुदत संपली तरी तुह्मी पैसे आणून दिले नाहींत शिवाय तुह्मी नोटिशींत लिहिल्या प्रमाणें, रा. रा. पूर्णाजी पाटील मांजरीकर यांस पाशीं आह्मी हिशेब दाखवून पैसे मागितले. पण तुह्मी त्याजजवळ पैसे मुळींच अनामत ठेविले नसल्यामुळें त्यांनीं आह्मांला कांहीं दिलें नाहीं. यामुळें आह्मांस व्यर्थ खर्च व तसदीफ मात्र झाली. असो. आतां ही नोटीस पोचल्यापासून ४ दिवसांचे आंत आमचे हिशोबाप्रमाणें आजतारखेस निवत असलेले ४४० रुपये दोन सद्गृहस्थांच्या देखत हिशोब पाहून घेऊन देऊन टाकावेत व आपलें शेत वापस घ्यावें. येणें प्रमाणें मुदतींत निकाल न झाल्यास मी जबाबदार मी नाहीं. या पुढें ४४० रुपयावर व्याज अ करले जाईल, किंवा मला वाटल्यास तें शेत शरती प्रमाणें लहान गहाण करून टाकीन. मग तुमची कसलीहि तकरार चालणार नाहीं. या नोटिशीचा खर्च तुह्मापासून घेतला जाईल. कळावें तारीख १० माहे जुलै सन १९०१ इसवी.

सही

गणपती वल्लद गंगाजी नाथ साहूकार रहाणार हातरुण दस्तुर खुद्द.

---

नोटीस

बेशमी नामदेव वल्लद तुकाराम सोनार रहाणार आलेगांव ता. बाळापूर यांस:—

मी खालीं सही करणार या नोटिशीनें असें कळवितों कीं, आलेगांव येथील तुमची दुकान सुद्धां निमे हवेली आह्मास २३५ रुपयांस विकत देऊन खरेदीखत लिहून देण्याचा तुह्मी करार केला होता. त्यास आज ५-६ महिने होत आले. प्रथम २ रुपये इसार घेतला होता व आपणास पैशाची फारच जरूर असल्यामुळें लगेच २-३ दिवसांनीच आणखी शंभर १०० रुपयेहि तुह्मी घेतले. पुढें आज उद्यां बाकीचे रुपये घेऊन खरेदीखत लिहून देतो असें करितां करितां आतां झालेला सर्वच व्यवहार तुह्मी ख्वाहीनें नाकबूल जातां; तर इतकेंच कळवितों कीं, ही नोटीस पावल्या पासून ४ दिवसांचे आंत तुह्मी आपले राहिलेले १३३ रुपये घेऊन जाऊन खरेदीखत लिहून द्यावें. असें वरील मुदतींत न कराल तर तुमच्यावर विश्वासघाताबद्दल फौजदारी करून अखेर निकाला पर्यंत होणारे सर्व खर्चनुकसानीसह जागा ताब्यांत घेऊं. कळावें तारीख ९ माहे जुलै सन १९०१ इसवी.

सही

गोविंद कडताजी पाटील रहाणार आलेगांव दस्तुर खुद्द.

---

नोटीस

बेशमी जानू वल्लद महादू लोन्नारी रहाणार बाळापूर कागदी पुऱ्यांत यांस:-

मी खालीं सही करणार या लेखानें असें कळविते कीं, मी शहाणी झाल्यापासून तुह्मी मला मुळींच घरीं नेले नाहीं. आज ७-८ वर्षांत तुह्मी माझ्या अन्नवस्त्राची कांहीं एक तजवीजहि केली नाहीं. माझी विचारपूस करण्याची तुमची वासना दिसत नाहीं. शिवाय माझी नांदवणूक जनरीतीप्रमाणें तुह्माकडून होईल असा मला भरंवसा वाटत नाहीं. सबब मी या नोटिशीनें असें कळविते कीं, मला फारकती देऊन माझ्या पोटापाण्याबद्दल जें आज मित्ती पर्यंत कर्ज झालें आहे तें सर्व देऊन टाकावें. नाहीं तर चार संभावित पंचांची, माझ्या जीवास धक्का बसणार नाहीं व माझा संसार नीट चालेल अशी खात्री करून देऊन मला घेऊन जावें. तसेंच सावकाराचें कर्ज फेडून मला ऋणांतून मुक्त करावें. ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत माझी योग्य व्यवस्था करावी. ती वरील मुदतींत न झाल्यास मी हीच नोटीस फारकती समजून दुसरा गंधर्व लावीन. मग तुमचा मजवर नवरेपणाचा किंवा कसलाहि हक्क रहाणार नाहीं. शिवाय सावकाराच्या पैशाबद्दल फिर्याद करून कोर्टखर्चा सुद्धां सर्व रक्कम भरून घेतली जाईल. कळावें तारीख १२ माहे जुलई सन १९०१ इसवी.

सहीची निशाणी

तुळसी मर्द जाणु लोन्नारी निशाणी हातची बांगडी.

---

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस.

वि. वि. आपल्या तारीख २४ जूनच्या अंकांत " हें आहे तरी काय " या लेखांत येथील लायब्ररीच्या चालकांसंबंधानें लोकांचा उगीच गैरसमज होण्यासारखा मजकूर एका वर्गणीदारानें केवळ परिस्थितीचें अज्ञान असल्यामुळें प्रसिद्ध केला आहे ह्मणून हें पत्र लिहिलें त्यास येत्या अंकीं स्थळ मिळण्याची कृपा व्हावी.

१ लायब्ररीचे चालक सालोसाल बदलतात व त्यांत नव्याजुन्या मतांच्या मंडळींची भेसळ होत असो. 'काळ' पत्र निघून ३ वर्षे झालीं तरी त्याचा शिरकाव होण्यास १८ व्यवस्थापकां पैकीं कोणी पुरस्कर्ता निपजू नये, यावरूनच तें पत्र किती ग्राह्य आहे याची कल्पना सहज होत आहे.

२ लायब्ररींत जीं पत्रें व पुस्तकें घेण्यांत येतात तीं साधारण लोकांची आवड निवड पाहूनच घेतलीं जातात. लोकांस विशेषें करून तें पत्र पाहिजे होतें तर त्यांनीं आपली उत्सुकता दाखवावयाची होती. लायब्ररीचे नियम उदार तत्वावर रचले गेले आहेत. पायाशुद्ध खटपट केली असती ह्मणजे शहानिशः झाली असती. जी एक दोन वेळां खटपट झाली तिचा प्रकार पुढें लिहिल्या प्रमाणें होता.

गुदस्ता एक वेळ हें पत्र चालकांच्या नजरेस पडावें ह्मणून लाल शाईनें चिताड करून टेबलावर टाकलेलें होतें. तिकडेस जेव्हां कोणाचे लक्ष गेलें नाहीं तेव्हां १०-१५ गृहस्थांच्या सह्यांची एक सूचना आली होती पण त्या वेळची चालक मंडळी निराळी असून त्यास बहुमत मिळालें नाहीं.

पण या वेळच्या खटपटीचा मासला तर विलक्षणच आढळून आला. सभेच्या पूर्वीं कांहीं वेळ ती सूचना न येता ऐनवेळीं अध्यक्षांच्या हातांत आणून दिली. चळवळ जी आढळून आली ती साधारण अल्लड वृत्तीच्या लोकांत व विद्यार्थी वर्गांतच दिसून आली, हें त्या सूचनेवरील सह्या व त्या घेण्याकरितां जी मंडळी फिरकत होती व एक सन्माननीय गृहस्थांची सही ऐनवेळीं नाहींशी झाली या गोष्टीवरून उघड दिसून आलें.

तेव्हां अशा संशयित स्थितींत ती एकदम विचारास घेणें अध्यक्षास नियम १४ अन्वयें प्रशस्त वाटलें नाहीं.

रा. रा. भावे यांनीं ती सूचना पुढें करतांना ह्मटलें कीं तें पत्र जर लोकांस आवडतें तर घेण्यास कोणती हरकत आहे, यावर अध्यक्ष ह्मणाले कीं लोक ह्मणजे कोण व त्यांत आमचा समावेश होऊं शकत नाहीं काय? जर बहुजनास तें पाहिजे असेल तर तशी सूचना योग्य रितीनें योग्य वेळीं येऊं द्या ह्मणजे आपण तिचा विचार करूं माझा कोणताही दुराग्रह नाहीं.

त्या प्रसंगी तें इतकें मात्र ह्मणाले कीं, पत्राची भाषा फार जहाल असते व विचार सरणी दुटप्पी ( Insidious. ) असते तसेच केसरी व अमृतबजार पत्रिका प्रशस्त भाषा वापरीत नाहींत. व याच्या समर्थनार्थ कांहीं प्रत्यंतरें दिलीं.

हा मतविरोधाचा प्रकार असेल ह्मणून लायब्ररीचें अध्यक्षस्थान स्वीकारलें ह्मणजे स्वमत प्रदर्शित करण्याचा हक्क अजिबात उडून जातो असें कोणीही ह्मणणार नाहीं. अर्थात कोणाच्या विद्वत्तेचें व सौजन्यशीलतेचें तेज पडून मना सारखी गोष्ट झाली नाहीं ह्मणजे वाटेल तशी विधानें व दोषारोप करावे हा प्रकार गर्हणीय नव्हे काय? कळावें ही विनंती. ता० ५।७।१९०१ इ०

ना. वा. हरकरे.

---

वऱ्हाडसमाचार

मित्ती आषाढ वद्य ३० शके १८२३

## यः क्रियावान् स पण्डितः

( मागील अंकावरून पुढें चालू )

आतां आपल्या अकोल्याचीच गोष्ट घेऊं. येथें जुने नवे, विद्वान् अविद्वान्, श्रीमंत दरिद्री असे अनेक अवस्थांचे लोक आहेत.

पांमध्यें नेहमीं खरें बोलणारा व कधींहि खोटें न बोलणारा असा एक तरी मनुष्य आहे काय? जर असेल तर सर्वांनीं त्याला देव मानून रोज त्याच्या दर्शनास जावें देवळांतल्या देवांच्या दर्शनास न गेलें तरी चालेल. जे विद्वान् व आपणास थोर समजणारे असतील त्यांस असें वाटेल कीं आह्मी कधीं खोटें बोलतें? आह्मी नेहमींच खरें बोलतों व अकोल्यांत एक काय पण शंभर खरें बोलणारीं माणसें सांपडतील असें ते ह्मणतील, मी खोटें बोलणारा आहें किंवा मी अप्रामाणिक आहें असें साधारणतः ज्याचें त्यास एकदम कळणार नाहीं. तिऱ्हाईताच्या दृष्टीनें आत्मपरीक्षण करून तो पाहील तर आपण बऱ्याच वेळा खोटें बोलतो असें त्यास कळेल. मात्र त्यानें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं 'नरो वा कुंजरो वा' असें बोलणें किंवा पोलिटिकल पणानें बोलणें हें खोटें बोलणेंच होय. अमका गृहस्थ नेहमीं खरें बोलणारा आहे किंवा खरें बोलण्याचें त्याचें व्रत किंवा बाणा आहे असा कांहीं अकोल्यांत कोणाचा लौकिक नाहीं! बहुतेक लोक असेंच प्रतिपादन करणारे आहेत कीं खरें बोलून चालावयाचें नाहीं. थोडें बहुत तरी खोटें बोलेंच पाहिजे. कसें चालत नाहीं याचा कांहीं कोणी अनुभव घेऊन पाहिला नाहीं. चालवून पहा ह्मटलें तर विचाची परीक्षा कोणी घ्यावी असें उत्तर देतील, परंतु वर्ष सहा महिने कोणी यत्न करून पाहील तर उत्तम चालतें असें त्यास खास वाटेल.

हल्लीं विद्वानांचा यत्न वाचण्याकडे व बोलण्याकडे चालला आहे. पुस्तकें वाचणारी मंडळी निघाली आहे, व वर्षोत्सव व्याख्यानमाला सुरू होऊन व्याख्यानाची व वक्तृत्वाची झोड उडणार आहे. पण हें सर्व वाक्पांडित्यच होणार. नेहमीं वाक्पांडित्य करित बसावयाचें किंवा क्रिया करावयाला लागावयाचें? ज्याच्या मनांत क्रिया करावयाच्या आहेत त्याला वाचनाची किंवा वाक्पांडित्याची फारशी गरज नाहीं. क्रिया करावयाला लागण्यास जितकी विद्वत्ता पाहिजे तितकी पुष्कळांच्या अंगीं आहे. सदा सर्वदा खरें बोलण्याचा जिचा बाणा आहे अशी मंडळी कां स्थापूं नये. परस्परांस साहाय्य करण्याचा जिचा उद्देश आहे अशी दुसरी मंडळी कां स्थापूं नये. दर महिन्यास प्रत्येकाचा कांहीं तरी धनसंचय व्हावा व तें संचित धन एखाद्या व्यापारांत घालून तें वृद्धिंगत करण्याचा जिचा उद्देश आहे अशी मंडळी कां स्थापूं नये. एखाद्या गरिबगुरिबावर पोलिसाचा किंवा सरकारचा जुलूम झाला असतां योग्य उपायांनीं त्यांतून त्यास सोडविण्याचें ज्यांनीं व्रत घेतलें आहे अशा व्यक्तींची मंडळी कां स्थापूं नये. देशांत हल्लीं दरिद्र वाढत जाऊन पुष्कळ लोक देशोधडीस लागले आहेत त्यांस कोणत्या उद्योगास लावून देतां येईल याचा विचार करणारी मंडळी कां स्थापूं नये. या सारखे उद्योग करणें हें क्रियावान् होणें होय. देश जर ऊर्जित दशेस येणार असला तर तो गप्पांनीं येणार नाहीं, क्रियांनींच येईल ही गोष्ट सर्वांस मान्य नाहीं काय?

## मानसिक धैर्य

कोणत्याही प्रकारचा धीटपणा जरी अपला तरी त्याचें अधिष्ठान मनच होय. धैर्य हा गुण नेहमीं मनालाच धरून असतो; स्थूल शरिराशीं त्याचा संबंध नाहीं. मनुष्यामध्यें हा गुण स्वभावतःच कमीजास्ती असतो अभ्यासानें तो संपादिला जातो. तरी पण प्रसंगीं जितका उपयोगी पडावा तितका तो पडत नाहीं. वस्तुत या गुणाचे प्रकार असंख्य संभवनीय नाहीं. तथापि ज्या प्रसंगांच्या संबंधानें या गुणाविषयीं आपण बोलतों त्या प्रसंगांच्या भिन्नत्वामुळें या गुणाचे प्रकार अनेक असा भास होतो. वाघाची शिकार करावयाला धैर्य लागतें; साथीला भारावयाला धैर्य लागतें; पर्वत उभें राहून बोलावयाला धैर्य लागतें; मोहाला जिंकण्याला धैर्य लागतें; कोणी वरिष्ट आपणांस अपमानकारक भाषण बोलला असतां त्याला उत्तर द्यावयाला धैर्य लागतें; तसेंच दुसऱ्याला आवडणार नाहीं अशी गोष्ट बोलावयाला ह्मणजे खरें बोलावयाला धैर्य लागतें. अशा रीतीनें अनेक प्रकारचें धैर्य असतें असा भास होतो. येथें ज्या धैर्याविषयीं विचार करावयाचा आहे तें मानसिक धैर्य होय आंतही थोडा सूक्ष्मपणाच आहे, तो उदाहरणांवरून ध्यानीं येईल.

एखाद्या सरकारी अधिकाऱ्याकडे कोणी नोकरी करितां अर्ज करितो. त्या अधिकाऱ्याच्या मनांत रिकामी असलेली जागा कोण्या विवक्षित गृहस्थास द्यावयाची असते. अशा वेळीं तो अधिकारी अर्जदारास सांगतो कीं, 'जागा खाली तुझी पूर्वींच आली असती तर तुह्मालाच दिली असती.' दुसरा अधिकारी असें उत्तर देतो कीं, 'तुमचें अक्षर चांगलें नाहीं.' तिसरा असें ह्मणतो कीं, 'जागा रिकामी नाहीं' अशा प्रसंगीं अर्जदारास वस्तुतिक जी स्थिति असेल ती प्रमाणें अधिकारी उत्तर कां देत नाहीं, याचा मोठा चमत्कार वाटतो. एखाद्या अधिकाऱ्यास आपल्या हाताखालच्या शिपायास कांहीं काम सांगावयाचें असतें. व ज्या गोष्टीच्या संबंधानें काम सांगावयाचें असतें ती गोष्ट त्याच्या स्वतःच्याच आवडीची किंवा नावडीची असते. ह्मणजे समजा कचेरीच्या आसपासची जागा स्वच्छ करणें किंवा कांहीं सामानसुमान नीट लावून ठेवणें किंवा नोकर रजा मागत असल्यास ती देणें इत्यादि. अशा प्रसंगीं ती गोष्ट करण्या संबंधानें किंवा न करण्या संबंधानें या अधिकाऱ्यास आपल्या वरिष्ट अधिकाऱ्याचें नांव पुढें करावें लागतें. "अमुक दिवशीं साहेब यावयाचे आहेत या करितां असें असें कर किंवा तुला रजा देतां येत नाहीं." वरिष्ठाचा हा भिडस्तपणा चमत्कारिक वाटतो. एखाद्या वरिष्ठ कामगारास ज्याचें काम उत्तम असेल याची त्यास शिफारस करावयाची असते. काम करणारांत कोणी गरीब कोणी श्रीमंत, कोणी मोठ्या माणसांचे आप्तइष्ट असे असतात. अशा प्रसंगीं कांहीं देखरेख करणारांकडून योग्य मनुष्याचीच ह्मणजे ज्याचें काम देखरेख करणारांस पसंत पडलें असेल त्याचीच शिफारस केली न जातां देखरेख करणारा मलत्याचीच शिफारस करितो. येथें देखरेख करणारानें आपल्या भित्रेपणानें भलतेंच केलें इतकेंच नाहीं तर अन्यायही केला. एखाद्या प्रसंगीं असे देखरेख करणारे अनेक असतात. एक वर सांगितल्या प्रमाणें अन्याय करितो. व जो मोठा मनुष्य असल्यास दुसरे त्यास सहाय होतात. उत्तम काम कोणी केलें हें साधारणतः सर्वांस कळतें. पण समजा पक्षपाताच्या आंधळेपणामुळें तें एकास कळेल नाहीं. परंतु ज्यांना तें चांगलें कळलें त्यांनीं आपल्या मनाप्रमाणें योग्य अशा मनुष्याचें नांव पुढें करावें, तें न करितां झाला हो लावूं तें अन्याय होऊं देतात हा त्यांचा केवळ भित्रेपणा होय!

हीं जीं वर तीन चार उदाहरणें सांगितलीं त्यांतील भित्रेपणास काय ह्मणावें? परंतु पाहूं गेलें असतां अशा भित्रेपणाचीं उदाहरणें नेहमीं दृष्टोत्पत्तीस येतात. अशा रीतीचा भित्रेपणा दाखविणारीं माणसें सर्व गोष्टींत भित्रीं असतात असें नाहीं. तीं शूरही असतात. परंतु कांहीं प्रसंगीं त्यांना असें कां करावें लागतें हें समजत नाहीं. सूक्ष्म विचार केला असतां या भित्रेपणाचें कारण असें दिसतें कीं, कांहीं विवक्षित व्यक्तींनीं आपणांस वाईट ह्मणूं नये असें त्यांच्या मनांत असावें. विद्याखात्याचे माजी डायरेक्टर पटवर्धन साहेब हे एकंदरीनें मोठे निर्भीड व बहादर असत. पण कांहीं प्रसंगीं या मानसिक धैर्याची त्यांच्या ठिकाणीही उणीव दिसे. त्यांच्या मनांत एखाद्या शिक्षकास एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं बदलावयाचें असलें किंवा अजिबात काढावयाचें असलें तर ते जिल्हा इन्स्पेक्टराचें नांव पुढें करून त्यास ह्मणत कीं, "तुझे इन्स्पेक्टर असें असें ह्मणतात, मी काय करूं!" कांहीं दिवसांपूर्वीं अकोल्यांतच एका कचेरींत एक जागा रिकामी झाली होती. अर्जदारांनीं तेथें अर्ज नेले तेव्हां "ही जागा भरण्याचें माझ्या हातीं नाहीं" असें साहेबांनीं सांगून त्यांस वाटेस लाविलें, व मागाहून ती जागा आपणच भरली. तसेंच अलिकडे खानेसुमारीच्या सर्टिफिकिटां करितां शिफारस करण्याच्या संबंधानें वर सांगितल्या प्रमाणेंच प्रकार झाला आहे असें पुष्कळ ठिकाणचे लोक बोलतात.

साधारणतः आपले लोक ह्मणतात कीं, मानसिक धैर्याची आमच्या लोकांत फार उणीव आहे. साहेब लोकांशीं तुलना करून पाहतां हें विधान एकंदरीनें खरें असावें असें जरी वाटतें तरी साहेब लोकांतही हें धैर्य पुष्कळांच्या अंगीं असतें असें नाहीं. आमचा समुदाय फार मोठा असल्यामुळें ज्यांच्या अंगीं धैर्य नाहीं अशा व्यक्ति आपल्या पाहण्यांत फार येतात. परंतु विद्वानां मध्यें जेव्हां अशी भ्याड मंडळी दृष्टीस पडते तेव्हां नवल वाटतें इतकेंच नाहीं तर वाईटही वाटतें. नीतीच्या सदराखालीं येणारे जे गुण आहेत त्यांस विद्वान् आणि समंजस अशांपाशीं जर आश्रय मिळाला नाहीं तर त्यांनीं आश्रयास जावें कोठें! वर सांगितल्या प्रकारच्या भित्रेपणापासून भित्र्या माणसांची लोकांत मानहानि होतेच परंतु अन्याय झाला असता लोकांचें नुकसानही होतें व नीतीच्या प्रगतीस अडथळा येतो.

---

आपल्या चक्रवर्ती बादशहांची एक एक सुंदर प्रतिमा काढवून ती, सरकारी व सार्वजनिक मोठमोठे वाडे, बंगले व कचेऱ्या वगैरे सारख्या प्रत्येक सुप्रसिद्ध स्थळीं लावून ठेवावी अशी हिंदुस्थान सरकारची फार मनीषा दिसते. न्यायाच्या, दरबाराच्या वगैरे स्थल महात्म्या प्रमाणें उत्तम, मध्यम, किंवा कनिष्ट प्रकारची तसबीर त्या त्या ठिकाणासाठीं देण्यांत येणार आहे. दरएक उत्तम तसबिरीस ९० पासून ७५ व मध्यम प्रतीच्या तसबिरीस ३० पासून ५० पौंड पर्यंत खर्च येईल असा अदमास आहे. येणें प्रमाणें ह्या कामास पुष्कळच पैसा लागणार आहे. पण हा सर्व पैसा परदेशीय कारागिरांच्याच पदरांत पडणार ना! आमच्या इकडील लोकांना हें काम सुबक वठवतां येणार नाहीं काय? ह्या प्रसंगीं आपचें हस्तकौशल्य कसोटीस लावण्यास सरकारनें विसरूं नये.

---

कित्येकांचा असा आक्षेप आहे कीं, इतका पैसा ह्यांत खर्चण्या पेक्षा हिंदुस्थानातील रुपयां वरील बादशहाच्या प्रतिमेच्या छा मुळें आपला सर्व कार्यभाग होणार आहे. पण ह्या वर सरकारचें असें ह्मणणें पडतें कीं, हिंदुस्थानांत रुपयांची फार तूट आहे. लोक कंगाल झाल्यामुळें त्यांच्या जवळ रुपये उरलें नाहींत. असो. वरील ह्मणणें अगदीं खरें आहे, व तें सरकारच्याच तोंडून निघालेलें ऐकून इंग्रजी राज्यांतील आबादानी कशी व किती आहे ह्याचें निराळें स्पष्टीकरण करण्याची जरूर नाहीं. आणि ह्मणूनच कांग्रेस सारख्या सभांनीं आमच्या देशांत स्थितीची कडू कहाणी सरकारच्या बधिर झालेल्या कानांत वारंवार सांगूनही आमच्या दुःखाचें परिमार्जन करण्याची प्रेरणा सरकारच्या मनांत होत नाहीं. ह्मणून मात्र प्राणानें जीव फार चरफडतो आज नाहीं उद्यां तरी दयाळू सरकारास ह्या गरीब व दीन रयतेची कींव येवो ह्मणजे झालें.

---

आमच्या चक्रवर्ती महाराणींची तसबीर प्रमुख प्रमुख ठिकाणीं लागलेली पाहून आह्मांस आनंद होईल ह्यांत शंका नाहीं. महाराणींच्या पुण्यपवित्र पायांचे रोजच्या रोज दर्शन सहजवारी आह्मांस घडणार हें तरी आपचें सुदैवच होय. पण ज्या गोष्टींनीं महाराणी साहेबांनीं आह्मांस शांतता सौख्यांत आणून सोडिलें, ज्या सद्गुणांनीं त्यांनीं आमचीं मनें आपल्या मनाशीं एकवटून टाकलीं, ज्या कृपाप्रसादांनीं आमची भक्ति व निष्ठा त्यांनीं आपल्या कडे ओढून घेतली, व ज्यांनी ज्ञानार्जनाची व स्वातंत्र्यसुखाची गोडी आमच्यांत उत्पन्न करून आमच्या भावी अवर्णनीय सुखाची आशा आह्मांस दाखविली त्या सर्व गोष्टींचें अनुकरण करून आह्मांस व आपल्या प्रिय मातोश्रीस ते आनंदित करतील तर त्यांच्या तसबिरी कुठें ठेवूं व कुठें न ठेवूं असें आह्मांस होऊन

जाईल. अशा रीतीच्या सद्गुण लेखनीनें रेखाटलेली तस्बीर आमच्या हृदय चित्रपटावर सततची राहील. व कधीं काळीं कोणत्याहि दुष्टवासनेचे त्यास डाग पडून खराब होईल किंवा ती फुटून जाऊन भंग पावेल अशी कुकल्पना मनांत सुद्धां कोणी आणूं नये. आपल्या सुचारितांचा जो फोटो तोच आपला खरा फोटो होय, व तोच मोठा काढून आपल्या डोळ्या पुढें मांडावा. म्हणजे आपल्या जीवित्वाचें खरें सार्थक झालें.

# The Berar Samachar

MONDAY JULY 15 1901

We have to fight hard an uphill battle if we would check the growth of poverty and regain a footing in material progress. This battle is to make way for a general progress of the whole nation. British rule does not promise to be a new and hopeful era to our poor and dying nation. There is no one goal of ambition to which the improvement of all individuals should be subservient. The national entity is unknown to our people. There is no common bond or central force which will keep us together. The individualistic phase of life is predominent in India. And the spirit of competition has set all people to work in all divergent directions. The British sovereignty promised for some time to fill up the void of one nationality. It was the proud membership of this august British nation that moved our people to work in perfect harmony to magnify the greatness and the glory of the British empire. The membership of this vast partnership in empires is however a dream. We are thrown off from the privilege. We are not considered as the component parts of the whole nationality. We are given the place of a mob. We have to work hard to contribute to the pleasures of our rulers but we are fast dwindling into the depths of poverty. We are infact the adjuncts of the British nation but are not allowed to be the robus and healthy members of the whole system. So it seems to us that for the purposes of peace, and order, and the safety of purse and person we went hand in hand with our rulers. But we parted at this point and our diverse paths led us in distant regions. The British people grow richer beyond the realms of avarice whereas we grow poorer and sink into the unknown depths of poverty. We are politically divided from our rulers. We are cared for in as much as we minister to their wants and serve as safe instruments in their hands for their own exclusive greatness. But where our interests seem to conflict with those of our rulers, there we are abandoned to our fate to do what we can for ourselves. Thus we have no one common unit for the greatness of which all our people would exert on all sides. The work of the National Congress was to weld the Indian people into one nationality but it falls short when it attempts at achieving the elevation of the Indian people as a whole.

All our hopes die out as our political progress seems to be at a hault. We are proud to say that we are the subjects of that Great Western nation but we find to our sorrow that the step motherly manner in which we are treated promises us no prospects of hope. We want that moral tone of independence which independent means of earning bread can purchase for our people. We cannot afford to live in luxurious comforts of life and waste our time in idle spirit of inaction. We must be keen alive to our own defects and difficulties. And must gather up strength to work our way single—handed towards that distant goal of ambition and glory.

—:0:—

It is instructive to note in the following paragraph how the indications of a falling nation as portrayed therein are observable in India. The remarks are from the pen of the well—known author Mr. Helps. He proceeds to remark:—

"I doubt whether any of the reasons, which have been assigned for that decadence, reach to the real cause—the *causa causans* as the metaphysicians would call it. I doubt, for instance, whether luxury, or whether the irruption of barbarian hordes, has been the true cause of the downfall of nations. I think it would be found in *the exhaustion of hope and purpose*—an exhaustion to which bad government must very greatly contribute. Take the Romans, for instance. They had done almost every thing that a nation could do; and had done it well. But there came a time when they became hide—bound, as it were; and there was a total want of hope and faith in the nation. This, I believe, may be perceived throughout the literature of the lower Empire. Men had ceased to believe that there was any thing good to be done in respect of political and social life. And men are so constituted that they cannot work well or even fight well, when their minds are in this state of stagnation.

—:0:—

In connection with the recent legislation on the rights of an agriculturist to alienate his land Mr. Thorburn has shown in the following eloquent manner the evils of the measure:—

"That within a generation the birthright of a people, universally acknowledged to be "the finest peasantry in India," had been filched from them by "our system" was a cause of humiliation for the self—sufficient bureaucrats of India. The corollary, too, was equally unpleasant: the most extensive economic achievement of British rule throughout our Eastern Empire had been the reversal of the old relations between agriculturists and money—lenders."

## वऱ्हाड

हवामान—पाऊस लोकांस फार चाळवितो पण शेवटीं निराशा करीत नाहीं. ही आनंदाची गोष्ट होय. पेरण्या चांगल्या साधल्या असून लहान रोपें जोरावर आहेत. किरकोळ ताप, हागवण, खोकला वगैरे दुखणीं वाढलीं आहेत.

मृत्यु—या सप्तकांत आह्मास मोठ्या दुःखाचीं तीन वर्तमानें लिहावीं लागत आहेत या अशुभ गोष्टी मनाला मोठा खेद देतातः—

पहिला मृत्यु रा० रा० यशवंत मोरेश्वर काळे, तहशिलदार मलकापूर यांचा होय. छातीच्या विकृतीनें यांचा अंत स्वल्प काळांत गेल्या ७ वे तारखेला झाला. हे गृहस्थ स्वभावानें फार चांगले होते व स्नेहाच्या कामाला फार लायक असत. ते आपल्या कर्तबगारीनें व मन मिळाऊपणानें तहशिलदारीच्या हुद्देदारीला चढले होते.

तसेंच रा. रा. प्रल्हाद नारायण जोग बी. ए. एल. एल. बी. उमरावती, यांस मिरज मुक्कामीं गेल्या शुक्रवारीं सकाळीं देवाज्ञा झाली. गेल्या वीस वर्षांपूर्वीं जे इंग्रजी वकील वऱ्हाडांत येऊन पुष्कळ श्रीमान् व लौकिकवान् झाले त्यां पैकीं हे एक होते. यांनीं दौलत मोठी कमावली. हे विद्वान् व बुद्धिवान होते. वकिलीचा धंदा हे उत्कृष्ट चालवीत व सावकारींतही हे निपुण होते हें त्यांच्या इस्टेटी वरून कळून येईल. यांनीं आपल्या पैशाचा व्यय उत्तम रीतीनें करण्याविषयीं आपल्या मृत्यू लेखांत लिहून ठेविल्याचें समजतें, १ लाख रुपये अन्नछत्रासाठीं, १० हजार धर्मार्थ दवाखान्यासाठीं, १० हजार बनारस कालेजसाठीं ३००० थिआसोफिस्ट हॉल बांधण्यासाठीं व पुष्कळशी रकम आपल्या गरीब नातलगासाठीं मुद्दाम काढून ठेविली आहे ह्मणतात. ह्या शिवाय खुद्द आपल्या मुलींना व पत्नीला निराळे पैसे दिले आहेत. अशा तऱ्हेनें आपल्या पैशाचा सद्व्यय करण्याची उदार बुद्धि त्यांच्या अंतःकरणांतील सात्विक हेतूची साक्ष देते.

तिसरा मृत्यु मि० एफ. राइट पेनशनर पोलिस सुपरिन्टेंडंट यांचा होय. हे निजामशाहीं येथें वारले. त्यांच्या चांगल्या कारभारा वरून लोक यांची आठवण वारंवार काढतात. यांचे चिरंजीव मि० राईट हे बुलढाण्याहून रजेवर निकडेच गेले आहेत.

गुणग्राही—रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी हे पेनशन घेणार आहेत असें ऐकून सूचवितात कीं, यांच्या उत्कृष्ट सार्वजनिक कारकीर्दी बद्दल व त्यांच्या सोज्वळ व कल्याणकारी सुवर्तना बद्दल पानसुपारीचा मोठा समारंभ करावा. ही सूचना फार नामी आहे. आणि अशा सद्गृहस्थाला सन्मान देऊन स्वतांला कोण धन्य मानून घेणार नाहीं बरें!

### नोटीस

रा० रा० बापूसा वल्लद हंसाजी काळेनेने राहणार वाघवीर तालुके जळगाव यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुह्मास शेगांव तालुके खामगांव येथें रोखा रुपये पांचशेंचा लिहून दिला त्या पैकीं त्या ठिकाणीच त्याच दिवशीं मी आपल्यास रुपये दोनशें दिले. व बाकीचे रुपये तीनशें मी देण्यास तयार आहे. आपणास खामगावीं रुपये ३०० देत असतां आपण घेतले नाहींत सबब या नोटीशीनें आपणास कळविण्यांत येतें कीं आपण नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत मनसुकदास चुनीलाल मारवाडे यांचे दुकानाहून आपले ३०० रुपये व्याजासह घेऊन जावेत व पावती द्यावी व आह्मी लिहून दिलेला रोखा रद्द करून त्यांचे हवाली करावा आपण जर आठ दिवसांचे आंत रुपये घेऊन न जाल तर पुढें आपल्यास रोख्यात लिहिल्या प्रमाणें व्याज मिळणार नाहीं. कळावें तारीख १२ माहे जुलई सन १९०१ इ०

(सही)

मुकाजी वल्लद येडाजी मानकर
राहणार जानोरी ता० खामगांव
निशाणी खुद्द हातची.
दस्तुर केशव लहानु जाधव
वस्ती खामगांव

### नोटीस.

बेशमी वाळंबी मर्द उदेभान पाटील माणकर कान्हेरी रहाणार सोनबरड ता. अकोट पोस्ट—अकोट. यांसः—

आह्मी खालीं सही करणार या नोटिसीनें असें कळवितो कीं, कान्हेरी येथील शेते सर्वई नंबर २,४,३२,३७ आणि ३९ हीं शेतें वडिलोपार्जित आहेत. हीं विकण्याचा, गहाण ठेवण्याचा, किंवा बक्षीस करण्याचा वगैरे कांहीं एक हक्क तुह्माला नाहीं. असे असतांहि जर ह्या व्यवहारा पैकीं एखादा व्यवहार कराल तर त्याबद्दल जबाबदारी खुद्द तुमच्या शिरावर राहील. तो व्यवहार वरील शेतांच्या इस्टेटीस बांधू शकत नाहीं. ह्मणून आपण असा व्यवहार करूं नये ह्मणून ही नोटीस दिली आहे. कळावें तारीख १४ माहे जुलई सन १९०१ इ०

सही.

बनी मर्द बळीराम पागरूद हल्लीं
वस्ती सोनबरड निशाणी बांगडी
दस्तुर आनंदा वल्लद जानजी
मानकर वस्ती सोनबरड
दस्तुर खुद्द.

### जाहिरात

सर्व लोकांस या लेखानें जाहीर करण्यांत येतें कीं, कान्हेरी ता. अकोट येथील शेते सर्वई नंबर २,४,३२,३७, आणि ३९, हीं शेतें वाडिलोपार्जित आहेत. सबब हीं गहाण, विक्री, किंवा बक्षीस वगैरे कोणी करून घेऊं नयेत. वाळंबी मर्द उदेभान पाटील माणकर कान्हेरी ह्या बाईचा ह्या शेतांची कोणत्या तऱ्हेनें तरी विल्हेवाट लावण्याचा विचार आहे ह्मणून ही जाहिरात दिली आहे. याउपर जर कोणी तिजपासून कांहीं शेते वगैरे कोणत्याहि रुपानें घेईल किंवा तिला कर्ज देईल तर त्याचा तो जबाबदार राहील. त्याजबद्दल ह्या वरील शेतांच्या इस्टेटीवर कांहीं बोजा रहाणार नाहीं. कळावें तारीख १४ माहे जुलई सन १९०१ इसवी०

सही

बनी मर्द बळीराम पागरूद हल्लीं
वस्ती सोनबरड निशाणी बांगडी दस्तुर आनंदा वल्लद
जानजी मानकर वस्ती
सोनबरड दस्तुर खुद्द.

### नोटीस

रा. रा. गंगाधर रावजी सोहनी ऑफिशिएटींग डिपुटी इनस्पेक्टर, अकोला. यांस.

विनंती विशेष. आपणांस इनस्पेक्टर मंडळीचा फोटो २ रुपये ६ आण्यास फ्रेम सुद्धां विकत दिला हीं रकम चार दिवसांचे आंत न आल्यास कोर्टांत दावा करून सर्व खर्चासह रकम भरून घेतली जाईल. कळावें तारीख १४।७।१९०१ इ.

सही

सदाशीव अनंत पेंढरकर ड्राइंग
मास्तर हायस्कूल अकोला.

## वर्तमानसार

अति मोठी गुहा—अमेरिकेंत एडमंडसन परगण्यांत केंटकी येथे एक अति मोठी राक्षसी गुहा आहे. ती इ. स. १८०९ मध्यें एका शिकारी गृहस्थास सांपडली. ही पृथ्वीच्या पोटांत सुमारें नऊ दहा मैल आंत गेलेली आहे, आणि हिचे जे अनेक फांटे वगैरे आज पर्यंत सांपडलेले आहेत त्या सगळ्यांची मिळून एकंदर लांबी सुमारें पाऊणशें मैल होईल. या गुहेंत तेवीस खंदक आहेत. सत्तेचाळीस उंच असे घुळके आहेत. आठ पाण्याचे धबधबे आहेत. व कित्येक लहान लहान नद्या असून आंत तीन सरोवरें आहेत. यापैकीं एक सरोवर लहानशा समुद्रासारखें आहे. मुख्य गुहा ह्मणजे एक मोठा थोरला २७४ फुट लांब व ९४ फुट रुंद असा दिवाणखानाच आहे. याची उंची कोठें ३९ फुट तर कोठें १२९ फूट आहे यांत फार प्राचीन काळीं मनुष्यांची वस्ती असावी असें ह्मणण्यास आधार आहे. सुमारें ७० वर्षांपूर्वी लुईव्हिली येथील कर्नल कोगन या गृहस्थानें ती २ हजार पौंडांस विकत घेतली. पुढें या गुहेबद्दल त्याला लोक ६७ पट जास्त किंमत देण्यात तयार झाले, परंतु ती त्यानें कोणास दिली नाहीं असें ह्मणतात.

माशांचा वर्षाव— थोड्या दिवसांपूर्वी दरभंगा [ बंगाल ] शहरीं पाऊस पडला, आणि त्या पावसांत इतके मासे पडले कीं मैदानावर, घरावर, आणि प्रत्येक उघड्या जागेंत मासेच मासे झाले. बंगाल्यांतेल बहुतेक लोक मासे खाणारे आहेत, तेव्हां मासे धरून नेण्याचा तेथील मुलांनीं सपाटा उडविला.

विडी बक्षीस—जीं मुलें आले धडे चांगले पाठ करतील त्यांना बक्षिशीदाखल विडी देण्याची चाल मेक्सिको येथील शाळांत आहे.

हजामास्त्रिया— आस्ट्रेलिया देशांतील शहरांत हजामाचा धंदा पुष्कळ स्त्रिया करितात. तेथल्या स्त्रियांना पहिल्यानें या कामाची परीक्षा द्यावी लागते. केंस काढणें कापणें ह्या विषयांची त्यांना चांगली माहितगिरी संपादावी लागते.

३४ मुलांची आई— नुकतीच इटाली देशांत खानेसुमारी झाली तेव्हां एका बाईस ३४ मुलगे असल्याचें समजण्यांत आलें. ह्या बाईचा विवाह १६ वें वर्षी झाला. हल्लीं ह्या बाईचें वय ५६ वर्षांचें आहे ३४ पैकीं ४ पुत्र मयत असून ३० पुत्र आपल्या माता पितासमवेत राहिले आहेत. आमच्या इकडे आशिरवाद सुद्धां ८ पुत्रापेक्षां जास्त पुत्राबद्दल मिळत नाहीं. तर प्रत्यक्ष जास्त पुत्र संख्या कोठून मिळणार ? धन्य विचारी मावली. ज्ञा०

खरी न्यायप्रीति— लार्ड स्टान्सले यांनीं कलकत्ता येथील एका सद्गृहस्थाकडे प्रसिद्ध छपा केसमधील धडधडीत अन्यायानें त्रस्त झालेला कान्सटेबल नरसिंग यास देण्यासाठीं शंभर पाऊंड आणि मुलकी आणि दिवाणी खाते वेगळें करण्यासंबंधाचें कागदपत्र गोळा करण्यासाठीं ९० पाऊंड पाठविले आहेत.

चमत्कारिक रिवाज—सरव्हिया येथें लग्नास तयार असलेल्या मुलीचा रिवाज चमत्कारिक आहे. आपल्या राहत्या घराचे खिडकीला एक दिवा टांगून त्यास चांगले श्रृंगारतात. तो दिवा पाहून ह्या घरामध्यें विवाहास तयार कोणी तरी आहे असें समजून येतें.

एक घोडा कांहीं आजारानें मेल्यावर त्याची पोट फाडून तपासणी केली तेव्हां त्याच्या पोटांत विलक्षणच वस्तु सांपडल्या. कांहीं वाळू, तांब्याचें नाणें, एक घार आणी, बटन, टाक, पितळेचा तुकडा आणि खिळे इतके जिन्नस त्याच्या आंतड्यांत होते. हे पदार्थ त्याच्या खाण्यांत गेले असावेत. अश्वपालकानीं खबरदारी ठेवावी. व भलताच पदार्थ त्याच्या मुखांत पडणार नाहीं अशी व्यवस्था ठेवावी.

शिगारेटची भक्ती—रशियन स्त्रियांन फारच फार लागली आहे. शिगारेट ओढण्यासाठीं, माणसाच्या आगगाडीला एक निराळा स्वतंत्र डबा जरूर जोडावा अशाबद्दल रेल्वे कंपनीस हुकुम सुटला आहे

अद्भुत घड्याळ—चिकागो येथील एकानें १९ वर्षें श्रम घेऊन एक विलक्षण घड्याळ तयार केलें आहे. तें १८ फूट उंच असून १९ फूट औरस चौरस त्याचा तळ आहे तें घड्याळ ह्मणजे एक लहानशी सृष्टीच होय. त्याच्या तबकडीवर दर २४ तासास फेरी करणारा एक पृथ्वीचा गोल आहे वें चंद्र व इतर सूर्याभोवती फिरणारे तारेहि यांत आपल्या नियमित कक्षांत फिरत असतात. दर तासास हे वाजतें तेव्हां अमेरिकेच्या सर्व प्रेसिडेंटाच्या प्रतिमा ओळीनें दिसतात. हे घड्याळ मरेपर्यंत गुप्तांत ठेवून आणखी त्यात कांहीं गोष्टी दाखविण्याचा त्याचा विचार होता. पण एके दिवशीं त्या घड्याळाच्या चमत्कारिक अवाजामुळें पोलिसास संशय येऊन सर्व गुप्त गोष्ट बाहेर पडली.

जर्मन बादशहाचें मत— डाक्टर लोकांनीं दाढी राखूं नये व सर्व कापून टाकावी असें आहे. असें का ?

लार्ड किचनेर यांच्या सुद्धां मनांत बोअर लोकांस स्वातंत्र्य द्यावें असें आहे ह्मणतात पण ही गोष्ट इंग्लंडांतील कांहीं जणास नापसंत वाटते. इतके दिवस माजविलेल्या रणांगणाची कोणास काय फलप्राप्ति होणार हें न कळे. कित्येक इंग्रज लोकच बोअर लोकांस दारू गोळा पुरवितात असें कित्येकांचें ह्मणणें आहे ,यावरून बोअर लोकांचे इंग्रज शत्रू खरे, पण बोअर लोकांची स्वातंत्र्यप्रीयता व शौर्यबल हीं पाहून त्यासहि मोठें आश्चर्य वाटल्यावाचून रहणार नाहीं.

हात रुमाल— सुबक व सुरेख हातरुमाला चा शोभेपेक्षां उपयोग बराच आहे. पूर्वी हातरुमालाच्या रंगावरून आनंद, दुःख, व आपण कोणच्या पक्षाचे आहोत वगैरे गोष्टी यावरून तात्काळ कळत असत. व बोलण्याचा त्रास चुकत असे. हल्लीं जपानांत कापडाचे रुमाल न करितां कागदांचेच फार करूं लागले आहेत. व ह्यावर वेलबुट्टी व निरनिराळ्या आकृती काढलेल्या असतात. उपरण्याचीं कांहीं कामें हातरुमालानेंच उचललीं आहेत.

वर्णनीय कृतज्ञता—म्हैसूरांत काफीच्या बागेवर मोठे श्रीमान झालेले साहेब मि० हेनरी कार्बेटीस हे तेथील नेटिव लोकांसाठीं ४ लाख रुपये खर्च करून एक अन्नछत्र सुरू करीत आहेत ज्या लोकांच्या श्रमावर आपण श्रीमान् झालों, त्या लोकांस अन्नाचा गोळा मिळण्यासाठीं ४ लाख रुपयांवर सदर्हू साहेबांनीं उदक सोडलें, ही कृतज्ञता वर्णनीय होय.

उन्हाळ्यावर उपाय— वारंवार थोडथोडी लघवी होणें असा प्रकार कधीं कधीं होत असतो. तो बंद होण्यास स्वल्प उपाय असा कीं राखेचा ढेपसा अगर कांदा चिरून त्याचे अर्धुक बेंबीवर बांधून कांहीं वेळ निजावें ह्मणजे सुमारें ७।८ तास पडून रहावें, गुण हटकून येतो. कदाचित् न आल्यास पुन्हां एकवार करणें ह्मणजे झालें.

अंदरकी बात राम जाणें— एका साहेबास परवानगी वांचून घरीं राहिल्या बद्दल सरकारी नोकरीवरून काढून टाकण्यांत आलें. त्याचे वरिष्ट ह्मणतात कीं त्यास याच कारणासाठीं काढून टाकलें. परंतु कलकत्याच्या बंगाली वर्तमानपत्रानें असें छापलें कीं त्यानें आपल्या बरोबरीच्या एका कामदाराचे ६०० रुपये चोरले व त्यांतील कांहीं रुपयाची एक बंदुक विकत घेतली ह्मणून काढून टाकलें. हें त्या पत्रानें खोटें ■ पडें ह्मणून त्या पत्रावर खटला चालू झाला आहे.

## भारत भाग्योदय अथवा सोन्याचा दिवस

नंबर ४

आपल्या घरीं आलेल्या पाहुण्याचें आदरआतिथ्य करण्याच्या कामास त्या लहान शरयूला मध्यान्ह रात्र उलटून गेली पाहुण्यारात कांहीं एक उणें पडूं नये ह्मणून ती एकटीच आपली एक सारखी खपत होती. जेवणाखाण्याचा बातबेत व टापटीप तिनें फार चांगली ठेविली होती. जनार्दन देव व रघुनाथजी भोजनास बसल्यावर इकडच्या तिकडच्या गप्पा गोष्टी चालल्या होत्या. पण रघुनाथजीचें लक्ष्य त्या गोष्टींकडे नसून दुसरीकडेच वेधलें होतें. शरयूनें मोठ्या काळजीनें उत्तम उत्तम केलेले पदार्थ चाखून पहाण्याचें सुद्धा तो विसरला. शरयूला पाहिल्या पासून त्याची तहानभूक हरून गेली होती, त्या चंद्राननेनें त्याचें मन ओढून घेतलें होतें. त्याची दृष्टि तिच्या एका मुखाकडेच लागली होती. शरयू पाहुणचारात अगदीं निमग्न झाली होती. तरी दोघांची दृष्टादृष्ट होई तेव्हां ती विनयानें व लज्जेनें खालीं मान करी. शेवटीं भोजनोत्तर मुखशुद्धि व विडा पानसुपारी झाल्यावर रघुनाथजी निजण्यासाठीं बिछान्यावर जाऊन पडले पण कांहीं केल्या झोंप येईना. शरयूमुळें डोळे ओढून गेले होते मग झोंप तरी कशी येणार ! कांहीं वेळानें त्यानें आपल्या खोलीचें दार उघडलें व बाहेर चांदण्यांत बगिच्यांत भटकूं लागला. रात्रीच्या त्या समयीं चोहोंकडे शांत होतें. फक्त मधूनमधून किल्ल्याचा वरील गस्तवाल्यांची 'आलवेल' ऐकूं येत होती. पण अशा प्रशांत शीतल चंद्र प्रकाशांत त्याच्या मनाची तळमळ मात्र दुणावली. आपण कोठें आहों व काय करितों आहों ह्याचें त्यास भानच उरलें नाहीं. त्या शरयूची ती रम्य मूर्ति पुनः पुनः आठवून तिचें तें ध्यान आपल्या अंतःकरणांत पूर्ण ठसविण्याच्या उद्योगांत तो दंग झाला होता. शरयूच्या नामस्मरणानें व निदिध्यासानें त्यास वेडावून सोडलें. तिच्या प्राप्तीचे चटका लावून सोडणारे कल्पनातरंग एकावर एक उचंबळून त्यांनीं त्यास दुःखीकष्टी करून सोडिलें.

तारुण्यावस्थेंत आशा व प्रेम फार प्रबळ असतें. त्यांच्यामुळें अशक्य गोष्टीहि शक्य वाटूं लागतात. एक मन वटें कीं शरयू आपल्यास कशची प्राप्त होते, दुसरें मन वाटें कीं, काय झालें, ईश्वर कृपे करून ती आपणांसच कशावरून लाभणार नाहीं ! अशा प्रकारें तिजविषयींचे अनंत विचार मनांत घोळत आहेत तोंच एकाकी एक चकचकणारा पदार्थ त्याच्या दृष्टीस पडला. तो उचलून पहातो तों गळ्यांत घाल याचा मोत्याचा गळेसर. हा मौक्तिक हार शरयूचाच असावा असें तेव्हांच त्यांस वाटलें. ती तो येथें कसा विसरली हें त्याला समजेना. पण मोठ्या आवडीनें व आनंदानें तो त्यानें आपल्याच कंठांत घातला. प्रसादचिन्हानि पुरःसराणि-या ह्मणी प्रमाणें हें भावी सुखाचें सूचकच आहे असें त्याची ती गोड बोली आशा त्यास सांगूं लागली. तेव्हां तो घरांत आंथरुणावर येऊन निजला. व ह्या आनंदमयी मनोराज्यांत तो निद्रावश झाला.

दुसरे दिवशीं तो लगबगीनें उठला व मुखमार्जनादि प्रातर्विधी सारून देवीचा आशीर्वादप्रसाद ग्रहण करून त्यानें जाण्याची तयारी केली. जनार्दन देवाचा निरोप घेतला. पण शरयूचें पुन्हां एकवार दर्शन घेण्याची त्याची उत्सुकता बळावली. शरयू आपल्या नित्य नेमा प्रमाणें बागेंत फुलें तोडण्यास जात होती. तिच्या मागोमाग तोहि गेला. तिच्याशीं आपण कसें व काय बोलावें ह्या विचारानेंच तो गोंधळून घुटमळ्यात पडला. शेवटीं मोठ्या धैर्यानें तिच्याशीं दोन शब्द बोलण्याचें धाडस केलें. त्यानें तो सुंदर हार आपल्या कंठांतून काढून पुढें करून ह्मणाला– शरयू. हा पहा तुझा हार काल रात्रीं मला सांपडला आहे, मीच तो तुझ्या गळ्यांत घालूं कां ? हे गोड शब्द कानीं पडतांच तिनें मोठ्या प्रेमानें त्याजकडे पाहिलें व लगेच लाजली व फुलें तोडूं लागली. त्यानें तो हार आपण होऊनच तिच्या गळ्यांत घातला व मी आतां परत जातो ह्मणून निरोप मागूं लागला.

आपण हार असा कसा विसरलों कोणी जाणे, हें तिच्या लक्ष्यांत येईना. तरी रघुनाथजी जाण्यास निघालेले पाहून

शरयू—पुन्हां कधीं इकडे येणें झाल्यास घरींच उतरावयाचें हें निराळें सांगणें नकोच. पण आतां पुन्हां केव्हां यावयाचें ?

ही मधूर वाणी ऐकून त्याचा हर्ष गगनांत मावेना.

रघुनाथजी—आह्मी दुसऱ्याचे ताबेदार, पुन्हां कधीं येण्याचा प्रसंग येईल तेव्हां येईल. पण आमची ओळख राहीलना ?

यावर काय उत्तर द्यावें ही तिला सुचेना. व दोघांचेहि डोळे पाण्यानें भरून आले.

[ पुढें चालेल. ]

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No. 4

वर्षाची आगा... हाशील रु० १...
सहामाही " ३ " ८८
साल अखेर " ७ " १ ८८
किरकोळ अंकास .........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस......... ८१ ८६
दुसरे खेपेस .... .... ....८१

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Annual in advance 5 Postage 15 as
Annual in arrears 7 ,, 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ............................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...8 as

VOLXXXV AKOLA MONDAY 22 JULY 1901 NO 28

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख २२ माहे जुलै सन १९०१ इ० अंक २८

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई बॅंक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

### जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई दुकदम ॥। ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ०१२ कि. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणारा ची ट. ह. सह ०१४ ची मनिआडर पोंचतांच त्यांचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या बरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधीं च ठरवून ठेविलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ताः— एम. जी. तुपे. पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

### नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या व पिठोरी किंवा पाठोडा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्या पेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल, व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल कंपाझिटर.

वऱ्हाडसमाचार आफिस आकोला (वऱ्हाड)

### नादारी मुकद्दमा नंबर १

१९०१

नादारी नियमाअन्वयें नादाराला नादार ठरविण्या विषयीं त्यांचे सावकारास नोटिशीचा नमुना.

(जी)

विद्यमान सिव्हिल जज्ज साहेब कोर्ट जिल्हा वाशीम यांचे कोर्टांत.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येतें कीं व्यंकटेश शेषराव आ० पा० कारणार राधाबाई राहणार विडुळ ता० पुसद हा नादार आहे असा आज ता. १३ माहे जुलई सन १९०१ इ. रोजीं ठराव झाला आहे आणि ता० १७ माहे आगष्ट सन १९०१ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकारांना तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्यांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सागणें असेल ते व त्याजबद्दल ज्या साक्षीदारास समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या दोन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यांस नादारावर दावे नें दर्विणें असतील त्यांणीं आठ आण्याचें स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफीसरा पुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ करावी आणि ती यादी टपाला मार्फत कोर्टास पाठवावी. ह्मणजे दावा रजिस्टरांत दाखल होईल. ता० १६।७।१९०१ इ०

T. G. Paranjape.
सिव्हिल जज्ज वाशीम.

### पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

औरंगाबाद डेकन.
ता० १२।७।१९०१

कांहीं दिवसा पासून औरंगाबाद जिल्ह्यांत भिल्ल लोकांनीं मोठी पुंडाई माजवून जिकडे तिकडे लूटमार सुरू केली होती. ही स्थिती ध्यानीं आणून मौलवी मीर तहनियतअल्लीखान साहेब मोहोतमिम कोतवाली (पोलिस सुपेन्टेन्डेंट) यांनीं त्यांची खोडकी मोडण्याचा व त्यांस यथायोग्य शासन करण्याचा पक्का निश्चय केला व आपले हाताखालील लोकांसहित नुकतेंच मुकाम मौजे माकरवाडी लोकांशी सामना केला. त्या लोकांनींही जमीयतई कोतवाली (पोलिसफोर्स) बरोबर चांगलीच लढाई दिली. प्रातःकाळचे पांच वाजल्या पासून तों सायंकाळचे ६ वाजे पर्यंत उभय पक्षांत मोकाबला झाला. या चकमकींत कोतवालीचे दोन जवान बंदुकीचे गोळीनें जखमी झाले, आणि भिल्ल लोक तर बहुत्येक घायाळ होऊन पडले. हे लोक पहाडी व रानटी असून लूटमार करणें हा धंदा यांचे पूर्वजा पासून चालत आलेला आहे. वस्तींत राहण्या पेक्षां या लोकांस जंगलांत व पहाडांत राहणें फार आवडतें. जंगलांत यांना बहुतेक सोई व आश्रय मिळतो.

अलिकडेस जमीयतई कोतवालीनें यांचा सतत पाठलाग चालविला. व या लोकांस मुळींच दम खाऊं दिला नाहीं.

भिल्ल लोक आणि जमीयतई कोतवाली या मध्यें दुसरी लढाई मुक्काम मौजे जातवा येथें सकाळीं आठ वाजल्या पासून चालू झाली. पोलिस फोर्सची वांटणी व व्यवस्था सुपेन्टेन्डेंट साहेब यांनीं अशा खुबीनें केली होती कीं मोकाबला सुरू होतांच चोहोंकडून कुमकी सैन्य अफिसरासहित येऊन धडकलें. आणि चारही दिशेकडून भिल्ल लोकांवर गराडा पडला. या डाकू लोकांचे टोळीचा मुख्य नाईक गंगाराम नामक भिल्ल होता. त्यानें या लढाईत बिलकूल न डगमगतां बहुत शौर्यानें सामना केला पण पोलिसफोर्सनीं त्याचें कांहीं चालूं दिलें नाहीं. उभय पक्षाकडून सारखा गोळीबार होत होता. अखेरीस बंडखोर गंगाराम हा जमीयतई कोतवालीचे हातानें ठार मारला गेला व त्याचे टोळी पैकीं बरेच इसम ठार व घायाळ झाले. व ३३ तेहतीस इसम भिल्ल गिरफ्त करण्यांत आले. व आजमासें १००० एक हजार रुपये किमतीचा लुटीचा माल पोलिसास मिळाला. ही लढाई बराबर १० दाहा तास चालली होती. या कामांत पो० सु० जि० औरंगाबाद मौलवी मीर तहनियतअल्लीखान साहेब यांनीं मोठें शौर्य व पराक्रम दाखविले आणि मिर्जा हैदरअल्लीबेग साहेब अमीन (पोलीस इन्स्पेक्टर) तालुके औरंगाबाद हेही शेवटपर्यंत सुप्रिटेंडेंट साहेबाचे समागमें राहिले. व उत्तम रीतीनें सुप्रिटेंडेंट साहेबाचे हुकुमाची तालिम केली हा एक विलक्षण योग घडून आला कीं ज्या दिवशीं पोलिसांनें त्या डाकू भिल्ल लोकांवर जय मिळविला त्याचें दुसरें दिवशीं जनाब मि. ए. सी. ह्यान्किन सी. आय. ई. नाजिम कोतवाली– (इनस्पेक्टर जनरल आफ पोलिस) हे औरंगाबादेस येऊन दाखल झाले. सुप्रिंटेंडेंट साहेब यांनीं आपले हाताखालील लोकांनीं केलेली उत्तम प्रकारचे कारवाईचा तपशिलवार रिपोर्ट, इनामाचे तक्त्या सहित इन्स्पेक्टर जनरल सा० ब० यांचे खिदमतीस सादर केला. हा रिपोर्ट मुलाहिजा करून व सर्व हकीकत ध्यानीं आणून साहेब बहादूर बहुत संतुष्ट झाले. कांहीं पोलिस कान्स्टेबलांस हुद्देदार केले. कांहीं हुद्देदारांस बढती दिली. कित्येकांस बक्षिसें व इनामें सरफराज केलें आणि सुप्रिन्टेंडेन्ट सा० यांचे खास शिफारशीवरून मिर्जा हैदरअल्लीबेग साहेब अमीन यांची बढती आवल दर्जावर केली.

आह्मी पूर्ण खात्रीनें सांगतो कीं या जिल्ह्यांत नेमणूक झाल्यापासून भिल्ल व डाकू लोकास शासन करण्याचे कामांत सुपेन्टेन्डेंट साहेब यांनीं आतोनात श्रम घेतले व पूर्ववत शांतता कायम केली व उत्तम रीतीनें व्यवस्था केली व करित आहेत.

सुप्रिन्टेंडेन्ट सा० यांनीं अल्पकाळांतच बहुतेक डाकू आणि खोटें नाणें पाडणारे बदमाष लोकांस गिरफ्त करून सरकार दवलतमदार (निजाम सरकार) व सरकार अजमतमदार (इंग्रज सरकार) चे इलाख्यांतून यथायोग्य शिक्षा देवविल्या परंतु फार अफसोसाची गोष्ट आहे कीं, या कामगिरी बद्दल सुपिन्टेंडेन्ट सा० यांस कांहींच मोबदला मिळाला नाहीं व कोणी त्यांची कदर केली नाहीं. अस्तू आतां तरी जनाब इन्स्पेक्टर जनरल सा० यांनीं ही उत्तम कामगिरी ध्यानीं आणून सुप्रिन्टेंडेन्ट सा० विषयीं आपली सरकारांत शिफारस करावी.

(एक बातमीदार)

### THE RANADE MEMORIAL

(Communicated)

The proceeding of the public meeting held at Bombay under the Presidency of H. E. the Governor to discuss the advisability of raising a fitting Memorial to commemorate the memory of the late Mr. Justice Ranade, must have been read by the public with enthusiastic interest. Rao Bahadur Ranade was well known all over the country and no words are needed to impress upon the minds of the people the necessity of perpetuating his name in the Province. His wonderful intellect, his vast & varied learning, his lofty, sense of duty, his unwearied industry,

his ceaseless activity in various fields, his impatience and forbearance, his simplicity of heart and the nobility of soul, his university of faith and the moral fervour of his utterances, have all endeared and distinguished him as a public man. The Bombay people have done their duty and they must be thanked for taking a lead in such an important matter. It remains now to be seen how other provinces and especially, our Berars, proceed in the matter. I propose that a public meeting should be held at Amraoti on the lines of the Bombay Meeting and subsciption list opened with a view to collect money for this Memorial. In spite of the increasing demands on the public purse, I feel sure that none will grudge to pay as much as he can for such a deserving work. I think that a scholarship or a Prize called "the Ranade Scholarship" or "the Ranade Prize" be awarded to a successful student of the High School or College, who has attained proficiency in Mechanical science or chemistry. I hope that the public will kindly and heartily response to this call and do some thing to immortalize the worthy memory of this grand man of India.

Elichpur G. N. S.
17—7—01.

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक श्रावण शुद्ध ७ शके १८२३

# सार्वजनिक आरोग्य.

सार्वजनिक आरोग्या विषयीं १९०० सालची वार्षिक हकीकत नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. त्यांतील मुख्य विषय ह्मटला ह्मणजे गेल्या दुष्काळाच्या भयंकर परिणामाचें प्रदर्शन होय. १८९९ च्या उत्तरार्धांत जो भयंकर दुष्काळ प्रसृत झाला त्याचें जाज्वल्य स्वरूप १९०० सालीं विशेष उग्रतर झालें. दुष्काळाचा परिणाम जननमरणा संबंधानें मोठा भयंकर आहे. जननाची क्रिया अगदींच कमी झाली; आणि मरणाची क्रिया शेवटच्यां परम वधीला पोंचली. या दोन्ही क्रिया एकत्र झाल्या मुळें एकंदर लोकसंख्या पुष्कळच कमी झाली. नेहमींचा जननक्रियेचा वेग इतका कमी झाला कीं गेल्या २० वर्षांच्या काळांत १९०० साला इतकीं कमी माणसें कोण याच एका वर्षांत जन्मलीं नाहींत. जननाची संख्या कमी होण्याला मुख्य कारणें तीन झालीं. लोकांना दुष्काळा मुळें खाण्याला पुरेसें मिळालें नाहीं आणि जें अन्न मिळालें तेंहि चांगल्या प्रकारचें मिळालें नाहीं. या मुळें लोकांची जीवनकळाच कमजोर झाली व अर्थात् त्यांचें प्रजोत्पादनाचें वीर्य अस्तंगत झालें. दुसरें कारण असें कीं पुष्कळशा बायका घरदार सोडून एकेकट्या दुष्काळाच्या कामावर निघून गेल्या आणि त्या मुळें त्यांच्या गर्भधारणाचा संभवच कमी झाला. तिसरें कारण ह्मटलें ह्मणजे सर्व वर्षभर दुःखणीं व आजार यांचें प्रस्थ मोठें माजलें होतें. १९०० सालच्या चांगल्या पकिपाण्यानें लोक पूर्ववत संसारसुखाला लागले तर असा अंदाजा आहे कीं याचा प्रादुर्भाव येत्या आगष्ठ महिन्याच्या जननाच्या संख्येवरून दिसून येईल. दुष्काळाच्या कामावरील स्त्रियांची गर्भधारणाची शक्ति फार कमी होत असेंही लक्षांत आलेलें आहे पण या संबंधांत अजून पाहिजे तितका तपास झालेला नाहीं.

आमच्या प्रांताच्या लोकसंख्येवर दुष्काळाची सोय दुहेरी तुटली होती. पुढील प्रजेची वाढ कमी झाली तर त्याचें मोठेंसें दुःख नाहीं. सद्यःस्थितीच्या आपत्कालांत प्रजावृद्धि मंदावली आहे हें तरी एक दुःखांत सुखच होय. पण विद्यमान लोकसंख्येवर मरणाचा जबरदस्त घाला पडतो तेव्हां मात्र आमचें दुर्भाग्य मोठेंच होय. जनन मरणाची घडामोड एकसारखी चालूच आहे पण सन १९०० सालीं एक सहस्र लोकसंख्ये मागें ८९.७ मृत्यु असें प्रमाण पडलें. एकंदर लोक २,३६,०२२ इतके मरण पावले. हें प्रमाण मागलीच्या मोठ्या प्रमाणाच्या देखील दुपटीनें आहे. मरणाची संख्या इतकी वाढली याला मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे अती भयंकर अशा दुष्काळा मुळें लोक इतके निर्जीव, दुबळे व परस्वाधीन झाले कीं साधारण आजारा पुढें देखील त्यांस टिकाव धरितां आला नाहीं. लहानसहान आजारानें देखील ते मृत्युंगत झाले. १८९९ सालीं पुष्कळच माणसें जन्मलीं होतीं आणि त्यांचें संगोपन यथास्थित न झाल्यामुळें लहान अपत्यें फार मरण पावलीं. पटकीचा रोग गुदस्ता फार जोरावर होता आणि त्या रोगानें जितके बळी घेतले तितके दुसऱ्या रोगाला क्वचितच मिळाले असतील.

वयोमानानें मरणाच्या क्रियेची मीमांसा केली तर असें आढळून येतें कीं पुष्कळशीं माणसें एक वर्षाचीं होण्या पूर्वींच मरतात. १९०० सालीं अशीं मुलें ४३७५२ मरण पावलीं ह्मणजे १००० मुलें निपजलीं तर त्यापैकीं जवळजवळ निम्मीं मुलें मृत्युमुखीं पडतात. दुसरा असाही चमत्कार दृष्टीस पडतो कीं मुला पेक्षां मुलीं जगण्याला अधीक चिवट असतात. १ ले वर्षा पासून ५ वर्षांचीं मुलें होई पर्यंत त्यांस मरणाची बाधा फार सत्वर जडते. १ ल्या वर्षांतून जीं मुलें निभतात त्या पैकीं बरींच मुलें ५ वर्षांचीं होई पर्यंत खपतात. बाकीं मरणाचें मान कमी कमी होत जातें. १९०० सालीं ५४१४० माणसें पांच वर्षांचीं होण्या पूर्वींच मृत झालीं. एकंदर २,३६,०२२ माणसें मरण पावलीं त्यापैकीं १,२७,८९९ माणसें पांचवें वर्ष लागण्या पूर्वींच मृत झालीं. साधारणपणें १०० मुली जन्मल्या तर १०६ मुलगे जन्मतात. आणि मरणाचें प्रमाणही नीटपणें तपासतां मुला पेक्षां मुली वयाच्या १९ वर्षां पर्यंत कमी मरतात. पण त्या पुढें १५ वे वर्षा पासून ३० वर्षा पर्यंत पुरुषा पेक्षां स्त्रिया अधीक मरतात आणि याला कारण त्यांच्या गर्भारपणाची पुनरावृत्ति होय. एकदां वयाची तिशी उलटली कीं पुरुष स्त्रिया पेक्षां अधीक मरूं लागतात आणि ४० पासून ५० वर्षां पर्यंत स्त्रियांच्या दुपटीनें पुरुष मरतात. वयाच्या तिसावे वर्षा पासून ५० वे वर्षा पर्यंतचा काल स्त्रियांला चांगला लाभतो, आणि त्या मानानें पुरुष अगदीं जलदी थकतात व अधीक प्रमाणानें मृत्युमुखीं पडतात असा अनुभव आहे.

# गुणानुवाद

( रा. रा. धोंडजी कोंडजी पेनशनर पोलिस इनस्पेक्टर यांजविषयीं )

आह्मांस कळविण्यास मोठा आनंद वाटतो कीं इनस्पेक्टर जनरल लेफ्टेनंट कर्नल वारन हेस्तिंगस यांनीं रा. रा. धोंडजी कोंडजी पेनशनर इनस्पेक्टर, आकोला यांची गेल्या पोलिस रिपोर्टांत फार वाहवा केली आहे. ते लिहितात कीं:- धोंडजी कोंडजी हे रिपोर्टाच्या वर्षीं फक्त रजेवर होते, त्यांनीं आतां पेनशन घेतली आहे. त्यांच्या चाकरीला तीस वर्षें झालीं आणि ही चाकरी त्यांनीं फार उत्कृष्ठ वर्णनीय रीतीनें केली. कानस्टेबल दर्जा पासून इनस्पेक्टरीच्या १ ले वर्गा पर्यंत हे हुद्देदारीला आपल्या पराक्रमानें चढले. यांनीं आपल्या कारकीर्दींत चांगल्या कामाबद्दल पुष्कळशा शिफारशी संपादल्या व एकही स्थळ दोषनिर्देशाला राहूं दिलें नाहीं. आणि या रिपोर्टाच्या संदर्भानें मी यांची कारकीर्द अलिशान नामदार रेसिडेंट साहेबांच्या नजरेला मुद्दाम आणीत आहे." हा उत्कृष्ट शेरा पाहून रा. रा. धोंडजी कोंडजी यांचें अभिनंदन केल्या शिवाय आह्मास राहवत नाहीं. हा शेरा नामदार रेसिडेंट यांस अगदीं पसंत पडला आणि त्यांनींहि यांचे गुणानुवाद करितांना ह्मटलें आहे कीं पुष्कळ वर्षें व बहादरीनें इनस्पेक्टर धोंडजी यांनीं चाकरी करून पेनशन घेतलें पण ते घरीं बसल्यामुळें पोलिस खात्याचा मोठी नुकसानी झाली याविषयीं आह्मांस दिलगिरी वाटते.

राजश्री धोंडजी हे मूळचे सामान्य माणूस होत. लिहिणें वाचणेंही अगदीं बेताबातानेंच होतें. बेडर जातींत यांचा जन्म असल्यामुळें फारसें पुढें येण्यालाहि मार्ग नव्हता. प्रथम हे पोलिस शिपाई १८७० सालीं झाले. त्यांच्या अंगीं मनधरणी करण्याचा गुण मोठा आहे. परिश्रम करण्याला हे मोठे कष्टे आहेत. स्वभावानें गोड असून चारचौघांच्या मनोदयानें राहून आपला बोज ठेवण्याची हौस यांस मोठी आहे. स्मरण शक्तीच अगदीं पक्के आहेत. आपल्या गुणांनीं हे मोठ्या हुद्देदारीला वाढले. आपला दरारा ठेवून हे काम करीत. काय यानें हाणण्या सारखें कांहींच काम होत नाहीं अशी यांची पक्की समजूत आहे. गोडीगुलाबीनें व रहम दिलीनें कार्यभाग चांगला निभतो असें यांनीं आपल्या कारकिर्दींत सिद्ध करून दिलें. हल्लीं हे ईश्वरभजनाला लागले आहेत आणि आह्मी अशी आशा करितों कीं ते आपल्या आप्त मंडळींचें अभीष्ट चिंतण्यांत, यथाशक्ति लोकसेवा करण्यांत, व ईश्वराची आराधना करण्यांत विश्रांतीचा काल सुखानें चिरकाल घालवितील.

# खरें बोलण्या संबंधानें कांहीं चोटक विचार.

" सत्य बोलावें, सत्य बोलावें असें सर्व धर्म सांगतात, सर्व लोक बोलतात; गुरु शिष्यांस शिकवितात, आईबापें मुलांस शिकवितात, किंबहुना हरएक मनुष्य दुसऱ्याला सांगतो. पण येथून तेथपर्यंत सगळे लोक कमजास्त खोटें बोलतात असें पुष्कळ निरीक्षणांतीं आमचे लक्षांत आल्यावरून आह्मी एका विद्वान्, शहाण्या, अनुभवी आणि चतुर गृहस्थास प्रश्न केला कीं, " रावसाहेब "खरें बोला" असा उपदेश मोठमोठेहि करितात आणि ते स्वतः देखील नियमानें खरें बोलतात असें नाहीं; मग हें थोतांड आहे तरी काय?" रावसाहेबांनीं थोडक्यांत उत्तर दिलें. " या उपदेशाचा हेतु ज्यानें त्यानें हुषार असावें इतकाच कायतो आहे " त्यांनीं हें उत्तर इंग्रजींत नाना फडनविसां प्रमाणें अगदीं संक्षिप्त रीतीनें दिलें. तितक्यानें कांहीं आमचें समाधान झालें नाहीं. ह्मणून थोडे विस्तारानें सांगावें अशी आह्मी त्यांस विनंती केली. तेव्हां रावसाहेब ह्मणाले " अहो याचा अर्थ असा कीं, ज्याला खोटें बोलणें झेपेल त्याने खोटें बोलावें. व ज्याला तें झेपणार नाहीं त्यानें खरें बोलावें. या पेक्षां याचा ज्यास्त अर्थ नाहीं," आमची प्रकृति मूळची पापभीरु असल्या मुळें व खरें बोलण्यांत कांहीं विलक्षण पुण्य आहे असा आमच्या मनाचा ग्रह असल्यामुळें रावसाहेबांच्या व्याख्यानानें आह्मी चकित होऊन गेलों व आह्मांस असें वाटूं लागलें कीं खरें खोटें बोलणें हें केवळ आपणाला झेपणें न झेपणें इतक्यां पुरतेंच आहे काय? रावसाहेब जरी मोठे विद्वान आणि शहाणे होते तरी त्यांचें हें मत आह्मांला बिलकूल रुचलें नाहीं. तथापि मोठमोठ्या लोकांनीं आचरणें पहातां तीं रावसाहेबांच्या मतालाच अनुसरून दिसतात. ह्मणजे खोटें बोलून ज्याला त्याची उत्तम संपादणी करितां येईल व दुसऱ्यास तें अगदीं खऱ्या प्रमाणें भासवितां येईल त्यानें खुशाल खोटें बोलावें. खोटें बोलणें ज्याच्या अंगाशीं आलें तो काय तो खोटा. ज्यानें त्याची उडवाउडव करून प्रतिपक्ष्यास निरुत्तर केलें तो खरा. मग वस्तुतः तो खोटा असला तरी हरकत नाहीं, खोटें बोलण्याच्या मागें वस्तुतः ईश्वर-भीति असावयाला पाहिजे, परंतु कोणत्याही कारणानें ह्मणा ती जर नष्ट झालेली असली, तर खरें-खोटें बोलणें हें झेपण्याच्याच पायांवर अवलंबून राहणार. व तशींच हल्लीं स्थिति झाली आहे.

हल्लीं कायद्यानें खोटें फार माजविलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हें विधान सर्वांस पटेल कीं नाहीं कोण जाणे. परंतु त्यात निरंतर वापरणारे जे लोक आहेत त्यांस तरी बहुत करून ते पटेल अशी उमेद वाटते. हरएक गोष्टीस प्रत्यक्ष पुराव्याची आवश्यकता कायद्यानें फारच गाजवून दिली आहे. एखाद्या मनुष्यास दुसऱ्यानें एकांतीं मारिलें व मारणारावर त्यास फिर्याद करावयाची झाली, तर साक्षीदारा वांचून ती फिर्याद

संभवेत कशी! नुसती फिर्याद न्यायाधीश घेणारही नाहीं. मग ती खरी ठरून गुन्हेगारास शिक्षा होणें दूरच राहिलें. दुसरी बाब देण्या घेण्याच्या संबंधाची होय. एखादा देण्याघेण्याचा व्यवहार, देणारा व घेणारा, यांच्या मध्येंच होतो. त्यावेळीं तिसरा कोणी नसतो. पुढें वाद उत्पन्न झाल्यास तिसरा ह्मणजे साक्षीदार उत्पन्न करावा लागतो. अशा रीतीनें फौजदारी व दिवाणी कोर्टांत खोट्याची रेलचेल होऊन गेली आहे. ती इतकी कीं साधी भोळी व खरी माणसें कोर्टापुढें गेलीं तर खोट्याच्या अभ्यासांत जे पटाईत झालेले असतात ते त्यांत त्यांना हां हां ह्मणतां खोटे बनावून टाकितात. व असा खोटा बनलेला मनुष्य कपाळाला हात लावून न्यायाच्या कोर्टाची तारीफ करीत कोर्टांतून बाहेर पडतो.

आह्मी एका बुद्धिमान्, कायद्यांत निष्णांत आणि हुषार वकिलाला एकदां विचारिलें, "काय हो, खरें बोलणारा कोणी मनुष्य कोर्टापुढें कधींच फसणार नाहीं असें आपण खात्रीनें सांगाल काय?" त्यांनीं इंग्रजींत उत्तर दिलें Unless he is a fool ह्मणजे तो मूर्ख नसेल तर फसणार नाहीं. मूर्ख असेल तर फसेल. आतां या मूर्ख शब्दाचा अर्थ काय? ज्याला डावपेंच माहीत नाहींत तो. आतां जो साधाभोळा मनुष्य आहे व ज्याची सगळी भिस्त खरें बोलण्यावर आहे, त्याला अर्थात् डावपेंच माहीत असण्याचा संभव नाहीं. व त्याला डावपेंच यावयाचेही नाहींत. ह्मणजे वरील वकिलांच्या ह्मणण्या प्रमाणें तो कोर्टांत फसणार, लबाड ठरणार, आणि कदाचित् शिक्षेस पात्र होणार. आपल्या न्यायांच्या कोर्टाची ही स्थिति बरी काय?

एके प्रसंगीं आह्माला स्वतःला साक्ष देण्यासाठीं कोर्टांत जायाचें होतें. तो खटला फौजदारी असून मोठा भारी होता. उभय पक्षांकडील सर्व खऱ्या हकीकतीची आह्मांस पूर्ण माहिती होती. आमची साक्ष मुख्यत्वें सरकार तर्फे होती. तथापि उभय पक्षाचे वकील आह्मास बेजार करतील अशी आमची खात्री होती व आमचा निश्चय तर खरें बोलण्याचा होता. आह्मी मोठ्या विचारांत पडलों. आरोपीकडील एक वकील जे मोठे विद्वान् होते व आमचे मित्रही होते त्यांस आह्मी सहज विचारिलें "काय हो कोर्टांत खरें बोलावें कीं खोटें? खरें बोलावें तर अनेक पंचाईती उत्पन्न होणार, तेव्हां काय सांगतां तें बोला." त्यांनीं जें उत्तर दिलें तें फार गमतीचें होतें ह्मणून ही गोष्ट येथें सांगण्याची. त्यांनीं आह्मांस विचारिलें "खरें बोलावें ह्मणून जें धर्मांत सांगितलेलें आहे तें कशा करितां? त्या पासून कांहीं प्राप्ति आहे ह्मणून ना? खरें बोलणारास स्वर्गप्राप्ति होतें ह्मणून ना? मिळून काय झालें? कांहीं तरी मोठा फायदा आहे ह्मणून खरें बोलायाचें ह्मणजे खरें बोलणें हें फायद्याला सोडून नाहीं." यांत त्यांनीं असें सुचविलें कीं ज्यापासून फायदा असेल तें बोलणें बोलावें. अर्थात् खोटें बोलणें जर फायदेशीर असेल तर खोटें बोलावें. आणि एकंदरीनें खरें किंवा खोटें हें फायद्याकडे नजर देऊन बोलावें.

हें मित्रांचें भाषण ऐकून आह्मी थक्कच झालों, कारण या मित्रांच्या बोलण्यांत खरें बोलण्याची कांहीं विशेष प्रतिष्ठा आहे असें निष्पन्न झालें नाहीं, उलट फायदा होत असल्यास खोटें खुशाल बोलावें असें मात्र निष्पन्न झालें. स्वर्ग प्राप्तीचा फायदा कोणीकडे, आणि ऐहिक यःकश्चित् लाभ कोणीकडे? त्या लाभाचा या लाभाशीं मेळ घालून ज्या पासून फायदा असेल तें बोलणें बोलावें, असें अनुमान काढणें भयंकर आहे. खरें बोलण्यांत मुख्य विचार असा घेतला पाहिजे कीं "ही ईश्वराची आज्ञा आहे; ती आह्मांला पाळायाची. नफानुकसानीचा विचार आह्मांला पाहण्याची जरूर नाहीं.

# The Berar Samachar

MONDAY JULY
22 1901

Unwisdom is more cruel than cruelty itself when it forces an excellent gentleman to retire from the public service. The Local Government showed little appreciation when they ordered the Educational Inspector to do the work of two Deputy Inspectors. The work was very heavy and drove Mr. Vishnu Moreshwar Mahajani to go on a long furlough. Rao Bahadur S. V. Patwardhan had the signal honor of initiating the abolition of the Educational Inspectorship. Mr. Mahajani ceased to be our Inspector of the province and became two Deputy Inspectors to do the simultaneous work of two Officers. In course of time Rao Bahadur Patwardhan had his exit from the Berar—world—and the Local Government was again unwise, cruel and despotic in not offering the Directorship to Mr. Mahajani. The aboliti on of the Inspectorship necessitated the recognition of his just and proper claims to the directorship. It was his claim to succeed to that post. He was prior in high educational attainments. His was the superiority in administrative capacity. His was the unrivalled experience in leghth of time and in the good and excellent work of previous years. But such a gentleman was superseded to bring in Professor Candy—who had, to our plain mind, no claims whatever upon a high post in Berar. This office was specially reserved for the Natives and the late Rao Bahadur Dandekar and Jatar have established this native pre-eminence in bettering the prospects of the educational department. An act of injustice was done to Mr. Mahajani and the people of of Berar expressed their extreme regret at such an untoward step of the Government.

Now hope is doomed to smother for ever. We had a ray of hope that Mr. Mahajani will be given the Directorship after Mr. Candy. But human ambition is often rewarded in its failures. The times of appointment, make us see the real magnitude of the evil done to the department, & the cause of the public service suffers a good deal. The real greatness of Mr. Mahajani rises in our estimation when he quietly resolves to retire with good grace from the public service. To-day he will appear before the invalidating Sanitary Board to be held at Akola, and if he satisfies the proper tests he will bid farewell to the educational department.

We are sorry to observe such a close to such an excellent career. Mr. Mahajani would have nobly justified his selection to the higher post. With his forced retirement we feel the greatest insult that the people of Berar suffer at the hands of the Government. We are glad, however, that we have the rare fortune of his otherwise public life. He intends to live in our midst. His sound education, his long experience and his towering energies will open to us new fields of his industry, and useful public career. In Berar he wields a high influence and has won the highest reverence for his simplicity of character and his stern morality of character and his general tenor of benevolence. We hope that we shall have many opportunities to refer to his growing public usefulness; and to accentuate the progress of our social and political elevation, which is the constant object of his advocacy and his life—long policy.

It is not good that the public service should deteriorate in the attraction it presents to those who seek it. We learn that there is a proposal to make the service in the lower grades in the educational department a non—pensionable one. The sword is hanging over those primary schools the expenditure of which is defrayed from the funds of the District Boards. If the right to the pension be once taken away from the primary schools, we do not think that good, honest and laborious teachers will ever desire to hold the school—master's post without the future chances of getting any pension after a long period of service. The inferior sort of stuff will be introduced in lieu of the present staff of teachers. The vested interest of a pension that is within the grasp of every honest teacher is what makes his position enviable and attractive. We learn that the sword of economy threatens further to cut down the rights of pension that the school—masters in the Anglo—vernacular Middle schools have been in enjoyment ever since the establishment of the educational department. We fail to see the justice of these iniquitous proposals. If the principle holds water in the case of teachers we cannot see how it should fail to affect all branches of the administration high or low. The grades in the service do not change the aspect of the question of pension. If economy requires such a drastic measure we think that the higher grades of the public service show a wide field for a full measure of the present policy of the financial economy. Let us hope that the question of pension be not hastily decided on imperfect and doubtful grounds; and if it be once decided against the current policy we hope that justice will be dealt with in an even—handed manner to all the branches of the public service.

## वऱ्हाड

हवामान— या सप्तकांत पावसानें सर्वत्र आनंदी आनंद करून सोडला. इतकी, नेमकी, योग्य वेळीं व अगदीं बेताची वृष्टी होत आहे कीं असाच क्रम चालूं राहिल्यास उत्कृष्ट पिकें यंदा येतील. ऋतुमान पाहतां सार्वजनिक आरोग्य फार समाधानकारक आहे.

मृताची स्मृती—कैलासवासी प्रल्हाद नारायण जोग हे वऱ्हाडांतील नामांकित वकील होते. त्यांच्या मरणाची वार्ता कळतांच हायकोर्टाचे जज्ज मि. ब्याटन यांनीं मृता संबंधी दुःखोद्गार काढून उमरावतीचें कोर्ट एक दिवस बंद ठेविलें होतें. ही सन्मानबुद्धि पाहून दुःखांतही समाधान वाटेल. कै० जोग यांनीं आपल्या मृत्युपत्रांत एक उत्कृष्ट स्मारक करून ठेविलें आहे तें कालवशात् रंगारूपाला येऊन त्यांची आठवण चिरकाल राहील!

मे. इलियट साहेब कमिशनर यांची स्वारी चिखलदऱ्या वरून उमरावतीला आली आहे.

'प्रमोदसिंधु' कर्ते एक लोकवार्ता ह्मणून प्रसिद्ध करितात कीं कर्नल वारन हेस्टिंगस यांस जुडिशिअल कमिशनरची जागा मिळून मि. ब्याटन हे पूर्वजागीं सेशन जज्ज होतील,

इलिचपूर छावणीच्या मुनसिपालिटीनें घरपट्टी भाड्याच्या उत्पन्नावर शेंकडा ९ या प्रमाणावर बसविली आहे, आणि तसेंच धंदापट्टी लोकांच्या उत्पन्नावर शेकडा २ या मानानें बसविली आहे.

क्याप्टन कोलंब यांनीं उमरावतीच्या डिपुटी कमिशनरीचा चार्ज गेल्या शनिवारीं घेतला.

मि० हैदरअल्ली एक्स्ट्रा असि. कमिशनर यांनीं पुढील महिन्याच्या १ ले तारखे पासून एक महिन्याची रजा घेतली आहे,

आणि त्यांच्या रजेंत वाशिमास रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे, एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस यवतमाळाहून बदलून रा. रा. रंगनाथ विष्णु डोकस यांस यवतमाळच्या कोर्टावर नेमिलें.

गेल्या मे महिन्यांत या प्रांतीं ३२३२ माणसें जन्मलीं व ९१९७ मृत झालीं.

### नोटीस

मेहेरबान शेखदुला वल्लद महमद हयाद साहू मुकाम राहणार रेल तालुके अकोट पोस्ट दहीहांडा यासः--

खालीं सही करणार याज कडून कळविण्यांत येते कीं तुमचे तारीख २०।६।१९०१ ची नोटीस तारीख २४।६।०१ रोजी आल्यावरून कळले कीं सर्वे नंबर २६ चे कहतखेड येथील शेत खरेदी घतले आहे तुह्मास रुपये देणे असल्यास व्याजासह चुकते रुपये ही नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसाचे आंत आमचे येथें आणून देऊन आमची रसीद घेऊन जावी. आह्मी तुमचे येथें रुपये मागण्यास कधींच येणार नाहीं. ज्या तारखे पावेतों आमचे रुपये राहतील तों पावेतों तुह्मास व्याज द्यावे लागेल वरील मुदतींत तुमचे कडून रुपये न आल्यास आह्मास वाटेल तेव्हां आह्मी दावा करून नोटिसीचे खर्च सुद्धां रकम तुमचेजवळून भरून घेऊ. कळावे तारीख १९ माहे जुलाई सन १९०१ इसवी.

सही
नारायण बाबूराव ह्मैसांगकर
देशमुख.

## वर्तमानसार

गांवढ्यांतील लोकांचा भोळेपणा —दुरंगा-कडे डोंगराळ प्रदेशांत तेथील गांवढेकरी लोकांस असें सांगण्यांत आलें होतें कीं, जर कोणी मेला तर लागलीच सरकाराला वर्दी द्यावी. ही वर्दी दिल्यावर थोड्याच दिवसांनीं एक हत्ती मेला तेव्हां त्या लोकांस वाटलें कीं, हें आतां सरकारास कळविलें पाहिजे. लागलीच त्यांनीं पोलीस ठाण्यावर जाऊन वर्दी दिली. तेव्हां एक पोलीस तेथें आला व त्यानें त्या हत्तीची लांबी हात घालून मोजिली. तो ह्मणाला खरोखरीच हा मोठाच प्राणी मेला आहे, दहा हात लांब आहे! हें सरकारास कळविलें पाहिजे. पुढें त्या गांवढेकऱ्यांनीं विचारिलें कीं, बरें आतां याबद्दल काय द्यावयाचें तेव्हां त्यानें सांगितलें कीं, 'अः दहा रुपये द्यावे लागतील.'

नागपुरास शिपाई लोक तारकीटवर नेम मारीत असतां एका शिपायाच्या ८ गोळ्या पैकीं एकही गोळी बरोबर लागली नाहीं. या वरून त्याचा हवालदार त्याच्यावर जरा रागावला. त्या बरोबर तो शिपाई ह्मणाला कीं आतां मी राहिलेल्या दोन गोळ्यांचा चांगला उपयोग करणार आहे. असें ह्मणून त्यानें त्या हवालदारास गोळी घालून ठार मारलें. व आपणही मरत होता पण गोळी नीट न लागल्यामुळें नुसता जखमी झाला. तो हल्लीं दवाखान्यांत आहे ह्मणतात.

मुंबईतील मेडिकल कालेजच्या भिंतीवर कांहीं बीभत्स वाक्यें लिहिल्यावरून तीन विद्यार्थ्यांस शाळेंतून हाकलून लावलें. या वरून त्या शाळेंतील सुमारें ४०० विद्यार्थ्यांनीं शाळेस येण्याचें नाकारलें व ते ह्मणाले कीं, त्या मुलांचें बोलणें ऐकून मग त्यांस शिक्षा करावयाची होती. हा सर्व प्रकार ता. ११ रोजीं झाला. पुढें चौकशी करण्याचें ठरल्यावर ते विद्यार्थी आपापल्या कामावर आले. अ.

पोटाची आग— शामनाथ ह्या नावाचा एक मुलगा भुकेनें अगदीं व्याकूळ झाला असतां दुसरा एक मुलगा बरोबर भाकरीचे गाठोडें घेऊन शेतामध्यें जात असतां त्याच्या दृष्टीस पडला; तेव्हां त्यानें त्याजजवळ भाकरी मागितली; पण ती देण्याचे त्या दुसऱ्या मुलानें नाकारिलें. अखेर जठराग्नीचा ताप सहन न होऊन शामनाथानें त्या भाकरींवाल्या मुलास धोंडा मारला. तो वर्मीं लागला व कांहीं वेळानें तो मुलगा मेला त्यास रीतीप्रमाणें शिक्षा झाली.

जपानांतील पत्रकर्ते मोठे दक्ष असतात. तुरुंगांत जाण्यासाठीं ह्मणून त्या भाडोत्री एडिटर निराळाच असतो. आमच्याकडेही ही युक्ति अंमलांत आणल्यास ठीक पडेल विशेषतः महाराष्ट्रांतील कित्येक पत्रांनां ह्या युक्तीचा फार उपयोग होईल. एखाद्याला खूप शिव्या देत सुटावें, व तुरुंगांची पाळी आलीच तर आहेच नामधारी एडिटर तयार.

प्रे० क्रूगर—बांधवहो, जागे व्हा. चुकूनही आत्मसमर्पण करूं नका. इंग्रज लोकांना आतां रशियन लोकांबरोबर युद्ध करण्यांत अडकून पडावयाचें आहे. प्लेग हा इंग्रज लोकांना मारित आहे ह्मणून ते लोक दक्षिण आफ्रिका सोडून विलायतेस पळून जात आहेत.

सोन्याचें गिल्ट केलेल्या आरशाच्या फ्रेमी खराब झाल्या तर बोर दारूनें त्या घासल्या असतां स्वच्छ होतात.

नेपाळचे नुकतेच झालेले दिवाण दीप समशेरजंग बहाद्दर यांस एकाएकीं कैद करून त्यांच्या जागीं त्या संस्थानचे कमांडर इन चीफ महाराज चंद्र समशेर बहादर यांची नेमणूक केली आहे. हे नव आमात्य इंग्रज सरकारचे दोस्त आहेत, हें सांगणें नकोच.

अग्नीवरून चालण्याचा चमत्कार— अमृतसर येथें एक सयद अकबरशाहा नांवाच्या मनुष्यानें वरील चमत्कार पुष्कळ लोकांसमक्ष करून दाखविला. हा चमत्कार अमुक एका विवक्षित स्थळीं व काळीं होणार आहे अशा बद्दल पूर्वीच जाहिराती वाटल्या होत्या. ज्या कोणास ईश्वर प्रसन्न असेल, किंवा ज्यास असे चमत्कार करितां येत असतील त्यांनीं आपल्या अंगचे गुण दाखविण्याची ही संधी दवडूं नये अशी मुद्दाम विनंती केली होती. खर्चवेच भागण्यासाठीं टिकीटें लगवलीं होतीं. हाच मनुष्य पाण्यावरून चालण्याचा चमत्कार दाखविणार आहे असें ह्मणतात. हे सर्व असंभाव्य चमत्कार ह्मणजे कांहीं तरी उत्तम साधलेले ढोंग सोंग असावें.

१४ फूट लांबीचा कृष्णसर्प—सिंगापूर येथें १४ फूट लांब कृष्णसर्प सांपडला आहे. त्याला पिंजऱ्यांत घालून विलायतेस पाठविणार आहेत. अलौकिक वस्तूंचें विलायतच माहेर घर!

पोलिसचें साम्राज्य—असून न्यायाची मात्रा त्यांजवर चालत नाहीं असें पाहून तेथले बदमाष लोक जोरावर आले असून त्यांनीं तेथल्या लोकांच्या सुरेख बायका भर दिवसा पळवून नेण्याचे पराक्रम आतां नेटानें बिनधोक चालूं केल्याची बातमी आली आहे.

३००० रुपयांचें बक्षीस— खोडसाळपणा केल्याशिवाय आपला धंदा केवळ सत्यानें चालविलेला एखादा तरी धंदेवाला सांपडतो कीं काय हें पाहण्यासाठीं न्यू यॉर्क येथील मिस ईव्हिंग नामक श्रीमान बाईनें ३००० रुपयांचें इनाम देण्यासाठीं तेथील एका ब्यांकेंत मांडलें आहेत. इमानाच्या परीक्षेसाठीं पांच जज्जांची योजना केली असून त्यांचे समक्ष अर्जदारांच्या धंद्यांचे कागदपत्र तपासून पहाणार आणि त्यांत कसास उतरल्यास हें बक्षीस त्याला देणार!

## भारत भाग्योदय अथवा सोन्याचा दिवस

नंबर ९

दिल्लीच्या बादशहानें शिवाजीचे पारिपत्य करण्याचा विचार पूर्णपणें केला नसल्यामुळेंच शिवाजीची भरभराट वाढत चालली होती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु दिल्लीच्या बादशहाच्या मनांत त्याचें पारिपत्य करण्याचा विचारही लौकर आला, व त्या प्रमाणें इ. स. १६६२ सालीं त्यानें षाहिस्तेखान सरदाराला "अमीर उल् उमराव" हा बहुमानाचा किताब देऊन शिवाजीवर पाठविलें. षाहिस्तेखान दक्षिणेंत आला व त्यानें बराच प्रांत सरही केला. बाकी राहिलेल्या मराठ्यांच्या भागावर चांगला वरवंटा फिरविण्याची संधी तो पहात होता. एकट्या यानें मराठ्यांस पादाक्रांत केलें जाणार नाहीं, ह्मणून दिल्लीपतीनें मारवाडचा प्रतापी राणा जसवंतसिंग यांसही षाहिस्तेखानाच्या मदतीस जाण्यास फर्मावलें होतें. रजपूत आणि मोंगल सरदारा बरोबर टिकाव धरण्याचें सामर्थ्य यावेळीं शिवाजी जवळ खरोखरच नव्हतें. दोघांचीं सैन्यें पुण्याच्या भोंवतींच उतरलीं होतीं. दादोजी कोंडदेवानें शिवाजीस ज्या वाड्यांत राजनीति शिकविली होती त्याच घरांत षाहिस्तेखान आपल्या निवडक सल्लामसलतगारानिशी येऊन उतरला होता. शिवाजीचा कावेबाजपणा षाहिस्तेखानास पूर्णपणें माहित झाल्यामुळें त्यानें असें जाहीर केलें होतें कीं, आपल्या परवानगी शिवाय कोणासही पुण्यांत येऊं देऊं नये. मराठ्यांच्या सैन्याचा सिंहगड किल्या नजीक तळ पडला होता. लढाईच्या कामांत पूर्णपणें कसलेल्या लोकांबरोबर सामना देणें फारच धोक्याचें आहे असें शिवाजीस व त्याच्या सरदारास वाटत होतें.

एके दिवशीं षाहिस्तेखान, चांदखान, वगैरे सरदार शिवाजीचें पारिपत्य कोणत्या युक्तीनें करावें ह्मणून विचार करीत बसले असतां, अनवरखान ह्मणाला:—

"पाला ज्या प्रमाणें वायूच्या झटक्यानें उडून जातो त्याप्रमाणें मराठ्यांचें सैन्य भुर्रदिशीं उडून जाईल."

चांदखान— "छट, यापेक्षां मराठ्यांचे अंगीं जास्त पाणी आहे असें मी खात्रीनें सांगतों."

षाहिस्तेखान— "खरें पण तें कां असावें बरें?

पुढें चालू.

---

नोटीस

रा० रा० पूर्णाजी वल्लद कुकाजी पाटील रहाणार पाथरडी हल्लीं मुक्काम खामगांव यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें असें कळवितों कीं, आपण माझ्या दुकानावर पुष्कळ वर्षें कुलमुखत्यार होता. पण आतां आह्मांस तुमची जरूर नाहीं. सबब आह्मी ता० १६ जुलई पासून तुह्मांस कामावरून दूर केलें आहे व तुमचें कुलमुखत्यार पत्र रद्द केलें आहे. यापुढें आमच्या संबंधीं तुह्मी कोणचाही देवघेवीचा व्यवहार करूं नये. तो आह्मांस कबूल होणार नाहीं. असें असतां जर काहीं एखादी देवघेव केलीत तर त्याची सर्व जबाबदारी तुमच्या शिरावर राहील. कळावें तारीख २० माहे जुलई सन १९०१ इ०

(सही)
अमृतराव कृष्णाजी पाटील
नागापूर दस्तुर खुद्द.

---

## जाहिरात

सर्व लोकांस ह्या लेखानें जाहीर करण्यांत येतें कीं, मौजे नागापूर तालुके खामगांव येथील अमृतराव कृष्णाजी पाटील यांचे नांवाचे व खामगांवांतील आमचे अडतीचे दुकान यावर आज पुष्कळ वर्षांपासून रा. रा. पूर्णाजी वल्लद कुकाजी पाटील रहाणार पाथरडी हे कुलमुखत्यार होते त्यांचें कुलमुखत्यारपत्र आह्मी तारीख १६ जुलई पासून रद्द केलें आहे. तर ह्या तारखे पासून आमच्या दुकानासंबंधी कोणचाहि व्यवहार ह्यांच्याशी करूं नये. व आमच्या करितां ह्यांस कोणीहि कर्ज वगैरे देऊं नये. जर या उपर कोणी ह्यांच्याशी आमच्या संबंधानें कांहीं व्यवहार केला तर तो आह्मांस कबूल नसून आह्मी त्याबद्दल बिलकूल जबाबदार नाहीं. ज्याचा तो आहे. कळावें तारीख २०।७।०१ इसवी.

सही
अमृतराव कृष्णाजी पाटील
नागापूर दस्तुर खुद्द.

---

## नोटीस.

रा. रा. सदाशिव वल्लद गडबड पाटील राहणार मौजे सावळी प्रगणे चांदूर तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणें.

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी शुद्धवऱ्हाडी छापखान्यांतून वर्तमानपत्रात तारीख ११।७।१९०१ इसवी रोजीं दिलेली नोटीस मजला तारीख १६।७।१९०१ इसवी रोजीं पावली त्यांतील मजकूर कापसाचा सवदा तुह्मी केला आहे व त्याचे रुपये तुमचेकडेस घेणें निघतें रुपये ७०८८ आहेत ते नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत द्यावें आणि पावती द्यावी न दिल्यास रिती प्रमाणें तजवीज केली जाईल, वगैरे मजकूराची दिली. त्याचें उत्तर आपणास देण्यांत येतें कीं कोणत्याही प्रकारचा व्यापार धंदा माणसें करित असतात. बायका व्यापाराचे सवदा वगैरेंत पडल्या बद्दल आज पावेतों मह्मी ऐकण्यांत नाहीं व तुमचेही ऐकण्यांत नसेल असें असून मी तुमच्याशी कापसाचा सवदा केला ही गोष्ट तुह्मी कितपत खरी व प्रामाणीकपणानीं इमान संभाळून लिहिली आहे हें हरी जाणें जसो मी तुमच्याशीं व्यापार वगैरे मुळींच केला नाहीं. केवळ तुह्मी माझ्या खानदानीस व इज्जतीस धक्का बसविण्या करितां ही खोटी नोटीस दिली आहे. तुमच्याशी माझे मुलानें ह्मणजे बंकटनें कांहीं सवदा व्यापार संबंधी कापसाचा केला असल्यास त्याची मला मुळींच माहिती नाहीं. केला असल्यास तुह्मी व तो पाहून घ्यावें व माझा अपमान केल्या बद्दल मजला योग्य जबाब आठ दिवसांत द्यावा. तसें न केल्यास मजला योग्य तजवीज करावी लागेल. हें नोटिशीनें कळविलें आहे. कळावें, तारीख १९ माहे जुलई सन १९०१ इसवी.

सही
सरीबाई मर्द भवानीदास
अगरवाले निशाणी
हातची बांगडी.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No. 4

सहामाही ,, ३ ,, ८
साल अखेर ,, ७ ,, १ ८
किरकोळ अंकास ....................८

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
वर ओळीस.........ओ१ ०१
दुसरे खेपेस .... ........०१

Annual in arrears
Six monthly......... 3 .............. 8 as
Single copy ..........................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY 26 JULY 1901 NO 29

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख २९ माहे जुलै सन १९०१ इ० अंक २९

## वर्तमानपत्रें आणि व्यक्ति विषयक टीका.

( लिहून आलेला मजकूर. )

वर्तमान पत्रें हीं हल्लींच्या काळांत सुधारणेचा एक मोठा घटकावयव अशीं मानलीं जातात. कारण त्यांच्या योगानें लोकांचें शिक्षण होत असतें. त्यांत नीति-विषयक लेख येतात, त्यांहीं करून लोकांस नीति-शिक्षण मिळतें, सामाजिक विषयांवर लेख येतात. त्यांहीं करून समाजाची स्थिति कशी आहे, तींत कोणत्या सुधारणा होत आहेत, ती जुन्याला धरून किती आहे, व नविनाकडे तिची प्रवृत्ति कशी होत आहे हें कळतें; राजनीति विषयक लेख येतात. त्यांच्या योगानें राजकर्त्यांचें धोरण कसें आहे, कायदेकानू नवीन कोणते व कसे होत आहेत, तसेंच रयतेवर सरकारचा जुलूम कोणत्या बाबतींत आहे व त्या बद्दल रयत कसकसे उपाय करीत आहे वगैरे गोष्टी कळतात; व्यापारा संबंधाचीही बातमी त्यांत असते, आणि सर्व जगभर ज्या कांहीं विशेष गोष्टी चाललेल्या असतात त्यांचाही उल्लेख असतो. अशा प्रकारचे व अनेक इतर विषय वर्तमानपत्रांत येत असल्यामुळे तीं अत्यंत वाचनीय होत. मागें एका विद्वानानें असें लिहिलें होतें कीं " पूर्वी लोक जशीं धर्म संबंधीं पुस्तकें नित्य नियमानें वाचीत असत, तशीं हल्लीं वाचीत नाहींत असें कित्येकाचें गाऱ्हाणें आहे. पण याचें खरें कारण असें आहे कीं त्यांची जागा वर्तमान पत्रांनीं घेतली आहे. धर्म पुस्तकांत मुख्यत्वें करून नीति सांगितलेली असते, व तीच नीति वर्तमानपत्रांत येत असल्यामुळें व अनीतीचीं उदाहरणें नेहमीं ताजीं आणि डोळ्यापुढें ढळढळीत दिसणारीं अशीं असल्यामुळें, वर्तमानपत्रें लोकादरास धर्मपुस्तकांपेक्षां अधिक पात्र झालीं आहेत. " हें एका विद्वानाचे विचार झाले. परंतु इतकी गोष्ट खास आहे कीं, नीति शिक्षणाची दृष्टि ठेवून जे नेहमी वर्तमानपत्रें वाचतील त्यांच्या आचरणांत सुधारणा होईलच होईल. दुसरा एक वर्तमानपत्रांपासून मोठा लाभ असा कीं, वर्तमानपत्रांतील लेख विद्वानांच्या हातचे असल्यामुळें लोकांच्या भाषेचीही सुधारणा होते. वाचणारे कितीही नीच जातीचे असले किंवा त्यांची भाषा मूळची कितीही ग्राम्य असली, तरी वर्तमानपत्रांच्या सततच्या वाचनानें ती अधिकाधिक नागरिक होत गेलीच पाहिजे.

वर सांगितलेले फायदे वर्तमानपत्रां पासून लोकांस मिळतात हें खरेंच आहे. पण इंग्रजी राज्यांत वर्तमानपत्रें ही एक मोठी शक्ति मानिली जाते; ती या फायद्या करितांच काय? रुचीत नाहीं. इतिहासावरून पाहिलें असतां वर्तमानपत्रांची उत्पत्ति इंग्लंदचा राजा पहिला जेम्स याच्या वेळीं इ० स० १६२२ त झाली. तेव्हां पहिलें साप्ताहिक वर्तमानपत्र प्रथम उदयास आलें. तो काळ असा होता कीं राजा आणि प्रजा यांच्या मध्यें कलहास प्रारंभ झाला होता. राजा ह्मणत होता कीं, मी आपल्या कृत्याबद्दल ईश्वरास जबाबदार आहे, प्रजेस जबाबदार नाहीं. व प्रजेचें ह्मणणें ( किंवा प्रजेच्या तर्फे पार्लमेंटाचें ह्मणणें ह्मणा ) असें होतें कीं, राजा हा प्रजे करितां आहे व सर्वस्वी प्रजेला जबाबदार आहे. अशा वेळीं वर्तमानपत्राचा प्रथम उदय झाला यावरून वर्तमानपत्राच्या खऱ्या उद्देशाचें स्वरूप ताडतां येतें. तो उद्देश हा कीं राज्यकर्त्यांच्या राजनीतीवर व कृत्यांवर कडक नजर ठेवून तींत जो कमजास्तपणा दिसेल तो उघडा करून सर्वांच्या लक्षांत आणून देणें, त्याजवर टीका करणें, तसेंच जे जे सरकारी अंमलदार असतात त्यांच्या वर्तनांवर बारकाईची नजर ठेवून तें जुलमी दिसेल त्या ठिकाणीं त्यावर टीका करून अंमलदारांवर एक प्रकारचा दाब ठेवणें. राज्यपद्धतींत सत्ता पुष्कळांच्या हातीं द्यावी लागते त्यांत विद्वान, विचारी आणि सत्ता चालविण्यास अगदीं योग्य असे पुरुष फार थोडे असतात, परंतु सत्तेचा दुरुपयोग करणार अशांची संख्या फारच मोठी असते. राज्यकारभार चालविण्याकरितां कायदेकानू उत्तम तयार केलेले असतात, आणि जे अंमलदार नेमिलेले असतात त्यांचें काम इतकेंच असतें कीं त्या कायदेकानू प्रमाणें त्यांनीं आपापलीं कामें करावीं, लोकांत बंदोबस्त राहून न्यायानें वागणाऱ्यांस सुख व्हावें, अनीतीनें वागणाऱ्यांस शासन व्हावें, असा एकंदर राज्यपद्धतीचा उद्देश असतो. परंतु ज्या अधिकाऱ्यांस न्याय इनसाफ करण्याकरितां व लोकांस सुख देण्याकरितां नेमलेलें असतें, ते हातीं असलेल्या सत्तेच्या बळानें इतके उन्मत्त होतात कीं त्यांच्या पासून सुख न मिळतां अति दुःख होतें. ज्या प्रमाणें झोटिंग बादशाहींत दिवसा ढवळ्या दांडगे लोक गरीबगुरिबांस भर रस्त्यांत नाडतात व लुटतात, त्या प्रमाणें हे अंमलदार वागत असतात. त्यांच्या भोंवतालीं हजारों लोक असतात त्यांची ते काडीमात्र भीति बाळगीत नाहींत. इंग्लंड सारख्या स्वतंत्र देशांत, कीं जेथें स्वराज्य आहे, लोक सुशीक्षित आहेत, धैर्यवान् आहेत, तेथें अशा अनीतीनें वागणाऱ्या अंमलदारांचा त्रास पुष्कळ कमी असेल; परंतु हिंदुस्थाना सारख्या परतंत्र आणि पराजित देशांत, कीं जेथें हजारों वर्षां पासून लोक पारतंत्र्याच्या स्थितीमध्यें असल्यामुळें अगदीं निकस झालेले आहेत, अज्ञान आहेत, आणि ज्यांना राजा ह्मणजे विष्णु आणि राजाचे अधिकारी ह्मणजे आपले मायबाप असें मानण्याची अगदीं संवयच झालेली आहे, जे दीडदमडीच्या सरकारी अंमलदारा पुढें पायांतला जोडा काढून आणि हात जोडून देवापुढें उभें रहावें त्या प्रमाणें उभे रहातात अशी ज्यास संवय झालेली आहे, अशा लोकांवर अंमल करणारे अधिकारी अन्यायी आणि कुर्रेबाज असले ह्मणजे त्यांच्यापासून लोकांस काय ताप होईल हें सांगणें नको. अशा अंमलदारांवर कडक नजर ठेवून त्यांस वचकाखालीं ठेवणें हें वर्तमानपत्रांचें फार मोठें कर्तव्य आहे. आणि वर्तमानपत्रें ही एक मोठी शक्तिच आहे असें जें ह्मणावयाचें तें त्यांनीं ही कामगिरी बजावली तरच ह्मणावयाचें. कसाही अरेराव अंमलदार असो, त्याच्या दुर्वर्तनांबद्दल दोन ओळी वर्तमानपत्रांत आल्या तरी तो थर थर कांपावयाला लागतो. त्याला झोंप येत नाहीं आणि चैन पडत नाहीं. आणि अमुक अमुक मजकूर कोणी लिहिला, वर्तमानपत्र ला बातमी कोणी दिली याच्या तो शोधाला लागतो. एवढें या वर्तमानपत्राचें सामर्थ्य आहे. अधिकारी कितीही कुर्रेबाज किंवा दंडू असला तरी लोकमताला भितो. पण त्याच्या आस पास किंवा गांवांत किंवा प्रांतांत जे लोक त्याचीं दुष्कर्त्यें प्रत्यक्ष पाहात असतात त्यांस भीत नाहीं. त्यांस तो जनावरा प्रमाणें समजतो. पण वर्तमानपत्रांत चार ओळी आल्या कीं गडबडून जातो. एका अर्थी हा मोठा चमत्कार ह्मणायाचा; कारण लोकांच्या समक्ष गैरवर्तन करण्यास जो भीत नाहीं त्यानें वर्तमानपत्रांतील लेखास भ्यावें हा चमत्कार नव्हे तर काय? पण हा वस्तु-महिमा पडला. ही एक विलक्षण सत्ता आहे. पण दुःखाची गोष्ट ही कीं वर्तमानपत्रकर्ते कोणत्याही कारणानें ह्मणा, अशा अनीतिमान् अंमलदारांचा झेंडा वर उचलून त्यांस जगतापर्दे यत्किंचित् दाखवीत नाहींत. त्यांस कायदेकानूचा मोठा प्रतिबंध आहे हें खरें आहे तथापि ही कामगिरी जर त्यांच्या हातून चांगली बजावली जात नाहीं तर त्यांच्या मुख्य कर्तव्याचा मोठा भाग ते बजावीत नाहींत असें ह्मटलें पाहिजे.

पुढें चालेल )

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक श्रावण शुद्ध १३ शके १८२३

चक्रवर्ती बादशहा एडवर्ड यांनीं आपल्या कारकिर्दीला प्रारंभ एका चांगल्या शुभ गोष्टीनें केला आहे. त्यावरून इंडियन राजेरजवाड्यांच्या राजनिष्ठपणाविषयीं एक निराळी सरकारी सनदच मिळाली आहे. राजघराण्यांतील थोर थोर पुरुषांस लष्करी खात्यांतील हुद्देदारी देण्याविषयीं नवीन योजना करण्याचा संकल्प ठरला आहे आणि तो संकल्प स्टेट सेक्रेटरीच्या मार्फतीनें नुकतांच कळविण्यांत आला आहे. इंदूर अजमीर, लाहोर, व राजकोट येथील राजकुमारांच्या पाठशाळांतील कांहीं होतकरू पुरुषांस लष्करी शिक्षण देऊन त्यांस लष्करी अंमलदार करावें असा सरकारी विचार आहे. हा विचार फार चांगला आहे, आणि तो लवकरच फलद्रूपतेला येऊन ब्रिटिश राज्याची बळकटी व वैभव याला द्विगुणित करो असें आह्मी इच्छितों.

कोणत्याही राष्ट्रांत प्रजेला निःशस्त्र करण्याचा कायदा नाहीं पण तो आमच्या देशांत फार कडक रीतीनें अमलांत आहे. आमच्या राजनिष्ठेचें हें दुष्ट बक्षीस कोणी काढून घेईल आणि इंडियन लोकांस लष्करी खात्यांत सुखानें घेण्यांत येईल तो सुदीन होय!

## उत्तम उदाहरण.

मेहकर येथें श्रीमती तुळसाबाई यांनीं स्त्रियांची सभा भरवून त्याच्यांत विद्येची गोडी उत्पन्न करण्याच्या उद्देशानें स्त्रिशिक्षणाच्या महती बद्दल जें संभाषण केलें तें दुसरीकडे आह्मी मोठ्या आनंदानें छापिलें आहेच.

संपत्ति, अधिकार, इत्यादि सुखसाधनें अनुकूळ असूनही त्यांतच निमग्न होऊन न राहतां विद्याविषयक व्यासंगाकडे यांनीं आपलें मन वळविलें हें त्यांच्या प्रगल्भ विचारांचें दर्शक होय. अंगावर घालण्यास पुष्कळ डागिने मिळाले व उंचीं वस्त्रें वापरायास मिळालीं ह्मणजे त्यांतच चूर होऊन राहणाऱ्या श्रीमंत स्त्रिया थोड्या आहेत काय? परंतु पुरुष असो, अथवा स्त्री असो, मानवी प्राणी, विद्येनें, ज्ञानानें व सद्गुणांनीं जशी शोभा पावेल तशी नुसत्या वस्त्रालंकारांनीं पावणार नाहीं हे तत्व तुळसाबाई यांस पूर्णपणें मान्य झालेलें पाहून फार समाधान वाटतें. परतु त्यांच्या थोर मनाची धांव याच्याही पुढें गेलेली दिसते. आपल्या देशभगिनींची आज पर्यंतची व आतांची स्थिति कशी आहे आणि तिच्या संबंधानें ज्ञान संपन्न स्त्रियांचें कर्तव्य कोणतें आहे या गोष्टीचा त्यांनीं विचार करून आपल्या भगिनीं वर्गाविषयीं कळकळा दाखविला आहे आणि नुसता कळकळ दाखविला इतकेंच नाहीं, तर त्यांस आपल्या घरीं बोलावू-

न विद्यानंदा विषयीं बोधही केला आहे हें यांचें उदाहरण किती स्तुत्य आहे ह्मणून सांगावें ? प्रस्तुत काळीं आपल्या समाजाचे उत्कर्षा करितां यांच्या सारख्या साध्वींच्या सहाय्याची फार मोठी गरज आहे.

साधारणपणें पहातां,ज्या ज्ञातींतील स्त्रियांस समाजांत येण्यास व उठण्या बसण्यासी रूढीचा प्रतिबंध नाहीं, अशा स्त्रियाही पूर्वोक्त प्रसंगीं दोन शद्ब बोलण्यास, एकाएकीं, शक्तिमान होत नाहींत; त्या लाजून लाजून मागेंच राहतात, असें आपणांस आढळतें. मग ज्यांत पडद्याची चाल अद्याप चालू आहे ह्या ज्ञातींतील ज्या एका सन्मान्य युवतीच्या हातून एवढें मोठें सत्कृत्य घडलें, तिची योग्यता लहान समजतां येत नाहीं. ह्यांचें अनुकरण करण्याची हौस व विद्या शिकण्याची आवड सर्वांनीं अवश्य मनांत धरावी.

---

## खरें बोलणें आणखी एक वेळ

तारीख २९ मिनहूचे अंकीं शुद्धवऱ्हाडी वर्तमानपत्रांत "सत्यासत्याची मीमांसा" या भव्य सदराखालीं लहानसा लेख आला आहे. या लेखाच्या आरंभीं जो 'सत्य' शद्ब वापरण्यांत आला आहे तो सत्य शद्ब आणि 'सत्य भाषण' यांतील सत्य शद्ब, हे फार भिन्न अर्थाचे आहेत. सत्य शद्ब परमेश्वरास जेव्हां लावतात तेव्हां त्याचा अर्थ, खरें बोलणें यांतील 'खरं' शद्बाच्या अर्थाहून फार भिन्न आहे. हर एक शद्बाचा अर्थ निर्मळ कळणें फार आवश्यक आहे. त्या वांचून मन गोंधळांत राहतें व ह्यातून जशा क्रिया व्हाव्या तशा त्या होत नाहींत. व ह्याचें लक्षण उपनिषदांत असें केलें आहे. "सत्यं ज्ञान मनंतं ब्रह्म" या वाक्यांत जो 'सत्य' शद्बाचा अर्थ आहे तोच अर्थ शुद्धवऱ्हाडी यांतील लेखांत घेतला आहे. तो अर्थ खरें बोलणें या विषयांत आपणास नको आहे. या 'सत्य' शद्बाचा अर्थ "त्रिकालाबाधित" असा आहे. ह्मणजे तिन्ही कालांत ज्या वस्तूस बाध नाहीं ह्मणजे अभाव नाहीं ती वस्तू सत्य. ह्मणजे "जी वस्तू पूर्वीं होती, हल्लीं आहे व पुढेंही असेल ती सत्य वस्तू." ब्रह्म आणि परमेश्वर हीं दोन्ही एकच आहेत, ह्मणून परमेश्वरासही सत्य शद्ब लावितात. परमेश्वर सत्य आहे याचा अर्थ परमेश्वरास नाश नाहीं. ह्मणजे तो निरंतर आहेच आहे. या सत्य शद्बाचा अर्थ आणि 'सत्य भाषण' यांतील सत्य शद्बाचा अर्थ यांचा घोटाळा होऊं नये ह्मणून हें विवेचन केलें आहे. या बद्दल शुद्धवऱ्हाडीतील लेखक आह्मांस माफी देतील अशी उमेद आहे. सत्य भाषण या शद्बांतील सत्य शद्बाचा अर्थ सर्वांस माहीत आहेच. तो हा कीं 'आपल्या समजा प्रमाणें.'

पूर्वीं खरें बोलण्या विषयीं लिहित असतां एका वकिलानें आह्मांस दिलेली सला आह्मी सांगितली होती. ती सला ह्मणजे "ज्या बोलण्या पासून लाभ असेल तें बोलणें बोलावें मग तें खरें असो वा खोटें असो." तसेंच आह्मी असेंही सांगितलें होतें कीं, खरें बोलण्या पासून ईश्वरप्राप्ति किंवा स्वर्गप्राप्ति आहे या शास्त्राच्या विधाना वरून वरील अनुमान त्या वकिलानें काढलें होतें. या विषया संबंधानें विचार करीत असतां आपल्या समाजांत या वकिलांच्या मतासारखें जें एक वचन रुढ आहे तें आह्मांस आठवलें. तें वचन हें कीं जर "कोणाचा जीव वांचत असेल किंवा कोणाचें लग्न होत असेल तर खोटें बोलावें" सज्जन ह्मणविणारे या वचना प्रमाणें वागतात. जीव वांचविण्या संबंधानें त्यांचें जें एक ठरीव उदाहरण आहे तें हें "जर एखादी गाय खाटकाच्या हातून सुटून एखाद्या रस्त्यानें गेली असली व तिच्या मागें खाटीक लागला असला आणि त्या खाटक्यानें जर उलट दिशेनें येणाऱ्या एखाद्या गृहस्थास विचारिलें कीं 'ह्या रस्त्यानें अमुक अमुक वर्णाची गाय गेलेली तुह्मी पाहिलीत का" आणि जर हा खाटीक आहे वगैरे सर्व त्या गृहस्थाच्या लक्षांत आलें तर त्यानें खाटकास भलतेंच उत्तर देऊन खोटें बोलावें," तसेंच "जर कोणा मुलाचें किंवा मुलीचें लग्न होत असलें आणि कोणा गृहस्थास वा पक्षाच्या किंवा त्या पक्षाच्या माणसांनीं कांहीं माहिती विचारिली व त्यास ठाऊक असलेली माहिती लग्न बनून येण्यास विघातक अशा प्रकारची असली तर त्या गृहस्थानें खोटें बोलावें." ही दोन्हीं उदाहरणें वारंवार देण्यांत येतात. "पटास दिली ओसरी, पट हातपाय पसरी" अशी एक ह्मण आहे, किंवा अशाच अर्थाच्या दुसऱ्याही ह्मणी आहेत, त्यां सारखी स्थिति येथें झाली आहे. लोकांत धर्मोपदेशकांनीं थोडीशी सवड दिल्याबरोबर ते हवे तितके पाय फैलावूं लागले आहेत. अशी सवड देणें बिलकूल बरोबर नाहीं. आपल्या बोलण्यानें गाईचें आयुष्य सरतें किंवा वाढतें असें नाहीं. तसेंच आपल्या बोलण्यानें एखाद्याचें लग्न एकवार राहिलें ह्मणून तें कधींच होणार नाहीं असेंही नाहीं. प्राण्याचा मृत्यु किंवा स्त्रीपुरुषाचे विवाह घडविणारे किंवा बिघडविणारे आपण आहों ही भ्रांति आहे. या गोष्टी प्रारब्धाधीन किंवा ईश्वराधीन आहेत असें जगतांत सूक्ष्मनिरीक्षण पूर्वक फार वर्षे वांचलेल्या विचारी पुरुषांचे अनुभवास आलें असेलच. तथापि हा एक वेगळाच विषय आहे; या करितां यांत आह्मी ज्यास्त लिहिण्यास इच्छीत नाहीं. खरें बोलण्यापासून बोलणाराचें या लोकीं नाहीं तर परलोकीं तरी अत्यंत हित आहे आणि त्यापासून येथें समुदायाचें तर हित आहे यांत कांहीं शंकाच नाहीं. याकरितांच खरें बोलायाचें किंवा ही ईश्वरी आज्ञा आहे ह्मणूनच खरें बोलायाचें. त्या खरें बोलण्याची सांगड लाभ किंवा हानि यांच्याशीं करून उपयोगाची नाहीं. ती जराशी केली कीं काम बिघडलेंच. "खरें बोला, प्रामाणिकपणानें वागा, दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार करूं नका, परस्त्रीची वांछा धरूं नका" इत्यादिक जीं घबाड वचनें प्रत्येक देशांतील समुदायास घालून दिलीं आहेत तीं जनतेच्या फायद्या करितां आहेत. जनतेच्या फायद्यांत व्यक्तीचा फायदा आहे हें जरी सामान्यें करून खरें आहे, तरी कांहीं वेळा हीं वचनें पाळल्या पासून व्यक्तीचें नुकसान होणें संभवनीय आहे. पण इह-लोकीं जरी व्यक्तीचें नुकसान झालें तरी ईश्वराची आज्ञा पाळल्या बद्दल त्या व्यक्तीचें पर लोकीं हित झालेंच पाहिजे. तात्पर्य, खोटें बोलण्याला धर्माची किंवा सज्जनांची अनुज्ञा काडीमात्र उपयोगाची नाहीं.

शुद्धवऱ्हाडी कर्त्यांनीं या विषयाचा अनुवाद आपल्या पत्रांत केला आहे या बद्दल आह्मांस फार संतोष वाटतो. या विषयाची अनेक दिशांनीं चर्चा होणें फार इष्ट आहे. पुष्कळ गृहस्थांनीं आपापले अनुभव व अडचणी वर्तमानपत्रद्वारें जगांस कळवाव्या अशी आमची इच्छा आहे. कारण "खरें बोलून जगांत चालावयाचें नाहीं" असें मत बाळगणारे फार लोक आहेत व ते आपणांस मोठे शहाणेहि समजतात, आणि त्याच्या त्याच्या पुरते अडणीचे दहा पांच प्रसंगाहि असतात; व त्या प्रसंगा वरून त्यांचें अनुमान बांधलेलें असतें. आतां, त्या त्या प्रसंगीं त्या त्या व्यक्तींचें खरें बोलून चाललें असतें किंवा नाहीं हें इतरांस सांगता येणार नाहीं. पण त्यांतल्या बऱ्याच प्रसंगीं खरें बोलून चाललें असतें यांत कांहीं शंका नाहीं. कदाचित् यत्किंचित् नुकसान एखाद्या प्रसंगीं झालें असतें. समाजाची नीतिमत्ता वाढे पर्यंत असें नुकसान कांहीं प्रसंगीं होईल; पण त्या नुकसानाच्या मोबदल्यांत धैर्य आणि मानसिक सुख हीं दोन प्राप्त होतील, व या दृष्टीनें पाहूं जातां नुकसानी पेक्षां नफाच ज्यास्त असें आपल्या अनुभवास येईल आमचें असें ह्मणणें आहे कीं, तुमचें मोठें जेव्हां नुकसान होत असेल तेव्हां तुह्मी खोटें बोला. पण लक्षांत ठेवा कीं, अशा मोठ्या नुकसानाचे प्रसंग सर्व आयुष्यांत दहा पांच देखील येणार नाहींत. आणि हल्लीं प्रत्येकजण दिवसांतून दहा पांच वेळ खोटें बोलतो अशी स्थिति आहे, ही स्थिति काय ह्मणून ? या प्रश्नाचें उत्तर इतकेंच कीं जो तो असें ह्मणतो कीं खरें बोलुन व्यवहारांत चालावयाचें नाहीं, आणि याच वचनाचा अनुवाद सर्व लोक करीत आहेत. ही समजूत एकदां नाहींशी झाली पाहिजे. **खरें बोलून चालतें, चालतें, चालतें,** ही समजूत सर्वांची दृढ झाली पाहिजे, एखाद्या अत्यंत अडचणीच्या प्रसंगीं चालत नाहीं अशी समजूत राहिल्यास कांहीं हरकत नाहीं. याच्या योगानें असें होईल कीं हल्लीं आपण उठल्या बसल्या खोटें बोलून बोलून जे अगदीं रसातळास गेलों आहों ते थोडे थोडे वर यावाला लागूं. घरांत पुरुष खरें बोलूं लागले कीं बायका आणि मुलें खास खरें बोलूं लागतील. लहान मुलांची खरें बोलण्याकडे प्रवृत्ति असते. एखादे वेळीं बाहेरचा मनुष्य आपल्या घरीं आलेला असतो त्याच्या देखत घरांतील मूल दुसऱ्या समक्ष न बोलण्या सारखी एखादी गोष्ट येऊन बोलतें. तेव्हां बापास किंवा आईस राग येतो. व तो गृहस्थ गेल्यावर ती किंवा इतर कोणी त्या मुलास खोटें बोलण्यास शिकवितात. येथून खोटें बोलण्याला आरंभ होतो. मुलांस खोटें बोलण्यास शिकविण्यापेक्षां "दुसऱ्याच्या देखत घरांतील गोष्ट बोलूं नये" व मुलगा बाहेर गेला असतां घरांतील गोष्ट कोणी जर विचारील तर "मी तुह्माला सांगत नाहीं" असें बोलण्यास त्यास शिकवावें. हल्लींच्या स्थितींत लोक असें उत्तर देणाऱ्या मुलास 'उद्धट' ह्मणतील हे कबूल आहे. पण जेव्हां ते स्वतः सत्यप्रिय होऊं लागतील त्या वेळेस मुलांस उद्धट ह्मणण्या ऐवजीं धीट ह्मणतील. मनुष्य स्वतः धीट असला ह्मणजे तो दुसऱ्याच्या धीटपणाची वाखाणणीच करील. येथें आह्मांस एका गोष्टीचें स्मरण होतें, ती गोष्ट ही कीं इंग्रज लोक एकंदरीनें सत्यप्रिय आहेत. त्यांच्यांत लबाडी बोलणारा मनुष्य जितका नीच मानिला जातो तितका आमच्यांत खास मानिला जात नाहीं. या करितां आपण त्यांच्याशीं वागतांना जर एखादी गोष्ट 'मी सांगत नाहीं,' असें ह्मटलें तर तितक्या पुरता जरी एखाद्यास राग आला तरी 'खोटें सांगण्यापेक्षां या गृहस्थानें आपणास सांगत नाहीं असें उत्तर दिलें यावरून हा मनुष्य सत्यप्रिय आहे' असें त्यास वाटून तो आपल्या मनांत आपणांस चाहील असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं. अखेरीस सर्वांस आमची विनंती अशी कीं, खरें बोलण्याचा त्यांनीं नियम करावा. अत्यंत अडचणीच्या प्रसंगीं खोटें बोलावें व ते प्रसंग एका वहींत तारीखवार लिहून ठेवावे. ह्मणजे किती वेळा व कशा प्रसंगीं आपण खोटें बोललों हें प्रत्येकांस कळेल. पुढें पुढें असा हिशेब ठेवणारास असें वाटूं लागेल कीं, "अरे या या प्रसंगीं आपण उगीच खोटें बोललों" व असें होतां होतां खोटें बोलण्यांचे प्रसंग आपणांस फार विरळा येतात असें वाटूं लागेल. आणि प्राण गेला असतांही खोटें बोलायाचें नाहीं अशा कडक व्रताचीं माणसें याच वर्गांतून निघूं लागतील. हल्लीं 'देवाच्यान, मायच्यानं, बापाच्यान' असें बोलण्याचे जे प्रसंग कितीएकांस येतात ते बंद होतील. 'अमक्याची आण किंवा तमक्याची आण' असें न बोलतां 'मी बोलतों हेंच खरें समजा' असें लोक बोलूं लागतील, व आण शद्बावांचून इतरांस तेंच खरें वाटूं लागेल. आरंभ केल्यावांचून खरें बोलून चालतें किंवा नाहीं हें कसें कळावें ?

---

(गेल्या सोमवारीं रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांची शरीरप्रकृति मेडिकल बोर्डाच्या डाक्टरांनीं तपासली आणि असा अभिप्राय दिला कीं, सरकारी चाकरी करण्या इतकें यांच्या अंगीं शरीरबल उरलें नाहीं. इंग्रजी राज्यांत वैद्याच्या अभिप्रायाला ईश्वरी सत्तेची थोरवी आहे. अर्थात् रा. रा. आण्णासाहेब यांनीं शाळाखात्याला नमस्कार केला आणि ते आपल्या बहुत वर्षांच्या परिश्रमाचीं अमृतफळें उपभोगण्याला घरीं राहिले. सरकारी चाकरीचा संबंध सुटला तरी ते ह्या आमच्या आकोल्यांतच सुखवस्तु पेनशनर ह्मणून राहणार आहेत ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय. त्यांनीं शाळाखात्याची चांगली सुधारणा केली, जास्त काय सांगावें, त्यांच्या इतका उत्कृष्ट पुरस्कर्ता शाळाखात्याला विरळाच मिळेल इत्यादि गोष्टी सर्वतोमुखीं आहेत, त्यांच्या

चांगुणपणा विषयीं सनद देण्याचा आह्मांस अधिकार पोचत नाहीं पण प्रसंगानें एवढें सांगणें भाग आहे कीं, ह्यांच्या सहवासांत जे राहिले, ह्यांचे जे शिष्य होते किंवा जे ह्यांच्या उपदेशाला ऐकणारे होते ते त्या थोर पुरुषाचा खरा महिमा चांगला सांगू शकतील. आणि त्यास आपल्या वर्तनांतील सरळपणानें, विद्याभ्यासाच्या आवडीनें व समाजांतील श्रेष्ठपणानें आपल्या गुरूच्या नैसर्गिक कांहीं कांहीं सद्गुणांची ओळख लोकांस करून देतां येईल. गुरूंचे सद्गुण विद्यार्थ्यांत थोडेच उतरत असतात पण अनुकरणाचा जितका परिणाम मनुष्य स्वभावावर होऊं शकतो आणि गुरूची प्रेरणा विद्यार्थ्यांस जितकी लागू शकते त्या धोरणानें त्यांच्या छात्र समूहांत त्यांच्या पुष्कळशा गोष्टी प्रतिबिंबित झालेल्या दृष्टीस पडतील. ह्यांच्या इतका उत्कृष्ट अध्यापक क्वचित् आढळेल, इन्स्पेक्टर या नामानें त्यांचा अधिकार वाढला आणि त्यांचें सौजन्य, परीक्षण व सुधारणाशक्ति यांनीं सर्व प्रांतभर त्यांचा लौकिक विस्तृत केला. यांचा निकट संबंध मोठा मोहक आहे आणि ते कोणाहि माणसास आपलासा सहज करून सोडतात.

कांहीं अधिकारी आपल्या अधिकाराला संभाळून असतात ह्मणजे आपला थोरपणा वाढावा या हेतूनें दुरून दुरून सर्व व्यवहार करितात आणि अलिप्तपणानें आपला श्रेष्ठपणा कायम ठेवितात. सर्वां बरोबर मिळून मिसळून राहण्याचा क्रम अशा अधिकाऱ्यांना बरा वाटत नाहीं. पण रा. रा. अण्णा साहेब यांचा कित्ता कांहीं निराळाच आहे. ते मोठेपणा संपादण्याच्या नादीं मुळींच नसतात. पण मोठेपणा त्यांच्या कडे आपोआपच धांव घेतो. वर्तनानें त्यांच्या सारखे सरळ व प्रेमळ गृहस्थ बोटावरच मोजतां येतील. यांची दृष्टि कल्याणकारी आहे व आपल्या ओळखीच्या लोकांचें कल्याण व्हावें यासाठीं त्यांचा प्रयत्न सारखा चालू असतो. अधिकारबलानें पुष्कळ लोक शोभतातच पण हे आपल्या सद्गुणांनीं सर्वत्र विशेष पूज्य व मान्य झाले आहेत. घरची राहणी साधी, स्वभाव गोड, वर्तन बाळबोध, ईश्वरादर निष्ठा इत्यादि गोष्टी एकत्र आहेत ह्मणूनच यांचा परिचय हृदयंगम व सुखकारक वाटतो. सर्वस्वीअनुकरणीय असेंच यांचें सच्चरित्र होय.

डाक्टरानीं यांच्या चाकरी संबंधानें अभिप्राय दिला तरी पण आनंदाची गोष्ट अशी कीं त्यांची प्रकृती सदृढ, अंगाची काठी मजबूत व शरिराची ठेवण गोटी सारखी आहे. यांचा उत्साह व कार्यशक्ति हीं तरुण मंडळीला खरोखर लाजवितील. यांचा विद्येचा व्यासंग तर एखाद्या दुर्व्यसनाप्रमाणें सदा सर्व काळ एक सारखा अंगीं खेळतो आहे. ग्रंथ लेखनाची हौसहि पराकाष्टेची आहे. सार्वजनिक कार्यभार अंगावर घेण्याचा बिलकूल कंटाळा किंवा त्रास नाहीं सुधारणेची खरी प्रगति अशाच लोकांच्या हातून आपल्या समाजांत होईल आणि यांचीच सुधारणा सर्वथैव अभिनंदनीय राहील.

असा लोककल्याणकारी गृहस्थ राजसेवेच्या उच्च पायरीला पोचला नाहीं हें आमचें दुर्भाग्य होय. गुण ग्राहकता लोपली तर तो दोष गुणी नरश्रेष्ठाचा नाहीं. ह्मणूनच रा. रा. आण्णा साहेब उच्च सिंहासनावर बसलेल्या सद्गृहस्था पेक्षांहि आह्मांस अधिक पूज्य आहेत. सिंहासनानें यांस निराळी शोभा थोडीच यावयाची होती पण त्या गादीचा खरा अधिकार यांच्यामुळें विशेष कळण्यासारखा होता. पण ह्या सुयोगाचा सरशेवटचा आशातंतूहि सरकारनें कठोरपणानें तोडून टाकला हा जनसमाजाचा मोठा अपमान सरकारानें केला आहे. अपमानच मनुष्याला मानी, उदात्त व गंभीर करितो. व जनतेनें सरकारी चाकरीचा नीरसपणा व निर्जीवपणा अशा प्रसंगीं ओळखून घ्यावा. उत्तम रत्न मूर्खपणानें किंवा दुष्टपणानें अंधारांत फेंकून दिलें तरी परिस्थितीच्या काळोखीनें त्या रत्नाची दीप्ति अतीच उज्वलित होते; तद्वत् सरकारानें ज्या लोकमान्य गृहस्थांस मागें टाकलें यांची लोकप्रियता अल्प राजमान्यतेमुळें फारच वाढली आहे. रा. रा. महाजनी सारखी शहाजोग रत्नमंजूषा आह्मांपाशीं आहे आणि तिच्यापासून आह्मास कल्पवृक्षा प्रमाणें सर्व चांगल्यां गोष्टी प्राप्त होत जातील. ईश्वर करो आणि राजश्री आण्णासाहेब दीर्घायुषी, सुखी व लोककल्याणकारी चिरकाल राहोत!)

---

# The Berar Samachar

MONDAY JULY 29 1901

The Excise department is one of those branches of administration wherein the Government interpose themselves as the saviour of the people from the vices of intoxication and tax the articles of drink, and smoke in a manner to make them as dear as possible. The maximum of revenue with the minimum of consumption seems to be the motto of this department. The source of revenue is considerably expansive and in the course of time it has reached a climax and tends further to show a decline in the annual revenue. The Government trade in fact upon the vices of the people and make as much money as the pockets of the people can allow them to indulge in those vices. But the real difficulty begins when the maximum revenue is pushed forward beyond the proper standard. The Government intend to check the vice and therefore adopt all possible measures to bring pressure upon the people and to deter them from having a full and free indulgence in it. The principle is benevolent. It aims at the general good of the masses. But there are limits within which the vices of the people can be brought under control. People will take to drinking as long as they can spare the last pie for it. The habits of the people are controlable within certain bounds. We cannot succeed in changing them so as to make men quite free from the least tinge of their habitual vices. The task is impossible and it is unwise to screw up the people to yield a larger revenue. The principle of checking the vices of the people is changed in its course. The matter assumes a different stand—point and it becomes the sole concern of the Government to push on its revenues. This procedure is suicidal and presses the poor people with the larger burden of taxation. Here the policy of the excise—administration becomes vitiated in its very application and irrespective of the control over the vices the revenues go on increasing when we find that the labouring masses of the people who contribute to it are growing poorer and depriving their families of the pittance they can spare after they satisfy their desire for a drink, a narcotic or a smoke. Intoxication is the very blessing of their life and they live a longer life if they get in time their usual things that keep them in good mood and at work in a cherry manner. We have good reasons to think that the Government realize a large revenue from the purse of the poor people. The excise administration loses its excellence and becomes the proper object of harsh criticism. We request the government to see whether they can see their way to reduce the revenue from this source of income to a minimum standard. The dire effects of the last famine told heavily upon the excise—revenue. The matter seems to have assumed a brighter aspect with return to the days of plenty and prosperity. But the chances of realizing the old arrears a lac and a half Rupees are far off from a hopeful prospect. The annual net income of the Department of 1900—01 was Rs. 10,83,220—2 Annas 3 Pies exclusive of the total expenditure of Rs. 25519—2—7. This is no doubt a large sum and we think in the light of the experiences of the last famines that the taxation should be further lightened in order to relieve the poor people from the harshness and the rigour of the Excise department.

---

## वऱ्हाड

काल सायंकाळीं रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनीं वर्षोत्सव व्याख्यान मालेंतलें १ लें पुष्प गुंफिलें. विषय ज्ञानसंपादण्याची साधनसामुग्री हा होता. भाषण फार रसभरित, सुदेतुत व मनोहर झालें. रा. रा. हरी रामचंद्र रोहिणखेडकर हे अध्यक्ष होते आणि त्यांनीही उपसंहार चांगला केला.

येथील हायस्कूल विद्यार्थ्यां बरोबर युरोपिअन लोकांचा क्रिकेटचा सामना गेल्या बुधवारीं झाला. विद्यार्थी हरले खरे पण मे० क्यांडी साहेबांच्या कृपेनें तरुण विद्यार्थ्यांस क्रिकेट खेळण्याचा मोठा हुरूप व उत्साह आला आहे.

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एजुक्याशनल इनस्पेक्टर यांनीं पेनशन घेतल्या कारणानें खालील प्रमाणें बदल्या देण्या विषयीं विचार चालू आहे:—

बदलीचें स्थळ व हुद्दा खालील प्रमाणें:—

रा. रा. बळवंत विष्णु वैद्य हेड क्लार्क अकोला— यांस दिपुटी इनस्पेक्टर अकोलें.

रा. रा. विष्णु नारायण डांगे बी. ए. वणी.— यांस बुलडाणा दिपुटी इनस्पेक्टर.

रा. रा. विश्वनाथ मोहनीराज धर्माधिकारी हेडमास्तर, इंग्रजी मराठी शाळा उमरावती.— यांस यवतमाळ दिपुटी इनस्पेक्टर.

रा. रा. श्रीधर रामचंद्र पिंपळखरे बुलडाणा— यांस इलिचपूर दिपुटी इनस्पेक्टर.

रा. रा. रामचंद्र सदाशिव लेले बी. ए. दिपुटी इनस्पेक्टर इलिचपूर— यांस अकोला हेड क्लार्क.

मलकापूरच्या तहशिलीच्या जागीं रा. रा. दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए. यांस तहशिलदार नेमल्या कारणानें खालील वर्गावर्गी नायब तहशिलदार मंडळींत करण्यांत आली:—

| रा. रा. | बदलीचें स्थळ. |
|---|---|
| रामचंद्र अंबादास साधु | चिखली. |
| दारयशा एदलजी संजाना | मोर्शी |
| गोविंद दामोदर धिरणीकर | केळापूर. |
| नरहर अमृत उदगीरकर | जळगांव |

---

क्लास नंबर १५ पैकी नंबर २

१९०१

विद्यमान त्रिंबक गणेश परांजपे सिव्हिल जड्ज जिल्हे वाशीम.

जाहीरनामा सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं कसबे मंगरूळपीर तालुके मंगरूळ जिल्हे वाशीम येथील राहणार द्रौपदी मर्द भवानजी नाईक खपली, ही तारीख २२ आगष्ट १९०० इसवी रोजीं मंगरूळपीर येथें मरण पावली. तिचे कर्ज खाली लिहिलेले लोकांकडून एकंदर रुपये येणें आहेत, ते.:-

| | |
|---|---|
| १ करणाजी धोंडबा राहणार कारंजा | १२८८॥-॥। |
| २ विनायक रा[illegible] पा० करणार लक्ष्मीबाई राहणार कारंजा. | १५९३॥=॥। |
| ३ अंबादास सखाराम राहणार अनसींग | ५३६ |
| ४ फकीरजी वल्लद लक्ष्मण राहणार खेर्डे. | ५५४८- |
| ५ फकीरजी वल्लद मानाजी धानोरे | ७५ |
| ६ विश्वनाथ भगवान पाटील राहणार कुतरडोह. | २९६ |
| ७ भिवाजी वल्लद जाणु राहणार मंगरूळ | ३८९ |
| ८ पुंजाजी बीर माळी राहणार मंगरूळ. | ३१५ |
| ९ सदासीव लक्ष्मण सोनार राहणार मंगरूळ. | २०० |

सदर्हू कर्ज वसूल करण्या करितां वारसाचे सर्टिफिकीट मिळावे ह्मणून मैताचा पुतण्या नामे यशवंत केशव खपली राहणार मंगरूळपीर यानीं अर्ज दिला आहे तरी मैताचे जे कोणी अर्जदारा शिवाय जवळचे वारीस असतील त्यांनीं व मैताचें येणें असलेले कर्ज त्याजवर कोणाला हक्क संबंध असेल त्यांनीं आमचे कोर्टांत वाशीम येथें तारीख २४ आगष्ट १९०१ रोजीं १० वाजतां हजर व्हावे. या प्रमाणें न केल्यास कायदा प्रमाणें व्यवस्था केली जाईल. कळावे, तारीख २९ जुलै १९०१ इसवी.

T. G. Paranjape
सिव्हिल जड्ज.

## मेहेकर येथील स्त्री शिक्षणोत्तेजक स्त्रियांची लहान पण टूमदार सभा

ही सभा गेल्या १९ वे तारखेस झाली. अध्यक्षस्थान तेथील विद्यमान, ए. अ. क. सा. बहादूर नारायण बभूतसिंग यांच्या पत्नी सौभाग्यवती तुळसाबाई यांनीं सुशोभित केलें होतें. सभेस ४०-५० सा वर स्त्रिया जमल्या होत्या. श्रीमती तुळसा बाईनीं स्त्रीशिक्षणाची थोरवी उत्तम प्रकारें सर्वांच्या मनावर ठसविली, त्या ह्मणाल्याः—

"शिक्षणाचा अलभ्य लाभ स्वतः करून घेण्याची व आपल्या मुलीबाळींना तसें शिक्षण देण्याची येथें जमलेल्या माझ्या भगिनी वर्गाची प्रवृत्ति व्हावी ह्या उद्देशानें स्त्रीशिक्षणाचे महात्म सुचेल तसें वर्णन करावयाचें मीं आज योजिलें आहें. विद्येनें केवढाले लाभ होतात हें आपणा सर्वांना माहित आहेच. विद्या हें मनुष्याचें भूषण व गुप्त द्रव्याचा साठा होय. विद्येपासून सन्मान व सत्कीर्ति प्राप्त होते. परक्या ठिकाणीं तर विद्या अगदीं बंधू प्रमाणें उपयोगी पडेत. हे सोर लाभ आपणा स्त्रीजनासहि प्राप्त होण्याचा सांप्रत काळ आला आहे, हें मोठें आपलें सुदैवच उदयास आलें ह्मणावयाचें. कांहीं लोकांचा आक्षेप आहे कीं, स्त्रियांस विद्या शिकविली असतां त्यांच्या आंगचा भूषणभूत विनय जाऊन त्या घरांतील कामाकडे दुर्लक्ष करतील पण माझें मतें हा त्यांचा समज चुकीचा आहे. आपल्या देशांत व परदेशांत शिकलेल्या स्त्रियांचीं जीं उदाहरणें दृष्टीस पडतात त्यांवरून पहातां विनय त्यांच्या अंगीं पूर्णपणें वसत असून त्या अनेक सद्गुणांचे पात्र बनल्या आहेत. व संसार कर्तव्यांताहि इतर स्त्रियांच्या पेक्षां अधिक दक्ष असल्याचेंच दृष्टोत्पतीस येतें. आपणां पैकीं पुष्कळांना रिकामा वेळ पुष्कळ सांपडतो. पण तो आपण निरुपायास्तव गप्पा मारण्यांत किंवा परक्यांची नसती उठाठेव करण्यांत घालवितो हा सर्वांना अनुभव आहेच. हेच लिहितां वाचतां आलें तर करमणुकीचें अति उत्तम साधन आपणास प्राप्त झाल्यास वेळेचें काय करावें हा प्रश्न आपणापुढें उभा राहणार नाहीं. (पुस्तकें पोथ्या हीं वाचण्यानें ईश्वर प्राप्तीचा मार्ग सुलभ होईल.) निदान पर निंदेचें पातक तरी माथीं येणार नाहीं. विद्येनें मनावर उत्तम परिणाम होऊन स्त्रिया गृहिणी या नांवास खरोखर पात्र होतील आणि आपल्या संततीचें लालनपालनादि महत् कृत्यासहि योग्य होतील यांत शंका नाहीं. लहान मुलें आईपासून उपदेश लवकर व अनायासें ग्रहण करितात ह्मणून स्त्री शिक्षणाचा सर्वत्र प्रसार झाल्यास सुशिक्षित स्त्रियांच्या उपदेशानें व उदाहरणानें आपल्या देशांतील भावी प्रजा स्वदेशकल्याणाची कळकळ बाळगणारी व समाजाचें हितचिंतणारीच निपजेल यांत संशय नाहीं. यास्तव निदान यापुढें तरी होणाऱ्या ह्या मोठ्या फायद्या साठीं प्रत्येकानें स्त्री शिक्षणाच्या महत्कार्यास यथाशक्ति उत्तेजन देण्याच्या कर्तव्यास विसरूं नये.

लिहितां वाचतां आलें नाहीं तर किती तरी अडचणी आपणांस येतात. पहा कीं आपले आप्त वगैरेस कांहीं कळविणें झाल्यास तें लिहवून घेण्यास दुसऱ्याचीच मदत घ्यावी लागते. जगांतली महत्वाची माहिती वर्तमानपत्रद्वारें कळण्यास साहजिक असून तीहि होऊं शकत नाहीं. अशा अनेक प्रकारच्या अडचणी येतात. स्त्री शिक्षणापासून ह्या प्रमाणें पुष्कळ फायदे आहेत पण ते सर्व सांगत बसून मी आपला अमूल्य वेळ घेऊं इच्छीत नाहीं. करितां माझ्या ह्या ह्मणण्याचा जरूर विचार करावा अशी शेवटची विनंति करून व माझें चार वेडेवांकडे शब्द आपण स्वस्थ चित्तानें ऐकून घेण्याची मजवर जी कृपा केली त्याबद्दल आपणा सर्वांचे मी अंतःकरणपूर्वक आभार मानून रजा घेते."

---

## वर्तमानसार

गोड लाकू—शर्करा खाण्यानें रोग होतात ह्मणून तिचें अती सेवन बरें नव्हें असें पुष्कळ डाक्टरांचें मत होतें. हल्लीं कांहींचें याच्या विपरीत मत बाहेर आलें आहे कीं, साखर खाण्या पासून फार हित होय. अती तेथें माती हें तत्व विसरूं नये, व बेताबातानेंच सर्व गोष्टी चालू ठेवाव्या त.

जल प्रलय—फेशंगी (चीन) येथें ह्या प्रळयानें ४ हजार लोकांस समाधी मिळाली. अग्नि नारायण कोपल्यास जळाच्या मदतीनें शांत करिता येतो. पण जलप्रळयापुढें निरुपाय होऊन सादर व्हावें लागतें.

जुने ग्रंथ—अडीच हजार वर्षांपूर्वीं लिहून ठेविलेले ग्रंथ जपानमध्यें उत्तम व्यवस्थित रीतीनें जपून ठेविलेले आहेत. जुन्या गोष्टींची महती व मातबरी विलक्षण आहे व त्यांची होईल तितकी जोपासना करणें ह्मणजे गत व नष्ट झालेल्या वैभवाचें स्मारक करून त्याची खरी किंमत जाणणें होय.

सावध—परवां पुण्यास एका बाईनें आपल्या लहान मुलीला रात्रौ अफू दिली व ती जरा जास्त झाल्या मुळें ती दुसरे दिवशीं मेलेली आढळली. मादक पदार्थ व औषधीं देतांना चांगली खबरदारी घेतली पाहिजे- नाहीं तर भलताच प्रसंग ओढवतो.

शोचनीय मृत्यू—डेक्कन कालेजचे व मुबईतील एलफिस्टन कालेजचें माजी प्रिन्सिपाल ऑक्झनहॅम साहेब यांस विलायतेस देवाज्ञा झाली. यांच्या ठायीं सर्वांची फार पूज्य बुद्धि व प्रेमभाव होता ह्यांच्या मृत्युबद्दल त्यांच्या सर्वत्र पसरलेल्या छात्र वर्गास फारच दुःख होईल.

सूचना—हिंदुस्थानची खरी दाद विलायतेस लागण्यासाठीं पाण्या सारखा पैसा खर्च केल्या खेरीज गत्यंतर नाहीं. राजकीय कृत्यांचा सर्व जम पैशावरच बसतो. तर हिंदुस्थ नानें ९ हजार पौंड खर्चून इंग्लंड, अमेरिका, स्काटलंड व आयर्लंड या ठिकाणीं १० उत्तम वक्ते पुरुष रवाना करावेत त्यांनीं तेथील लोकमत जागृत करून हिंदुस्थान संबंधानें खूप चळवळ करून सोडावी. असें केलें तरच लवकर व खरी दाद लागणार आहे. सर्व ठीक आहे, गोड व रसाळ वाणी कठोर दगडालाहि पाझर फोडील पण पैशाचे सोंग कोण घेणार?

आमचा कनवाळू कोण— इंग्लंडांतील लिबरल पक्षास कोणी कार्य-कर्ता धुरीण न राहिल्यामुळें त्याची दाणादाण होऊन तो रस तळास जाणार हें खास. मग आमची काय स्थिती?

सरस्वतीची विपन्नावस्था—विद्येचा व दारिद्र्याचा प्रेमभाव व सौजन्य जितकें आहे तितकें सख्य पैशाशी असतें तर काय मजा झाली असती. पारीस येथें ग्राज्युएट लोक हाटेलांत हुजऱ्याचीं, बूट साफ करण्याची केर काढण्याचीं कामें करितात. विद्वानांची अशी दुर्दशा ऐकून मन फाटून जातें. कामधंदा न उरल्यामुळें व सर्व साधारण विद्येची कक्षा विस्तृत झाल्यामुळें ही स्थिती प्राप्त झाली आहे.

पोटाची आग— मुंबईस एका बाईस तीन मुलें होती. अत्यंत दारिद्र्यामुळें दोन प्रहरची भ्रांत असे. ह्या पोटाच्या आगीनें वैतागून तिनें आपल्या मुलास नेऊं घालून निजविलें व आपण जुबिली ब्रिजमधील कढत पाण्याच्या हौदांत उडी मारून आपल्या ह्या जगांतील दुःखाचा शेवट केला. कठीण आहे.

उपाय— कपड्यास कसर लागते त्यास लिंबाच्या रसाचा क्षार लावल्यास कसर नाहींशी होते. अनुभव पहावा.

नाशिबाचा पालट— काळीदास कर्ते रा० गुरुजी यांस सरकारच्या पूर्ण पसंत पडतील असे भले भक्कम दोन जामीनदार मिळून त्यांची फत्तेगड येथील बंदिवासांतून मुक्तता झाली. इतके दिवस शनीश्वराची वक्र दृष्टी होती ती संपली ही आनंदाची गोष्ट होय. त्यांचा पुढील काळ सुखांत व आनंदांत जावो ह्मणजे झालें. नाशिबाचा खेळ फार चमत्कारिक आहे. त्याच्या अशाश्वत व चंचलवृत्तीचा थांग कोणास लागणार आहे?

ईश्वरी देणगी—कांहीं जनावरांस पुष्कळ गोष्टींचें ज्ञान उपजत असतें. तेंच मनुष्यप्राण्यास मात्र शिकल्या खेरीज येत नाहीं. मांजरास झाडावर चढतां येते पण तेंच कुत्र्यास येत नाहीं असें कां असावें बरें? इंग्लंडांत एका मनुष्याचा कुत्रा शिडीवरून वर चढला व उतरला होता. अशी विचित्र गोष्ट क्वचितच घडते. ईश्वरदत्त बुद्धि व शक्ति विलक्षण होय.

बायसिकल फौज—घोडेस्वाराप्रमाणें बायसिकल रथावर आरोहण करून लढाई मारणारे शूर रथ्यांची एक नवीन फौज तयार होत आहे. हे रथी महारथी कोणची लढाई मारणार आहेत कोण जाणे!

स्वामी विवेकानंद— हे गोमांसाचे मोठे भक्त आहेत व तें त्यांस न मिळालें तर त्यांस कांहीं चैन पडत नाहीं. त्यांचे विचार ही तशाच प्रकारचे आहेत. ज्या देशांतले लोक मांस भक्षक नाहींत तो देश कधीं उत्तम स्थितींत यावयाचाच नाहीं. मांस भक्षण करणाऱ्या देशांतच मोठे शूर योद्धे व पराक्रमी पुरुष व्हावयाचे. इतर देशांत तसे व्हावयाचेंच नाहींत. हिंदुस्थानांत यज्ञ करून मांस भक्षण करण्याची रीत होती तोंपर्यंत त्याची भरभराट होती व मांस भक्षण बंद झाल्यापासूनच त्याची दुर्दशा झाली आहे असें त्यांचें ह्मणणें आहे. काय विचारगांभीर्य हें!


### NOTICE

Notice is hereby given that whoever has any claims for pay due or for materials supplied during the Late Famine to the Late Akola, Basim and Buldana Divisions, should put forward his claims to the undersigned within one month from the date of issue of this notice, after which no claims will be entertained.

27/7/1901  J. M. RAY
Offg. Executive Engineer
West Berar Division.

---

### नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्री करितो नाग, नरसे, जिवत्या व पिठोरी किंवा पाठोडा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्या पेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदहू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल, व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला (वऱ्हाड)


---

### नोटीस

मी नोटीस देणार खालीं सही करणार याजकडून. जगन्नाथ राजाराम पुराड रहाणार अकोलें तालुके अकोलें यास.

नोटीस देण्यांत येते कीं मौजे शहानवाजपूर तालुके अकोलें येथील शेत सर्व्हे नंबर १८ पैकीं एकर ११-२७ गुंठे आकार रुपये २८ पट्टी सखेत याचें खातें सूर्यभान वल्लद म्हारजी भोंगळे याचे नांवानें असोन सदहू शेतांत निम्मे हिस्सा माझा असून निम्मे खातेदार याचा आहे तो हिस्सा खातेदार याचा ½ तुह्मी त्याची बायको तुळसाई उर्फ तुकाई मर्द सूर्यभान भोंगळे इज पासून तुह्मी खरेदी घेतला आहे असें मजला समजत आहे. करिता सदहू हिस्सा विकत घेण्याचा पूर्व हक्क माझा आहे. करिता तुह्मास या नोटिशीनें कळविण्यात येते कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसाचे आंत तुह्मी ही घेतलेला हिस्सा निमेचा हा जितके रुपयास घेतला आहे तितके रुपये मजपासून घेऊन मजला परत खरिदी द्यावा जर सदहू मुदतींत तुह्मी मजला न दिला तर मग मजला योग्य कोर्टांत दावा करणे जरूर पडेल. तो मी करून तुमचे पासून हिसा कोर्ट मार्फत ताब्यांत घेईन व कोर्ट खर्च व नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल तर सदहू मुदतींत खरिदीखत तुह्मी करून मजला द्यावें नाहीं तर हल्लीचे पिकाचे नुकसानी सहीत दावा करून हिसा ताब्यांत कोर्ट मार्फत घेईन.

सही
हुल्या वल्लद जानजी धनगर
निशानी खुद्द हातची.
रामा वल्लद झिंगराजी धनगर
निशाणी खुद्द हातची